
उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



आजपासून महिला प्रीमियर लीगच्या तिसऱ्या हंगामाची सुरुवात



ब्रेकअपनंतर पहिल्यांदाच अर्जुन- मलायका समोरासमोर

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १५२ ■ नाशिक, शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा




नाशिक : शिवसेनेच्या आभार सभेत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. व्यासपीठावर शिक्षणमंत्री दादा भुसे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार सुहास कांदे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, आ. किशोर दराडे, हेमंत गोडसे, विजय करंजकर, राजू लवटे, अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे, सुनील पाटील, राजेंद्र सोनवणे, धनराज महाले.




# सुंभ जळाला, पीळ जाईना

## नाशिकच्या आभार सभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

**शिवसेना मनोमनी रुजवा** | **आगामी निवडणुकीसाठी सज्ज व्हा** | **योजना बंद पडणार नाहीत**

**नाशिक : प्रतिनिधी**

**अडीच वर्षांच्या कालावधीत झालेले राजकारण आणि विकासकामांची गती महाराष्ट्राने पाहिले आहे. परंतु, विरोधक केवळ गद्दार आणि खोके एवढेच बोलत असून, त्यांच्याकडे दुसरे काहीही भांडवल नाही. एक-एक जण सोडून जात आहे. पण यांचे मात्र, आमचा पक्ष चोरला, धनुष्यबाण चोरला हेच चालू आहे. अडीच वर्षे महाराष्ट्रात सर्व बंद करून ठेवले होते. आपण ते मुक्त केले. 'सुंभ जळाला असला तरी पीळ काही जाईना' अशी स्थिती विरोधकांची झाली असल्याची टीका उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

शुक्रवारी (दि.१४) येथील हुतात्मा कान्हेरे मैदान (गोल्फ क्लब) येथे आभार दौऱ्यात ना. शिंदे बोलत होते. व्यासपीठावर शिक्षणमंत्री दादा भुसे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार सुहास कांदे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, आ. किशोर दराडे, हेमंत गोडसे, विजय करंजकर, राजू लवटे, अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे, सुनील पाटील, राजेंद्र सोनवणे, धनराज महाले, अनिल ढिकले, भाऊलाल तांबडे, हेमलता पाटील, जॉय कांबळे, सुवर्णा मटाले, सूर्यकांत लवटे, इंदुबाई नागरे, विक्रम नागरे, पवन पवार, नंदकुमार जाधव, सुषमा पगारे आदींसह माजी नगरसेवक तसेच मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. शिंदे म्हणाले की, नाशिक ही पवित्र भूमी आहे. येथे आल्यानंतर एक वेगळीच ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. या भूमीत राहणारे सर्वच भाग्यवान आहेत. मी देखील आलो. येथे आल्याने भाग्यवान झालो आहे. विधानसभेला नाशिककरांनी महायुती आणि शिवसेनेला अद्भुत यश मिळवून दिले हा इतिहास झाला आहे. मी नाशिककरांना शब्द दिला होता आणि तो पाळण्यासाठी मी आलो आहे. मी या भूमीचा भक्त झालो आहे. त्यामुळे आपणा सर्वांचे आभार मानायला मी येथे आल्याचेही ना. शिंदे यांनी स्पष्ट केले.

यावेळी ना. शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता खरमरीत टीका केली. ज्यांची केवळ लेना बँक आहे त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार? ज्यांनी घरात बसून फक्त फेसबूक लाइव्ह केले त्यांना लोकांनी घरीच बसवले आहे. कारण मी घरात बसून नाही तर फेस टू फेस भेटून, लोकांमध्ये जाऊन त्यांच्या अडचणी, समस्या/-...३

### कुंभमेळ्याची जबाबदारी आपली

सध्या प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू असून, २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार आहे. यासाठी नुकतीच मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली असून, त्याबाबतच्या नियोजनावर चर्चा झाली आहे. आपण अतिथी देवो भव: ही संस्कृती जपतो. तसेच कुंभमेळ्यातही आलेल्या प्रत्येक भाविकाला त्याच्या घरी सुखरूप पोहोचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांची राहणार आहे. त्यासाठी सर्वांनीच तयार राहण्याचे आवाहनही त्यांनी करत प्रत्येकाच्या मनामनांत शिवसेना पोहोचविण्याचे आवाहनही शेवटी केले.

### अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश

यावेळी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाकरे गटाच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

### 'आप्पा' योग्य जागी आले

भगूर येथील भूमिपुत्र आणि ठाकरे गटातून शिंदे गटात दाखल झालेल्या विजय करंजकर यांचे ना. शिंदे यांनी भरभरून कौतुक केले. आप्पा पूर्वी चुकीच्या जागी होते. त्यांनी धनुष्यबाण हाती घेतल्याने ते योग्य जागेवर आल्याचे सांगत आप्पांच्या पाठपुराव्यामुळे भगूर शहरासाठी पाणीपुरवठा योजनेला मंजुरी दिल्याचेही ना. शिंदे म्हणाले.

### ना. भुसे, कांदेंचे कौतुक

आपल्यासोबत असलेले ना. दादा भुसे आणि आमदार सुहास कांदे हे दोन्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेसाहेबांच्या विचारांचे खंदे पाईक आहेत. भुसे आणि कांदे कामालाही पक्के आहेत. सुहास कांदे जायंट किलर ठरले तर ना. भुसे यांनी आदिवासी पाड्यातील शाळांचा दर्जा सुधारल्याचे गौरवोद्गारही ना. शिंदे यांनी काढले.

### करप्रश्न मार्गी लावणार

नाशिककरांच्या कराच्या संदर्भातील प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासनही ना. एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियानाची सुरुवात जशी नाशिकमधून केली होती तसेच आगामी निवडणुकांमध्ये विरोधकांचीही झाडून स्वच्छता करा, असे सांगत ना. शिंदे यांनी विकासकामांची यादीही वाचली. त्यात सिडकोच्या घरांचा मुद्दा, नार-पार प्रकल्प, शेतकरी योजनेवर अडीच वर्षांत केलेला ४५ हजार कोटींचा खर्च, लाडकी बहीण योजना आदींवर प्रकाशझोत टाकला.

# भारताला मिळणार एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमान

## मोदी-ट्रम्प यांची संयुक्त पत्रकार परिषद

**वॉशिंग्टन :**

जागतिक लष्करी युतींना आकार देऊ शकणाऱ्या एका महत्त्वपूर्ण पाऊलाअंतर्गत, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या वर्षी भारताला शस्त्रास्त्रांची विक्री वाढवण्याची योजना जाहीर केली आहे.

प्रस्तावित करारात अत्याधुनिक एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमानांचा समावेश आहे, जो दोन्ही राष्ट्रांमधील संरक्षण सहकार्यात एक महत्त्वाचा टप्पा आहे. वॉशिंग्टनमध्ये डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील उच्चस्तरीय बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. दोन्ही नेत्यांनी व्यापार, इमिग्रेशन आणि राष्ट्रीय सुरक्षा यांसह विविध मुद्द्यांवर चर्चा केली. हा विषय त्यांच्या चर्चेत केंद्रस्थानी होता. या वर्षापासून आम्ही



भारताला अब्जावधी डॉलर्सची लष्करी विक्री वाढवू, असे ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींसोबत संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले. आम्ही भारताला एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने पुरवण्याचा मार्गही मोकळा करत आहोत, असे ते पुढे म्हणाले. दोन्ही देशांमधील वाढती संरक्षण भागीदारी ही इंडो-पॅसिफिक प्रदेशात उदयोन्मुख धोक्यांचा सामना /-...३

### दहशतवादी तहव्वूर राणाला भारताला सोपवणार

मुंबईवर २००८ साली झालेल्या २६/११ हल्ल्याच्या आठवणी आजही मुंबईकरांच्या मनात ताज्या आहेत. या हल्ल्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या तहव्वूर राणा या दहशतवाद्याला भारताच्या ताब्यात देण्यास अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंजुरी दिली. त्याला न्यायाचा सामना करावा लागेल, असे ट्रम्प म्हणाले. मागच्या महिन्यात तहव्वूर राणाचे भारताला प्रत्यर्पण करण्यास अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली होती. पाकिस्तानी वंशाचा कॅनडाई बिझनेसमन तहव्वूर राणाने २००८ सालच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याला दोषी ठरवण्यात आलं आहे.

## महत्त्वाचे

### महिरावणीजवळ अपघातात दोघांचा मृत्यू

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी** महिरावणी-गणेशगाव रस्त्यावर शुक्रवारी पहाटे झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. रात्री दीडच्या सुमारास गणेशगाव ते महिरावणी या रस्त्यावर झालेल्या दुचाकी अपघातात आकाश सुभाष पाटील (२८, रा. अंबड वजन काटा, पाथर्डी रोड, नाशिक) आणि राहुल दिलीप सुतार (२०, रा. दत्तमंदिर, रायगड चौक, पवननगर, नाशिक) जागीच ठार झाले आहेत. गणेशगाव-महिरावणी हा सुनसान रस्ता आहे. गणेशगावच्या पुढे दुडगावजवळ रस्त्यावर असलेल्या वळणावर दुचाकी व दोन व्यक्ती पडलेल्या असल्याचा त्र्यंबक पोलिसांना ११२ क्रमांकावरून माहिती मिळाली. दोन्ही जखमी दुचाकीस्वारांना जिल्हा रुग्णालयात रुग्णवाहिकेने पहाटे तीनच्या सुमारास दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी मयत असल्याचे घोषित केले. अपघात नेमका कशामुळे झाला असावा, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. दुचाकी घसरली असावी किंवा अज्ञात वाहनाने धडक दिली असावी, याबाबत अद्याप निश्चित माहिती समोर आलेली नाही.

### मुलाच्या इंजेक्शनसाठी जनतेने जमवले १६ कोटी

**अहमदाबाद :** गुजराती लोकांनी पुन्हा एकदा माणुसकी दाखवली आहे. चार वर्षांपूर्वी गोध्रा येथील एका मुलाचा जीव वाचवण्यासाठी आवश्यक असलेले १६ कोटी रुपये उभारण्यासाठी गुजराती लोक रस्त्यावर उतरले होते. आता हिम्मतनगरमध्येही असेच काहीसे घडले आहे. येथे एका गरीब कुटुंबातील २० महिन्यांच्या मुलाला १६ कोटी रुपयांच्या इंजेक्शनची आवश्यकता होती. कुटुंबाच्या विनंतीवरून लोकांनी पैसे गोळा करण्याची मोहीम सुरू केली आणि अखेर ही रक्कम जमा झाली. हे इंजेक्शन गुरुवारी अमेरिकेहून अहमदाबादला पोहोचले. गेल्या मंगळवारी मुलाला इंजेक्शनचा डोस यशस्वीरित्या देण्यात आला आणि आता त्याची प्रकृती सुधारू लागली आहे. गुजरातमध्ये एसएमए टाइप-१ ग्रस्त मुलाला इंजेक्शन देण्याची ही पहिलीच घटना आहे.

# धनंजय मुंडेंचा राष्ट्रवादीच्या 'कोअर ग्रुप'मध्ये समावेश

## अजित पवारांकडून मुंडेंना पाठबळ



**मुंबई :**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी संशयाच्या भोवऱ्यात सापडलेल्या वाल्मीक कराड यांच्यावरून या प्रकरणात सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसह विरोधकांनी धनंजय मुंडे यांना लक्ष्य केले. त्यामुळे विरोधकांकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणीसुद्धा वारंवार केली जात होती. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवारांकडून धनंजय मुंडेंना अभय देण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नव्याने स्थापन झालेल्या 'कोअर ग्रुप'मध्ये सदस्य करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी संघटना मजबूत करण्याबरोबरच धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कल्याणकारी योजना सुरू करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांचा समावेश असलेला 'कोअर ग्रुप' तयार केला. धनंजय मुंडेंबरोबरच अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ नेते सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ हे भाजपाच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी आघाडी महायुतीच्या घटक पक्षाचे सदस्य आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या ग्रुपचा मुख्य उद्देश पक्षाची पुनर्बांधणी /-...३



## मुख्यमंत्र्यांचे सहकुटुंब प्रयागराजला स्नान

**प्रयागराज :**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल शुक्रवारी प्रयागराज येथे आयोजित महाकुंभमेळ्यात पोहोचले. यावेळी त्यांनी सहकुटुंब त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रयागराजच्या अरैल घाटावर जाऊन त्यांनी संगमात आस्थेची पवित्र डुबकी घेतली. प्रयागराजमधील कुंभमेळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, आई सरिता फडणवीस आणि मुलगी दिविजा फडणवीस यांनीदेखील त्रिवेणीच्या संगमात पवित्र स्नान केले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, तब्बल /-...३

# सुरेश धस यांनी घेतली धनंजय मुंडेंची भेट

## मनोज जरांगेंचा संताप; धस यांच्यावर टीका

**बीड :**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरून आमनेसामने आलेले भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची गुप्त भेट झाल्याची माहिती समोर आली आहे. एका खासगी रुग्णालयात सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची ही भेट झाल्याचे सांगण्यात येत आहे. संतोष देशमुख यांची हत्याप्रकरणातील खंडणीच्या गुन्ह्यात धनंजय मुंडे यांचे सर्वांत जवळचे कार्यकर्ते वाल्मीक कराड हे सध्या कोठडीत आहेत. सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरलेलं असताना, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या धनंजय मुंडे यांना टार्गेट केलं आहे. मात्र आता सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची गुप्त भेट झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. दरम्यान, या भेटीबद्दल मनोज जरांगे यांनी संताप व्यक्त करत धस यांनी मराठा समाजाचा विश्वासघात केल्याची टीका जरांगे यांनी केली.

या भेटीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या, हे सर्व सरप्राइजिंग आहे. माझ्या माहितीनुसार भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोघांमध्ये समेट घडवून आणली आहे. पण ही अतिशय गंभीर बाब आहे. सुरेश धस म्हणाले, धनंजय मुंडे यांचं ऑपरेशन झालेलं आहे. त्या दिवशी रात्री त्यांना



हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आलं. दुसऱ्या दिवशी झाकून-लपून नाही तर त्यांच्या निवासस्थानी भेटायला गेलो होतो. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी गेलो होतो. त्यांच्याविरोधातील लढा आणि भेट या वेगळ्या गोष्टी आहेत. आम्ही चार-साडेचार तास एकत्र होतो. सुरेश धस आणि धनंजय मुंडे दोघेही होते. दोघांमध्ये मतभेद आहेत, मनभेद नाहीत. दोघेही इमोशनल आहेत. दोघांमध्ये थोडे मतभेद आहेत, ते दूर होतील. माणसाच्या जीवनात थोडा काळ असा असतो, काळ मतभेद दूर करतो. काही काळाने धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांचे मतभेद दूर होतील. मी पक्षाचा अध्यक्ष आहे, माझ्याकडे दोघेही भेटले. धनंजय मुंडेंनी भाजपच्या प्रवासासोबत माझ्यासोबत काम केलं आहे. त्यामुळे धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यातील भेट ही पारिवारीक भेट झाली आहे. आम्ही तिघेही परिवार म्हणून बसलो होतो. त्यांच्यात मतभेद आहेत, मनभेद नाहीत.

# भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही

## कृषिमंत्र्यांचे वादग्रस्त विधान; भाजपने फटकारले

**अमरावती :**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी अमरावतीत पत्रकारांशी बोलताना शेतकरी पीकविमा योजनेवरून भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. पण शेतकऱ्यांना एक रुपयात पीकविमा योजना आम्ही देत आहोत, असे वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यावरून किसान सभा चांगलीच संतप्त झाली आहे. विरोधकांनीही कोकाटे यांच्या या वक्तव्याबद्दल संताप व्यक्त केला. दरम्यान, भाजपचे प्रवीण दरेकर यांनी या विधानाबद्दल बोलताना कृषिमंत्र्यांनी असे बोलणे चुकीचे आहे, अशा शब्दांत फटकारले.

शेतकऱ्यांसाठीची पीकविमा योजना बंद करायचा कोणताही विचार नाही, असे सांगताना या पीकविमा योजनेचे गुणगाण करताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा तोल सुटला. त्याभरात कोकाटे यांनी आजकाल भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. पण एक रुपयात पीकविमा योजना मिळते असे बोलून गेले. त्यानंतर राज्यात खळबळ उडाली आहे. विरोधी पक्षांनी तर माणिकराव कोकाटे यांच्यावर तोंडसुख घेतलेच परंतू सरकारमधील



सहकारी पक्ष भाजपानेदेखील माणिकराव कोकाटे यांच्यावर टीका केली आहे.

पीकविमा योजनेची भलामण करताना ते म्हणाले की, पीकविमा योजना ही यशस्वी झाली पाहिजेत. योग्य त्या शेतकऱ्याला तिचा लाभ मिळाला पाहिजे. यातले फायदे-तोटे हे चांगले-वाईट अनुभव सरकारच्या पाठीशी आहे. सरकारला पीकविमा बंद करायची नाही. परंतु या योजनेतील गैरप्रकार थांबवण्यासाठी काहीतरी उपाययोजना कराव्या लागतील, असे कोकाटे म्हणाले.

**भाजपाची टीका**

माणिकराव कोकाटेंसारख्या जबाबदार मंत्र्यांनी अशी विधानं करताना सावधता बाळगावी हवी होती. वक्तव्याचा विपर्यास होणार नाही याची काळजी घ्यावी, त्यांच्या बोलण्याचा अर्थ तसा नव्हता असंही दिसतंय, असे भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी बाजू सावरताना म्हटले आहे.

### परराज्यातील शेतकऱ्यांचे अर्ज

पीकविमा योजनेतील गैरप्रकार थांबविण्यासाठी जो काही निर्णय घेऊ तो दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याशी बोलून घेतला जाईल, असे सांगताना कृषिमंत्र्यांनी विचार केला तर भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. आम्ही मात्र एक रुपयामध्ये पीकविमा दिला असे म्हटले आणि अडचणीत आले. या योजनेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न लोकांनी केला. बाकी राज्यातील लोकांनीदेखील ऑनलाइन अर्ज केले होते.

# दातलीत कारखाली चिरडून तरुणाची हत्या, पाच जखमी

## भावकीच्या वादातून दोन गटांत हाणामारी



**सिन्नर : प्रतिनिधी**

भावबंदकीचा वाद आणि जुन्या भांडणाची कुरापत यातून तालुक्यातील दातली येथे दोन गटांत झालेल्या तुंबळ हाणामारीत एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.१४) संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत सागर मारुती भाबड (३५) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. मयत सागरच्या अंगावर कार घालून त्याला चिरडण्यात आल्याची चर्चा सिन्नर ग्रामीण रुग्णालयात परिसरात सुरू होती.

सागर यांची पत्नी, भाऊ, भावजयी तिघेही पोलीस दलात कार्यरत आहेत. या घटनेत जगन्नाथ नरहरी भाबड (५०), अक्षय म्हाळू भाबड (२८), म्हाळू नरहरी भाबड (५३), सुयोग म्हाळू भाबड (२२) सर्व रा. दातली, ता. सिन्नर आणि ओमकार विजय डोमाडे (२१) रा. देशवंडी, ता. सिन्नर असे पाच जण जखमी झाले आहेत. सागरसह या पाचही जणांना उपचारासाठी सिन्नर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सागर याला डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर उर्वरित पाच जणांवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील /-...३

महत्त्वाचे

## जिंदाल विद्यापीठाचे डॉ. सचिन मंगला यांची के. के. वाघला भेट



**नाशिक : प्रतिनिधी**
हरियाणा येथील ओ. पी. जिंदाल विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन कुमार मंगला यांनी नुकतीच के.के.वाघ शिक्षण संस्थेला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत व सत्कार पार पडला. यावेळी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभाग प्रमुख तसेच शिक्षक ई. उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी संस्थेचे प्रास्ताविक केले. प्रा. रुचिता गायधनी यांनी मान्यवरांचा परिचय केला. डॉ.सचिन कुमार मंगला हे म्हणाले की, नवसंशोधकांसाठी संशोधन प्रक्रियेतील टप्पे .उच्च दर्जाच्या जर्नल्समध्ये संशोधन प्रकाशित करण्यासाठी आवश्यक निकष तसेच उत्तम संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था व औद्योगिक संस्था यांच्या सहकार्याने समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणेबाबत मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे लिंक्डइनद्वारे स्वतःची व आपल्या संस्थेची ओळख निर्माण करू शकतो. तसेच त्या माध्यमातून आपल्या संशोधनाची माहिती इतरांना उपलब्ध होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## के. के. वाघमध्ये अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**
के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिकच्या एम.सी.ए विभागातर्फे नुकतेच अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत आठवडाभर ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देशभरातील ३५० हून अधिक प्राध्यापकांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. एआय-ड्रिव्हन एज्युकेशनल टेक्नोलॉजी फॉर एन्हान्स्ड टीचिंग अँड लर्निंग या विषयावर तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे डॉ. उदय वाड यांच्या हस्ते पार पडले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. प्रा. राजेंद्र सोनार, डॉ. अभिषेक पाटणगे, सोनल तेमगिरे, डॉ. शिल्पा चौधरी, जयंत श्रीपाठी, डॉ. अभिषेक भट, प्रा. अरविंद यादव, व्ही. डी. निचित, विजयमणी गुलाटी व दिनेश खैरनार आदी मान्यवरांनी कार्यशाळेस मार्गदर्शन केले. शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापकांनी कृत्रिम बुद्धिमत्ताचा अववंब कशाप्रकारे करावयाचा याबाबत मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्राध्यापकांना कृत्रिम बुद्धिमत्ता चालित शिक्षण साधने, ॲडॅप्टिव्ह लर्निंग सिस्टीम्स, शैक्षणिक परिणाम सुधारण्यासाठी अभिनव एआय-आधारित विश्लेषण करण्यात आले.
विभागप्रमुख डॉ. वंदना बागल यांनी कार्यशाळेचे समन्वयक तर सहसमन्वयक म्हणून अर्चना राणे यांनी कामकाज पाहिले. यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी आभार मानले.

## आनंद विवाह कायद्यांतर्गत विवाह नोंदचे आवाहन

**नाशिकरोड : वार्ताहर**
शीख समाजाला १९५५च्या हिंदु विवाह कायद्याऐवजी आनंद विवाह कायदा १९०९ (सुधारणा २०१२) अंतर्गत त्यांचे विवाह कोणत्याही अडथळ्याशिवाय नोंदणी करता येतील. हा कायदा व्हावा म्हणून नाशिक पंजाबी वेल्फेअर असोसिएशनचे सदस्य २०२० पासून पाठपुरावा करत होते. महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकार आणि न्यायिक संस्थांना पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. ती मागणी मान्य झाल्याने समाधान व्यक्त होत आहे. अधिक माहितीसाठी समाज बांधवांनी एनपीडब्ल्यूएच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष रणजीतसिंग आनंद मो. ९८२२३२४३६६, सचिव बलजीतसिंग सिबल मो. ९८६०९७८५५५ व इंदरजीतसिंग घटोडे मो. ७५८८१८१३१३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शीखांना १९५५ च्या हिंदू विवाह कायद्याऐवजी आनंद विवाह कायदा २०१२ अन्वये विवाह नोंदणी करता येईल, अशी मंजुरी मिळालेली आहे. या कायद्यानुसार विवाह नोंदणी करण्याचे कळविले आहे. आनंद विवाह कायद्यांतर्गत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन नाशिक पंजाबी वेल्फेअर असोसिएशनने केले आहे. याकामी मनमाड गुरुद्वारा श्री गुप्तसरचे जथेदार बाबा रणजीतसिंगजी, मुंबईचे विधिज्ञ अमरजीत सिंगजी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनी हा कायदा पास होऊ शकला, असे रणजीतसिंग आनंद म्हणाले.

## दास नवमीनिमित्त पारायण

**नाशिक : प्रतिनिधी**
दासनवमीनिमित्त मारुती देवस्थान आणि समर्थ रामदास स्वामी मठ टाकळी येथे आज दिनांक १५ ते २२ फेब्रुवारीपर्यंत सकाळी नऊ ते एक दासबोध पारायण आयोजित करण्यात आले आहे. ज्यांना या पारायण सोहळ्यात सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनी मंदिरात संपर्क करावा, असे आवाहन अध्यक्ष जिल्हा व सत्र न्यायाधीश जगदीश दळवी, विश्वस्त अर्चना रोजेकर, प्रसाद चौधरी, ॲड. नागनाथ गोरवाडकर, भालचंद्र कर्वे, रवींद्र पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२०९०२५१९, ९४२०७४३६०३, ८०८७२०४६४० या क्रमांकावर संपर्क करावा.

# सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर विविध भागांची पाहणी

## कामांचा प्राधान्यक्रम ठरवून नियोजनावर भर देणार

**नाशिक : प्रतिनिधी**
**विकासकामांमध्ये शासनाच्या सर्वच विभागांचा परस्परांशी अप्रत्यक्ष संबंध येत राहतो. त्यामुळे पाहणी दौऱ्यामध्ये प्रत्येक कामामध्ये वेगवेगळ्या विभागांचा कसा सहभाग राहील आणि त्यातून कोणते काम गतीने करता येईल, याबाबत सविस्तर अभ्यास तपासण्यात आला. डॉ. प्रवीण गेडाम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**

शहरातील सर्वच शासकीय विभागाप्रमुखांसोबत त्यांनी शहरातील सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर विविध भागांची पाहणी केली. त्यात अमृतस्नानाचा भाग रामकुंड व त्रंबकेश्वर चा कुशावर्त, वाहनतळ, आऊटर-मध्य-इनर रोड, गोदाघाट, पार्किंग या सर्व कामांचे नियोजन व करावयाच्या कामांची व जागांची सविस्तर माहिती प्रत्यक्ष पाहणीतून घेण्यात आली. या कामांची गती ठरवण्यासाठी अतिवेगाने करावयाची कामे, दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करता येणारी कामे याची चाचणी करुन कामे सुरू करून टेंडर काढण्याच्या दृष्टीने गती देण्यासाठी चर्चा करण्यात आली.

ऑगस्ट २०२७ या कालावधीत तातडीने पूर्ण करायची कामे दोन विभागात वाटण्यात आली आहे त्यात प्रामुख्याने कुंभमेळ्या संबंधित महत्त्वाची आणि आग्रकामाची पूर्तता करणे ज्या कामांना दोन वर्षे लागणार आहेत अशी कामे सुरू करणे त्याचा प्रामुख्याने मुख्य रस्ते राहणार आहेत. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले असल्याचे डॉ. गेडाम यांनी सांगितले. कुंभमेळ्याच्या तयारीनुसार येणाऱ्या समस्या व त्या संबंधित भागांची भौगोलिक व अडचणींची सविस्तर पाहणी करण्यात आली.

त्रंबकेश्वरला वेगळी स्थिती त्रंबकेश्वरची परिस्थिती वेगळी आहे. तेथे शाही स्नानासाठी १० आखाडे मिरवणुकीने येत असतात. त्यांच्या शाही स्नानाला देखील खूप वेळ लागतो त्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या साधूग्राम पेक्षा साधू संत त्यांच्या निर्धारित आखड्यांमध्येच थांबणे पसंत करतात.त्यामुळे त्यांच्याशी संवाद साधूनच साधूग्रामबाबत निर्णय घेतला जाईल.

त्रंबकेश्वर मधली परिस्थिती वेगळी आहे. कुशावर्तातून स्नान करून बाहेर पडण्याचा मार्ग, त्र्यंबकेश्वर मंदिराचे दर्शन या सर्व प्रक्रियांमध्ये पारंपरिक पद्धत, त्यांचा स्नानासाठीचा निर्धारित मार्ग व त्यांना लागणारा कालावधी यामध्ये फारसा बदल करून चालणार नसल्यामुळे संतांच्या सूचनेनुसार त्यावर निर्णय घेतले जातील.

नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गाला काँक्रिटीकरण करण्याचे टेंडर काढण्यात आले असून, कामाला लवकर सुरुवात होणार आहे. मात्र या ठिकाणी पादचार्यांना अंधारात पायी जावे लागत असल्याने रस्त्यावर पथदीप व्यवस्था करण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाईल, याबाबत अगोदर विचार केलेला नव्हता. मात्र सौरऊर्जा किंवा आजूबाजूच्या खांबांवरून वीजपुरवठा करून त्र्यंबकेश्वरपर्यंत रस्त्यावर पथदीप देण्याचा प्रयत्न राहील, असेही गेडाम यांनी सांगितले.



### पर्यायी मार्गांचा विचार करू
त्र्यंबकेश्वरमधील पार्किंगचा प्रश्न त्र्यंबकेश्वरला येणारी भाविक मंडळी ही नाशिकमार्गे जात असतात. थोड्याफार प्रमाणात पहिने गावाच्या रस्त्याने काही प्रमाणात जव्हारमार्गे येतात. मात्र, मुख्यतः नाशिकहूनच प्रवाशांची संख्या जास्त असते. यावेळी मुंबईहून त्र्यंबकेश्वरला जाणाऱ्या वाहनांना थेट त्र्यंबकेश्वरकडे जाता यावे यासाठी घोटीमार्गे पहिने हा रस्ता सक्षम करून पहिने गावाजवळच त्यांची पार्किंग निर्माण करू आणि तेथून सिटी बसने त्यांना गजानन महाराज प्रवेशद्वाराजवळ सोडले जाईल, असेही नियोजन विचाराधीन आहे.

### प्रयाग दौरा दोन टप्प्यांत
प्रयाग कुंभमेळा नियोजन पाहण्यासाठी मुंबई व नाशिक अशा दोन टप्प्यांत अधिकारी वर्ग जाणार आहे. नाशिकचे सर्वच अधिकारी, मनपा आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच मनपाचे शहर अभियंता व इतर अभियंता पाणीपुरवठा सार्वजनिक बांधकामचे अभियंते शहर बससेवा मंडळाचे अधिकारी प्रयागला जाणार आहेत. दि. १७ ते दि.१९ असा कालावधी निश्चित करण्यात आला असून, त्या माध्यमातून तेथील नियोजनाचा अभ्यास केला जाणार आहे. त्यात प्रामुख्याने गर्दीचे नियंत्रण व क्लाऊड मॅनेजमेंट, शाही मिरवणूक व भाविकांचे आगमन यांचा विशेष अभ्यास केला जाणार आहे. प्रयागराज आणि नाशिक या दोन्ही कुंभमेळ्यांची स्थिती ही विभिन्न आहे. त्यामुळे उभारण्यात आलेल्या यंत्रणांचा अभ्यास करणे तेवढेच महत्त्वाचे होणार आहे.

### गोदावरी प्रदूषणाचा प्रश्न
सांडपाणी थांबवणे व ड्रेनेज यंत्रणा सक्षम करणे. एसटीपीमध्ये सोडून त्याचं शुद्धीकरण करणे हे सर्व प्रक्रिया महानगरपालिकेच्या नियोजनात आहेत. सर्वच विभागांना आपण २०२७ पर्यंत कामाची पूर्तता करण्याचे निर्देश दिले आहेत.

### सुरक्षिततेला प्राधान्य
सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांच्या उपस्थितीत सुरक्षितता हा प्रमुख भाग लक्षात ठेवण्यात आला आहे. कुंभमेळा स्थानाच्या जवळ बसणे भाविकांना सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तिथून पायी रामकुंड परिसरापर्यंत त्यांना येता येणे शक्य आहे. सर्वच भाविकांना रामकुंडात स्नान करणे शक्य होणार नसल्यामुळे मागील सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये पाच किलोमीटरपर्यंतचा रामघाट बांधण्यात आला होता. त्यात एक-दोन ठिकाणी नवीन घाट बांधण्याची संधी असल्यामुळे त्या ठिकाणांचा विचार केला जाणार असल्याचे सांगितले.

### रामकुंडातील काँक्रीटचा प्रश्न
रामकुंडातील काँक्रीट काढण्यावर कुणाचेच दुमत नाही, मात्र काँक्रीट काढण्यामुळे रामकुंडातील पाणी संपेल काय? किंवा त्यामुळे जिवंत स्रोत बोहर येऊन पाणी वाढेल का? किंवा आहे त्या स्थितीत पाणी जाईल याबाबत तांत्रिक अभ्यास करण्याची गरज आहे. त्या अहवालानंतरच या विषयावर बोलणे योग्य ठरेल. काँक्रीट काढल्यावर भाविकांच्या पायाला काही इजा होण्याची शक्यता आहे काय? हे तपासणे गरजेचे आहे. यासाठी तांत्रिक यंत्रणेलाच अभ्यास करावा लागणार आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यांबाबत भूमिका स्पष्ट करणे योग्य होणार आहे. रामकुंडात सोबत बऱ्याच लोकांच्या भावना जोडलेल्या आहेत. सर्व संमतीने यावर निर्णय घेणार असल्याचे गेडाम यांनी यावेळी सांगितले.

### स्थानिकांना प्राधान्य देणार
पार्किंगमध्ये बाह्य अंतर्गत अशा दोन पार्किंग करण्यात आल्या आहे. त्यात मध्य पार्किंगदेखील ठेवली जाणार आहे. ज्या माध्यमातून स्थानिकांचा समावेश या उत्सवात करता येईल 'ब्रेड अँड ब्रेकफास्ट' ही संकल्पना बऱ्याच ठिकाणी राबवली जाते. स्थानिकांच्या माध्यमातून भाविकांना छोट्या-मोठ्या सेवासुविधा देणे शक्य होणार आहे. नदी काठावर कायमस्वरूपी सांस्कृतिक ॲक्टिव्हिटी करता येईल किंवा कसे ही तपासण्याचा प्रयत्न सुरू आहे. गोदावरी कॉम्पिटिशनमध्ये चांगला प्रतिसाद मिळत असून, तो वाढतच जाईल, असा विश्वास डॉ. गेडाम यांनी व्यक्त केला.

### अनेक जागांची पाहणी
पोलीस पीडब्ल्यूडी मनपा मेरी तसेच खासगी जागांची पाहणी केली. सरकारी जागा देखील बघितले. अनेक ठिकाणी शासकीय इमारती पडून आहेत. त्यांची पाहणी करून बंदोबस्तासाठी येणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नियोजन तिथे करता येईल किंवा कसे याबाबत विचार करण्यात येत आहे.

# कृषी योजनांसाठी फार्मर आयडी काढून घ्या

## कृषी सहाय्यक आहिरे यांचे आवाहन

**नाशिकरोड : प्रतिनिधी**
**कृषी योजनांसाठी फार्मर आयडी काढून घेण्याचे कृषी सहायक अधिकारी सविता आहिरे यांचे शेतकरी वर्गाला आवाहन करत केंद्र शासनाच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर अंतर्गत ॲग्री स्टॅक हा प्रकल्प संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येत असल्याची माहिती आहिरे यांनी दिली.**

महाराष्ट्र राज्यामध्ये त्या अनुषंगाने दि.१४-१०-२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. ॲग्रीसटॅक संकल्पनेमध्ये शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच( फार्मर्स रजिस्ट्री ),हंगामी पिकांचा माहिती संच,भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच या तीन पायाभूत माहिती संख्यांची निर्मिती होणार असुन या अन्वये शेतकऱ्यांना एक ओळख क्रमांक (फार्मर आयडी )उपलब्ध होणार असल्याचे सहायक कृषी अधिकारी सविता आहिरे सांगितले.

प्रधानमंत्री फसल बीमा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,नमो शेतकरी महा सन्मान निधी, शेतकरी पिक कर्ज वितरण सुलभता,पिक विमा,नैसर्गिक आपत्ती, पिकांची हमी भाव खरेदीसाठी मदत, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण,महाडीबीटी वरील कृषी विभागाच्या सर्व योजना, केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजना, हवामान अंदाज, मृदा आरोग्य, योग्य पिक सल्ला घेण्यासाठी तसेच बियाणे, रासायनिक खते,किटक नाशके खरेदी यासारख्या शासकीय योजनांसाठी हा फार्मर आयडी भविष्यकाळात महत्त्वपूर्ण ठरणार आहे .तरी पळसे, शिंदे,चाडेगाव व बाभळेश्वर या गावातील सर्व शेतकऱ्यांनी जवळच्या सेतू केंद्रामध्ये जाऊन आपला शेतकरी ओळख क्रमांक तयार



### आवश्यक कागदपत्रे
शेतकऱ्याचे आधार कार्ड, आधार संलग्न मोबाइल नंबर, शेतकऱ्यांचे ७/१२ व खाते उतारा फार्मर आयडी काढण्यासाठी सुविधा ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सीएससी सेंटर, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामपंचायत अधिकारी, आपले सरकार सेवा केंद्र व सर्व सेतू कार्यालय यांच्याशी संपर्क साधून शेतकरी यांनी आपला फार्मर आयडी क्रमांक तात्काळ तयार करून घ्यावा, असे आवाहन कृषी सहायक सविता आहिरे यांनी केले आहे.

# हिरे महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी कुसाळे यांना युवा गौरव पुरस्कार

**नाशिक : वार्ताहर**
**येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी नाशिकचा माजी खेळाडू स्वप्नील कुसाळे यास क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा युवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

क्रीडा क्षेत्रात विशेषतः २०२४ मध्ये पॅरिस येथे पार पडलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत स्वप्नील पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन या क्रीडा प्रकारात कांस्यपदक प्राप्त करणारा तो पहिला भारतीय ठरला. याचा भारतासह संस्था व महाविद्यालयास देखील अभिमान आहे. स्वप्नील याची क्रीडा क्षेत्रातील आजवरचे योगदान बघता त्यांनी केलेल्या अथक परिश्रमांचा आपल्याला देखील अनुभव होतो. त्याच्या या सर्व कामगिरीचा व त्याने आजवर गाठलेल्या यशाच्या शिखराची नोंद अनेक जणांनी आजवर घेतलेली आहे. स्वप्नील यास नुकताच क्रीडा क्षेत्रात अभिमानाचा समजला जाणारा अर्जुन पुरस्कार प्रदान करून त्याचा गौरव करण्यात आला आहे. त्याच साजेशी म्हणजे स्वप्नील यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा युवा गौरव पुरस्कार प्रदान करून त्याच्या पाठीवर अजून एक शाबासकीची थाप मिळाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७६ वा वर्धापन दिन अत्यंत दिमाखदार सोहळ्याने विद्यापीठाच्या प्रांगणात स्व.खाशाबा जाधव सभागृहात साजरा करण्यात आला.

स्वप्नील कुसाळे हा उत्तराखंड येथे सध्या चालू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झाला असल्या कारणाने त्याच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारण्या करीत महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक माजी शिक्षक आमदार डॉ. अपूर्व हिरे, प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे व महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश कराड यांनी सदर पुरस्कार स्वीकारला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा प्रतिष्ठेचा सर्वोच्च क्रीडा क्षेत्रातील युवा गौरव पुरस्कार कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अंभ्यंकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सुरुवातीस कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात विद्यापीठातर्फे अमृत महोत्सवी वर्षात विद्यापीठाने राबविलेले विविध उपक्रम, योजना, विद्यापीठानं बाहेरील परदेशी विद्यापीठाशी संलग्न एमओयूबाबत माहिती देण्यात आली. विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण अवलंबिले व ते राबविले. अशा प्रकारे दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७६ वा वर्धापन दिन इतर अनेक नामवंत व प्रतिष्टीत लोकांचा देखील सत्कार करून साजरा करण्यात आला. श्री. स्वप्नील यास मिळालेल्या या पुरस्काराबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांत हिरे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. स्मिताताई हिरे, विश्वश्वस्त डॉ. संपदा हिरे, विश्वस्त डॉ. अद्वय हिरे (पाटील), महाविद्यालय विकास समितीच्या उपाध्यक्षा डॉ. योगिता हिरे, महाविद्यालयाचे क्रीडाप्रेमी प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मातोश्री अभियांत्रिकीला 'सर्वोत्कृष्ट व्यावसायिक महाविद्यालय' पुरस्कार

## नाशिक, पुणे, नगर या तिन्ही जिल्ह्यांतून ठरले पहिले महाविद्यालय

**नाशिक : प्रतिनिधी**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयाला गुणवत्तेचे मूल्यांकन, शिक्षण व्यवस्थापन, प्लेसमेंट सुविधा, प्रयोगशाळा, संशोधन, क्रीडा आणि नवोपक्रम या विविध निकषांवर उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नाशिक पुणे व नगर या तिन्ही जिल्ह्यांमधून यावर्षीचा ग्रामीण भागातील 'सर्वोत्कृष्ट व्यावसायिक महाविद्यालय' हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

विद्यापीठाच्या भव्य समारंभात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मातोश्री शिक्षण संस्थेचे सचिव कुणाल दराडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन खराटे यांनी हा मानाचा पुरस्कार स्विकारला. महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीद्वारे आणि संशोधन व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घेतलेल्या पुढाकारामुळे हा पुरस्कार मिळाल्याचे डॉ. गजानन खराटे यांनी सांगितले. मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयाने शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत.

विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रयोगशाळेतील प्रशिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, इंडस्ट्री इंटरफेस, स्टार्टअप व संशोधनासाठी प्रोत्साहन, उत्कृष्ट प्लेसमेंट व्यवस्था आणि तंत्रज्ञान साक्षरता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबवले जातात. क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही महाविद्यालय आघाडीवर आहे.

विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात उत्तम संधी मिळाव्यात यासाठी महाविद्यालय सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. संशोधन, प्रकल्प कार्य आणि नवकल्पनांना चालना देणाऱ्या अनेक योजना येथे कार्यान्वित आहेत. यावेळी महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. वर्षा पाटील, डॉ. जयंत चोपडे, डॉ. जयंत भांगळे, डॉ. श्रीधर खुळे, डॉ. देविदास दिघे, डॉ. स्वाती भावसार डॉ. रंजीत गवांदे, डॉ. अपेक्षा गवांदे, डॉ. ज्ञानेश्वर आहिरे, आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. सर्व शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमांमुळेच हा पुरस्कार मिळवणे शक्य झाले, अशी भावना महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केली.संस्थेचे संस्थापक नरेंद्र दराडे आणी अध्यक्ष आमदार किशोर दराडे यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



### गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा सन्मान
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट व्यावसायिक पुरस्कार, महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीची, शिक्षकांच्या मेहनतीची आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची साक्ष देतो. महाविद्यालय अधिक प्रगती साधण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. अवघ्या पंधरा वर्षांच्या प्रवासात महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आम्ही कायम गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला आहे. त्यामुळे संस्थेला आणि मानांकन प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे यावर्षीपासून महाविद्यालयला स्वायत्त महाविद्यालय म्हणून मान्यता मिळाली आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**– कुणाल दराडे,** सचिव, मातोश्री शिक्षण संस्थेचे सचिव

### संस्थेने केलेल्या उत्कृष्ट कार्याचा गौरव
उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्र यामध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाविद्यालय प्रयत्नशील आहे. या मानाच्या पुरस्कारामुळे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, संस्थेने केलेल्या उत्कृष्ट कार्याची ही मोठी पावती असल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

**– डॉ. गजानन खराटे,**
प्राचार्य, मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालय



नाशिक:- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिकच्या काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेत पूजन केले, त्याप्रसंगी मंत्री दादा भुसे काळाराम मंदिराचे पुजारी महंत सुधीर दास.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री काळारामाचे दर्शन

**नाशिक प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी रात्री श्री काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, मंदिराचे महामंडलेश्वर महंत सुधीरदास महाराज, विश्वस्त धनंजय पुजारी, मंदार जानोरकर आदी उपस्थित होते. महंत सुधीरदास महाराज यांनी मंदिराची माहिती देत उपमुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत केले. यावेळी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

पान १ वरून....



## दातलीत कारखाली चिरडून तरुणाची हत्या

उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, सागर याच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी पसरताच त्याचे नातलग आणि मित्रपरिवाराने सिन्नर ग्रामीण रुग्णालयात गर्दी केली होती. अनुचित घटना घडू नये म्हणून सिन्नर पोलीस स्टेशनचे निरीक्षक संभाजी गायकवाड, मुसळगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांचा ताफा ग्रामीण रुग्णालयात बंदोबस्तासाठी ठेवण्यात आला होता त्यामुळे रुग्णालयाला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. दरम्यान, दोन गटात झालेल्या या हाणामारीत दुसऱ्या गटाचे जखमी एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. यासंदर्भात मुसळगाव पोलीसांत रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू होते.

**दोन दिवसांच्या अंतराने बापलेकाचा मृत्यू**

सागरचे वडील मारुती भाबड यांना मेंढी येथील व्यसनमुक्ती केंद्रात दारू सोडण्यासाठी ठेवले होते. बुधवारी त्यांनी या केंद्रात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्यांच्या मृत्यूला दोन दिवस उलटत नाही तोच भाऊबंधांच्या मारहाणीत सागरचा मृत्यू झाल्याने भाबड कुटुंबावर दोन दिवसात दोन आघात झाल्याने दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**शिक्षा न झाल्यास पोलीस स्टेशनसमोर आत्महत्या**

या घटनेत गंभीर जखमी झालेले सागर चे चुलत भाऊ आणि चुलते यांना पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात हलवण्यात येत असताना त्यांनी टाहो फोडला. सागरच्या मारेकऱ्यांना अटक होऊन शिक्षा झाली नाही तर पोलीस स्टेशनच्या समोर आत्महत्या करण्याचा इशारा चुलत भाऊ आणि चुलत्यांनी दिला.

## सुंभ जळाला, पीळ जाईना

ऐकून, लोकांना भेटून काम करतो, त्याचे हे फलित आहे. मला हलक्यात घेतले आणि त्यांना माझी किंमत काय आहे हे कळाले असेल. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. मी कालही कार्यकर्ता होतो आणि आजही आहे व उद्याही राहिल अशी श्वास्वतीही ना. शिंदे यांनी दिली. तएच मी सीएम म्हणजे कॉमन मॅन होतो आणि आता डेप्युटी सीएम म्हणजेच डेडिकेटेड टू कॉमन मॅन म्हणजेच सर्वसामान्य माणसाला समर्पित काम करणारा कार्यकर्ता असल्याचेही ते म्हणाले.ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत करताना ना. शिंदे म्हणाले की, त्यांच्या पक्षातून लोक बाहेर पडत आहेत. त्यामुळे त्यांनी आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा जपत काम करत असल्यानेच लोक आमच्याकडे येत आहेत. आम्ही विकासाला प्राधान्य देत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सज्ज व्हावे. कारण ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे आणि कार्यकर्त्यांना पुढे आणण्यासाठी आपल्याला झोकून काम करावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांवर विधानसभेसारखाच भगवा आपल्याला फडकवायचा आहे. घरी बसलेल्यांना घरीच बसवायचे आहे. त्यांना घरातूनच आरोप करू द्या. त्यांच्या आरोपांना मी कामातूनच उत्तर देणार आहे. ते जिंकले की त्यांचा ईव्हीएमवर विश्वास असतो. आणि निवडणुकीत पराभव झाला की मग त्यांना ईव्हीएममध्ये घोटाळा वाटतो. मतदार याद्या चुकीच्या वाटतात. कोर्ट, निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. त्यामुळे आपण आपले काम करत राहो असेही ना. शिंदे म्हणाले.

## भारताला मिळणार लढाऊ विमान

करण्यासाठी आणि स्थिरता राखण्यासाठीच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. ट्रम्प यांनी सुरक्षा बाबींवर, विशेषतः कट्टरपंथी इस्लामिक दहशतवादाचा धोका यावर एकत्र काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. संरक्षणाव्यतिरिक्त, चर्चेत दोन्ही देशांमधील व्यापार तूट कमी करण्याच्या उद्देशाने भारताकडून अधिकाधिक तेल आणि वायू आयात करण्याचा प्रस्तावित व्यापार करार देखील समाविष्ट होता. भारत आधीच अमेरिकन संरक्षण उपकरणांचा एक प्रमुख खरेदीदार आहे, त्याने २००८ पासून २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अमेरिकन लष्करी उपकरणे खरेदी केली आहेत.

## मुख्यमंत्र्यांचे सहकुटुंब प्रयागराजला स्नान

१४४ वर्षांनंतर होणाऱ्या तीर्थराज प्रयागच्या महाकुंभाच्या भव्य समारंभाची व्यवस्था. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथजी यांच्या सरकारची ही एक मोठी कामगिरी आहे, एक हिंदू म्हणून मीही येथे पवित्र स्नान करण्यासाठी आल्याचे फडणवीस यांनी आपल्या ट्विटर (एक्स) पोस्टमध्ये नमूद केले आहे. यावेळी अमृता फडणवीस म्हणाल्या, 'मला इथे येऊन खूप छान वाटले. हा एक आनंद देणारा अनोखा अनुभव आहे. पुढील कुंभ नाशिक येथे होणार आहे, त्यासाठी खूप उत्साही आहे. लोक विश्वासाने येतात, त्यामुळे त्यांच्यासाठी चांगली व्यवस्था असायला हवी. आम्ही त्यांना एक सुंदर अनुभव देण्याचा प्रयत्न करणार आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

## धनंजय मुंडेंचा 'कोअर ग्रुप'मध्ये समावेश

आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नियोजन करणे आहे. धनंजय मुंडेंना कोअर ग्रुपमधील सदस्यत्व देऊन त्यांना एक प्रकारे पाठबळ दिल्याचं बोललं जातंय. विरोधी पक्ष महाविकास आघाडीकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत असतानाच मुंडेंना कोअर ग्रुपमध्ये स्थान दिल्यानं अजितदादांचा मुंडेंवर अजूनही विश्वास कायम असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# ३ दिवसांत ५० कोटी लोक महाकुंभात पोहोचले

**लखनौ : उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये आयोजित महाकुंभमेळ्याबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोठे विधान केले आहे. महाकुंभमेळ्यात ५० ते ५५ कोटी येतील, ज्यामुळे उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे. तसेच, महाकुंभमेळ्याच्या आयोजनासाठी १५०० कोटी रुपये खर्च झाले असून त्या बदल्यात ३ लाख कोटी रुपयांचा फायदा होत आहे, असेही योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे.**

सध्या सरकारी आकडेवारीनुसार, महाकुंभमध्ये पवित्र स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ५० कोटींपेक्षा जास्त झाली आहे. आतापर्यंत कोणत्याही कार्यक्रमात इतक्या मोठ्या संख्येने लोक सहभागी झाल्याचे पुरावे मिळालेले नाहीत, असे म्हटले जात आहे. दरम्यान, महाकुंभमेळा संपण्यास अजून बराच वेळ आहे. महाकुंभमेळ्यातील शेवटचे अमृत स्नान देखील बाकी आहे, जे महाशिवरात्रीला होणार आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. ब्राझीलच्या रिओ कार्निव्हल किंवा जर्मनीच्या ऑक्टोबर फ ेस्टमध्ये जमणारी मोठी गर्दी देखील प्रयागराजमधील आयोजित महाकुंभमेळ्याच्या तुलनेत काहीच नाही. दरम्यान, रिओ कार्निव्हल हा ब्राझीलमधील रिओ डी जानेरो शहरात साजरा केला जाणारा एक मोठा उत्सव आहे. तर ऑक्टोबर फेस्ट हा जर्मनीतील म्युनिक येथे साजरा केला जाणारा वार्षिक उत्सव आहे. जो सप्टेंबरच्या शेवटी सुरू होतो आणि ऑक्टोबरच्या पहिल्या रविवारी संपतो.



प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात आणखी एक नवा विक्रम नोंदवण्यात आला आहे. महाकुंभदरम्यान ३०० स्वच्छता कर्मचाऱ्यांनी गंगा आणि संगम नदीवरील राम घाट, गंगेश्वर घाट आणि भारद्वाज घाट या तीन घाटांची अर्धा तास सतत स्वच्छता करून एक नवा विक्रम केला आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स टीमचे ज्युरी सदस्य प्रवीण पटेल यांच्या देखरेखीखाली हा नवा विक्रम करण्यात आला आहे. महाकुंभमेळ्यात घडलेला हा अनोखा विक्रम याआधी जगात कोणीही केलेला नाही.

# मृताच्या संपत्तीवर नॉमिनी अधिकार सांगू शकत नाही

## हायकोर्टाचा निर्णय, वारसदारच हक्कदार

**नागपूर : नॉमिनी अधिकृत वारसदार नसेल तर, त्याचा मृत व्यक्तीच्या संपत्तीवर कोणताही अधिकार नसतो. अशा संपत्तीचे खरे हक्कदार मृताचे अधिकृत वारसदारच असतात. त्यामुळे संबंधित संपत्ती वारसदारांमध्ये सारख्या प्रमाणात वितरित करणे आवश्यक आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके यांनी दिला.**

नागपुरातील दिवंगत गोपालकृष्ण शिवहरे यांना लक्ष्मीकांत व श्रीराम ही दोन मुले आणि शैल व संतोष या दोन मुली होत्या. शैल यांनी लक्ष्मीकांत यांचा मुलगा अभिषेकला दत्तक घेतले होते. त्या महापालिकेच्या ग्रंथालय विभागात कर्मचारी होत्या. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा ६ मे २०१३ रोजी मृत्यू झाला. त्यांनी अभिषेकला बँक खात्यांमध्ये नॉमिनी केले होते. त्यामुळे अभिषेकने शैल यांच्या निधनानंतर त्यांच्या बँक खात्यातील ९० हजार १५० रुपये काढले आणि उर्वरित रक्कमही काढण्याचे प्रयत्न सुरू केले होते. त्यावर श्रीराम व संतोष यांनी आक्षेप घेतला होता. हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर अभिषेकची कृती अवैध ठरविण्यात आली. नॉमिनीला केवळ बँक खातेधारकाचे अधिकार प्राप्त होतात. खातेधारकाच्या मृत्यूनंतर बँकेतील रक्कम नॉमिनी काढू शकतो. परंतु, नॉमिनी त्या रकमेचा मालक बनत नाही. ती रक्कम वारसाहक्कानुसारच वितरित करावी लागते, असेही उच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले. श्रीराम व संतोष यांनी शैल यांच्या बँक खात्यातील रक्कम स्वत:सह लक्ष्मीकांत यांना वाटप व्हावी, यासाठी सुरुवातीला वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात अर्ज केला होता. परंतु, या न्यायालयाने या तीन वारसदारांना केवळ ६० हजार ९९३ रुपयांत वाटा दिला होता. श्रीराम व संतोष यांनी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचा निर्णय अमान्य करून त्याविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. जिल्हा न्यायालयाने वादग्रस्त निर्णयात बदल करून तीन वारसदारांना १५ लाख १२ हजार १५६ रुपयांमध्ये वाटा दिला.



# ठाण्यात हाजूरी भागातील घराची भिंत कोसळली

**ठाणे : वागळे इस्टेट हाजूरी भागातील खलील अन्सारी यांच्या तळ अधिक एक मजली घराची भिंत बाजूच्या घरावर कोसळल्याची घटना शुक्रवारी ६ वाजण्याच्या सुमारास घडली.**

सुदैवाने, या घटनेत कोणतीही जिवित हानी झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.हाजुरीतील मौलाना आझाद शाळेजवळ गंगाधर चाळीमधील अन्सारी यांच्या ३५ वर्ष जुने बांधकाम असलेल्या घराची २० फूट लांब आणि पाच फूट उंच भिंत बाजूला असलेल्या घरावर पडली. ही माहिती मिळताच माजी नगरसेविका नम्रता फाटक, ठामपाचे सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी यांच्यासह अग्निशमन दलाच्या जवानांनी मदत कार्यासाठी भेट दिली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.ही भिंत अग्निशमन दलाच्या जवानांनी काढून बाजूला केली. या भिंतीमुळे बाजूला असलेल्या बाबूलाल विश्वकर्मा यांच्या घराचे पत्रे तुटून नुकसान झाले. आहे.सुरक्षेच्या कारणासाठी खलील अन्सारी, सादिक अन्सारी, निजाम अन्सारी आणि विश्वकर्मा यांची चार घरे रिकामी केली आहेत. त्यातील २८ रहिवाशांची राहण्याची सोय जवळ असलेल्या एका मदरसामध्ये केली आहे

### रेबीजविषयक जनजागृतीसाठी एलईडी वाहनाचा आधार

**मुंबई** : नागरिकांमध्ये रेबीज लसीकरण, तसेच प्रतिबंधासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे. यासाठी जनजागृतीपर संदेश देणाऱ्या चित्रफितींसह एलईडी वाहन तयार करण्यात आले असून या वाहनाद्वारे संपूर्ण मुंबईत जनजागृती करण्यात येणार आहे. या वाहनाच्या माध्यमातून पालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागांमध्ये जनजागृती करण्याचा पालिकेचा मानस आहे.

# मनोज जरांगेंचे साखळी उपोषण स्थगित

**जालना : मनोज जरांगे यांनी १५ फेब्रुवारीपासून राज्यव्यापी साखळी उपोषणाची घोषणा केली. मात्र राज्य सरकारनं शिंदे समितीला मुदतवाढ देऊन ही समिती गॅझेटचा अभ्यास करणार असल्याचा अध्यादेश काढला. त्यामुळे मनोज जरांगे यांनी १५ फेब्रुवारीपासून सुरू केलं जाणारं राज्यव्यापी साखळी उपोषण १५ दिवसांसाठी स्थगित केलंय.**

या १५ दिवसात म्हणजे फेब्रुवारी अखेरपर्यंत सरकारनं उर्वरीत २ मागण्या पूर्ण कराव्यात अन्यथा पुन्हा आंदोलन सुरू करणार, असा ईशारा मनोज जरांगे यांनी दिलाय. यावेळी त्यांनी संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणात सरकारवर गंभीर आरोप केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठोस पुरावे मिळत नाही, तोपर्यंत धनंजय मुंडेंवर कारवाई न करण्याची भूमिका घेतलीय. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना सरकार सोडून देणार असल्याचा खळबळजनक दावा मनोज जरांगे यांनी केलाय. संतोष देशमुख हत्या प्रकरणात पुराव्यांशी छेडछाड करण्यात सरकारचा सहभाग आहे का? असा सवाल देखील त्यांनी केलाय. महादेव मुंडे यांच्या पत्नीनं आंदोलन करण्याचा ईशारा दिलाय. यावर बोलताना धनंजय मुंडेंची भावजय असताना त्यांच्यावर अशी वेळ येऊ नये. ही धनंजय मुंडेंसाठी शरमेची बाब आहे. मात्र गरज पडली तर मी महादेव मुंडेंच्या पत्नीच्या पाठीशी उभं राहणार, असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीसांचा निषेध**

मुंबईत अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्घाटन केलं. हिंदू आणि मराठ्यांच्या नावाखाली यांना सत्ता लागते. तुम्ही स्मारक बनवू शकले नाही, त्यामुळे तुमचा निषेध करतो, असं म्हणत मनोज जरांगे यांनी निषेध नोंदवला.

# पूजा खेडकर यांना कोर्टाचा दिलासा

## १७ मार्चपर्यंत अटक करता येणार नाही

**नवी दिल्ली : आयएएस प्रशिक्षण कालावधीतच वादग्रस्त ठरलेल्या पूजा खेडकरला अखेर सर्वोच्च न्यायालयात अटकेपासून मोठा दिलासा मिळाला आहे. पूजा खेडकर यांना आता १७ मार्चपर्यंत अटक करता येणार नाही.**

सर्वोच्च न्यायालयाने अटकेपासून संरक्षण मिळण्यासाठीची मुदत वाढवली आहे. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर यांना तपासात सहकार्य करण्यास सांगितले आहे. दरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांनी या प्रकरणात उत्तर दाखल करण्यासाठी काही वेळ मागितला. यानंतर न्यायालयाने तीन आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले.न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर यांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होईल. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर यांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत.

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ,**
१३२/ब,भोसलेनगर, कृषि परिषद इमारत, पुणे - ४११००७
दूरध्वनी क्र. ०२०-२५५२८५१९/८११९
ई मेल: cetmauebpune@gmail.com
**निवेदन - १**
**(PG-CET-2025)**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी **(PG-CET-2025)** प्रवेशासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळामार्फत सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५ माहे मे, २०२५ मध्ये घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया **दि. १५.०२.२०२५ ते दि. १०.०३.२०२५** या कालावधीत होणार आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या www.mcaer.org या संकेतस्थळावर उपलब्ध लिंक मार्फत ऑनलाईन अर्ज भरावेत.

**स्थळ : पुणे** — स्वाक्षरीत /-
**दिनांक : १५.०२.२०२५** — **नियंत्रक**
आरओसी-2024-25/**क्र**-5/C६४०६ — **महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ, पुणे**

**ग्रामपंचायत कार्यालय खेडगाव ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**
**जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय खेडगाव ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, १५ वा वित्त आयोग, व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक १४/०२/२०२५ पासून ते २०/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय खेडगाव, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत. .

**ग्रामपंचायत अधिकारी** — **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय खेडगाव ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत लालपाडी/चेहडी खुर्द, ता. निफाड जि.नाशिक**
**ई जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रुप ग्रामपंचायत लालपाडी/चेहडी खुर्द, ता. निफाड जि.नाशिक येथे १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत सी. सी. टिव्ही कॅमेरा बसवणे. याकामाकरिता **B-1** टेंडर प्रमाणे निविदा प्रसारित करण्यात येत आहे. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालयात सादर करण्याचा कालावधी दिनांक १५/०२/२०२५ ते २०/०२/२०२५ आहे. अधिक माहितीसाठी ग्रामपंचायत कार्यालयाशी निविदाधारकांनी संपर्क करावा. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रुप ग्रामपंचायत लालपाडी/चेहडी खुर्द, ता. निफाड जि.नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे

**सही/- प्रशासक** — **सही/-ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत लालपाडी/चेहडी खुर्द, ता. निफाड जि.नाशिक**

**ग्रामपंचायत वडनेर भैरव ता. चांदवड जि. नाशिक**
**निविदा जाहीर निविदा सूचना क्र. ०३/२०२४-२५**
**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासननिर्णया नुसार)**

ग्रामपंचायत वडनेर भैरव ता. चांदवड जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा १५/०२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २०/०२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २१/०२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत वडनेर भैरव ता. चांदवड जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

1) CONSTRUCTING SHED AT VADNER BHAIRAV TAL CHANDWAD DIST NASHIK Est. 236000/- 2) CONSTRUCTING SHED AT VADNER BHAIRAV TAL CHANDWAD DIST NASHIK Est. 300000/- 3) CONSTRUCTING INTERNAL CEMENT CONCRETE ROAD AT VADNER BHAIRAV TAL CHANDWAD DIST NASHIK Est. 200000/-

**सरपंच ग्रामपंचायत** — **अधिकारी**
**ग्रामपंचायत वडनेर भैरव ता. चांदवड जि. नाशिक**

# पीओपीची गणेशमूर्ती बनविणे किंवा विसर्जन करण्यावर बंदी

## पुणे महापालिकेची नियमावली जाहीर



**पुणे : प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती बनविण्यावर उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. त्यानुसार महापालिकेने सुधारित नियमावली जाहीर केली आहे. त्यामध्ये पीओपीची मूर्ती बनविणे किंवा विसर्जन करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.**

या नियमाचे उल्लंघन केल्यास पर्यावरण अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे पुढील वर्षाच्या मूर्तिकारांना आता शाडू मातीच्या मूर्ती बनवाव्या लागणार आहेत. केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे २०२० मध्ये गणेशमूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली होती. त्यास अनुसरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नियमावली जाहीर केली होती. यासंदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती. या याचिकेच्या ३० जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीत विविध सण-उत्सावांदरम्यान सर्व महापालिका, सर्व जिल्हाधिकारी यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांतील कलम २ नुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करणे यावर पूर्णपणे बंदीच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश अतिरिक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी काढले आहेत.

पालिकेने तयार केलेल्या सुधारित नियमावलीत पीओपीपासून तयार करण्यात आलेल्या मूर्ती बनविणे अथवा विसर्जित करणे यावर पूर्णपणे बंदी असेल. महापालिका क्षेत्रात मूर्ती या नैसर्गिक, पर्यावरणपूरक जैवविघटक पदार्थांपासून कराव्यात. प्लास्टिक, थर्माकोल, पीओपीचा समावेश नसणाऱ्या मूर्ती तयार करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

रंग जैवविघटनशील आणि बिनविषारी नैसर्गिक असावेत, विषारी व अविघटनशील रासायनिक रंग, ऑइलपेंट्स, कृत्रिम रंग वापर करू नये. पूजेसाठी फुले, वस्त्र, पूजा साहित्य पर्यावरणपूरक असावे. मूर्तींचे दागिने बनविताना वाळलेल्या फुलांचे घटक, पेंढा इत्यादींचा वापर करावा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणाऱ्या मूर्तिकारांकडून, विक्रेत्यांकडून नागरिकांनी मूर्ती खरेदी करावी, या बाबींचा समावेश आहे.

**जाहीर निवेदन**

तमाम सर्व नागरीकांना कळविण्यात येते की,
**कै.हेमलता डेवीड शिंदे**, रा.फ्लॅट नं.७, अरुणागिरी अपार्टमेंट, होलाराम कॉलनी, नाशिक-२ येथील रहिवाशी असून त्यांचे **दिनांक २१/०६/२०२३** रोजी निधन झालेले आहे. त्यांचे पश्चात खालील प्रमाणे वारस असलेबाबत अर्जदार यांनी नमुद कले आहे....

| अ.नं. | वारसाचे नांव | वय वर्षे | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | प्रितीलता डेवीड शिंदे | ५० | मुलगी |
| २) | श्री.पदमराज डेवीड शिंदे | ५३ | मुलगा |

हे कायदेशीर वारस असुन याव्यतिरिक्त इतर अन्य कोणीही वारस नसलेबाबत अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्रासह अर्ज दाखल केला आहे. तरी कोणाचीही काही हरकत असल्यास मा.तहसिलदार सो. नाशिक यांचेकडे **सात दिवसांचे आत** लेखी खुलासा करावा. अन्यथा मा. तहसिलदार सो.नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र शासकीय कामकाजासाठी देण्यात येणार आहे.

(शिक्का) — सही/-
**तहसिलदार, नाशिक**

प्रोसेस जमा — **जाहीर नोटीस** — निशाणी नं.-०५
**ॲड. श्रीपाद मधुकर जोशी ॲण्ड असोसिएट्स**
**दि. चौ. अर्ज नं. ९/२०२५**

**सिन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात...**
**श्री. अरुण निवृत्ती सानप व इ.** — **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** — **सा.वाले**

अर्जदार यांचे जनक वडील **नामे निवृत्ती दामु सानप** हे **दि.१०/१२/२०२४ रोजी** मयत झाले असून त्यांना कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं. १ ते ३ हे आहेत. मयत निवृत्ती दामु सानप यांची मालकीहक्काची मौजे माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिन्नर (माळेगाव एमआयडीसी) मध्ये औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र. ओ-३५ व बी-१०२** ही होती. **मयत निवृत्ती दामु सानप** यांचे मृत्यूनंतर सदर **भुखंड क्र. ओ-३५ व बी-१०२** चे रेकॉर्डला मयत निवृत्ती दामु सानप यांचे वारसाची वारसनोंद होणेकामी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झाल्याने अर्जदार यांचे लाभात वारस दाखला दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज मे. न्याया. दाखल केला आहे.

सबब याकामी कुणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी या मे. न्यायालयात **दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** स्वतः अगर वकिलामार्फत हजर होऊन आपले म्हणणे व हरकती मांडाव्यात. वरील तारखेस हजर न राहिल्यास अर्जदार यांना वारस दाखला देण्याचा हुकुम करण्यात येईल.

ही जाहीर नोटीस आज **दिनांक १२/०२/२०२५ रोजी** आमचे सहीनिशी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय, क. स्तर, सिन्नर** — (शिक्का) — आदेशावरुन सही/- **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय, क. स्तर, सिन्नर**

निशाणी नं.६ **जाहीर नोटीस**
**दिवाणी चौकशी अर्ज नं.८८/२०२५**
**ॲड.संतोष बाबुराव जथे**
चें.नं.३१२, बिल्डींग नं.१
जिल्हा न्यायालय, नाशिक-२

**नाशिक येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब,(वरिष्ठ स्तर)नाशिक** यांचे कोर्टात...

**१) श्री.गणेश पांडूरंग धांडे** )
**२) श्री.निलेश वसंत धांडे** )
**३) श्री.गिरीश वसंत धांडे** ) **अर्जदार**
**४) श्री.तुषार मनोहर धांडे** )
**५) श्री.विनय मनोहर धांडे** )
**६) श्रीमती रजनी मनोहर धांडे** )
**विरूद्ध**
**कोणीही नाही** ) **सामनेवाले**

अर्जदार नं.१ यांची बहीण, अर्जदार नं.२ ते ५ यांची आत्या तसेच अर्जदार नं.६ याची नणंद नांमे **कै.पुष्पा पांडूरंग धांडे** याचा मृत्यु दि.२१/०९/२०१० रोजी पनवेल, जि.रायगड येथे झालेला असून त्यांचेपश्यात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं.१ ते ६ हेच आहेत. मयताचे नांवे नाशिक येथिल सिडकोचे **योजना क्र.५** मध्ये **घर नं.एन-५३/व्हीजी/०९-१०** हे घर आहे. या मिळकतीचे अनुषंगाने अर्जदाराचे नांवे वारस दाखला (**Heirship Certificate**) मिळण्यासाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी या मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

सबब, याकामी कुणाची कसलीही काहीएक हरकत असल्यास त्यांनी या मे. कोर्टात **दि.०२/०४/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता** स्वत: अगर वकीलांमार्फत हजर होवून आपले म्हणणे व हरकती मांडाव्यात. वरील तारखेस हजर न राहिल्यास अर्जदार यांना वारस दाखला (**Heirship Certificate**) देण्याचा हुकूम करण्यात येईल.

ही जाहीर नोटीस आज दि.१३/०२/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे. नाशिक.

सही/- **कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, नाशिक — (कोर्टाचा शिक्का) — सही/- **अधिक्षक,** दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक

# वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात गोड द्राक्षांची आवक सुरु

**नवी मुंबई :** वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत डिसेंबर-जानेवारीपासून तुरळक प्रमाणात द्राक्षे दाखल होण्यास सुरुवात झाली होती. परंतु ती द्राक्षे चवीला आंबट होती. आता उष्णता वाढायला सुरुवात झाल्याने गोड द्राक्षे बाजारात दाखल होण्यास सुरुवात झालेली आहे.नोव्हेंबर महिन्यात द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होते. तसेच जानेवारी मध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते. साधारण १५ नोव्हेंबर नंतर द्राक्षची आवक सुरू होते.

**श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, देवळा**
धनसुगंध, सटाणा रोड, ता. देवळा जि.नाशिक फोन नं. (०२५९२)२२८२६३

## कर्जाकरिता गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या गहान घेणेचे मिळकतीचे संबंधाने कळविण्यात येते की,
**१) मौजे : ठेंगोडा,** ता. बागलाण जि.नाशिक येथील गट नं. ३९/१/३९/२ पैकी प्लॉट नं.४३ पैकी क्षेत्र १.०३.५० आर चौ.मी. आकार १०३५.०० रु. यांसी चतु:सिमा : महसुली रेकॉर्ड प्रमाणे. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही मंगल मच्छिंद्र कुंभार व चंद्रकला राजु कुंभार, रा. ठेंगोडा ता. बागलाण जि. नाशिक यांचे मालकी व कब्जे वहिवाटीतील अशी मिळकत आहे.
२) कर्जदाराचे नांव : मंगल मच्छिंद्र कुंभार, रा. ठेंगोडा ता. बागलाण जि.नाशिक
३) सहकर्जदाराचे नांव : श्री. मच्छिंद्र डोंगर कुंभार
४) संमतीदाराचे नांव : चंद्रकला राजु कुंभार
५) नोटीसीचा उद्देश : टायटल व्हेरिफिकेशन
६) वरील कर्जदार यांनी श्रीमान सुगनमलजी सुराणां व्यापारी सहकारी पतसंस्था मर्या., देवळा मुख्य शाखा - देवळा यांचेकडून वर नमुद केलेली मिळकत कर्जदार यांनी कलम १ मधील मिळकत गहाण / तारण देवून कर्जाची मागणी केली आहे.
७) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली कर्जदार व संमतीदार यांचे हिश्याची मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे सांगून कर्ज मागणी केलेली आहे. वरील मिळकतींवर श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्या., देवळा यांचे दि.०५/०१/२०२२ रोजीचे रक्कम रु.५,००,००० /- चे कर्ज आहे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्कम, अधिकारी साठेखत, करारनामा, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, वारसहक्क, मनाई हुकूम, कोर्ट जप्ती वगैरे स्वरूपाचा काही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर व संस्थेच्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे व साक्षी पुराव्यानिशी समक्ष येवून लेखी हरकत नोंदवावी.मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात हरकत प्रसिद्ध केल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून गहाण/तारण घेतली जाईल व कर्जदाराचे मागणीनुसार कर्ज वितरण केले जाईल. त्यानंतर कोणाचेही काही ऐकुण घेतले जाणार नाही. करिता जाहिर नोटीस असे.
**स्थळ : सटाणा**
**दिनांक : १३/०२/२०२५** **श्री. महेश दिनकर जोशी, व्यवस्थापक**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**
**ॲड. के.पी. भदाणे**
**दिवाणी न्यायालयासमोर, सटाणा ता.बागलाण जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय पांडाणे, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

## जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय पांडाणे ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, स्वच्छ भारत मिशन,१५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक १४/०२/२०२५ पासून ते २०/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय पांडाणे, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय पांडाणे ता. दिंडोरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत धारणगाव खडक , ता. निफाड, जि. नाशिक**

## जाहीर ई निविदा सूचना क्र.२/२०२४-२५

ग्रामपंचायत धारणगाव खडक, ता. निफाड जि. नाशिक येथे १५ वित्त योजने अंतर्गत विविध विकास कामांसाठी ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. निविदा भरण्याची दिनांक १०/०२/२०२५ पासून प्रसारित करण्यात आली आहे. अधिक माहिती साठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत धारणगाव खडक , ता. निफाड जि. नाशिक यांच्या कडे राखून ठेवण्यात आले आहे.
**सही /- ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत, धारणगाव खडक , ता.निफाड, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय, विल्होळी ता. नाशिक जि. नाशिक**

## ई- निविदा सुचना क्र. ०४ आणि ५/२०२४-२५ ( प्रथम प्रसारण)

सरपंच, ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत विल्होळी ता. नाशिक, जि. नाशिक येथे विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद व बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादाराकडून ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून दि.१४/०२/२०२५ ते २१/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत..
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत विल्होळी, ता.नाशिक, जि.नाशिक** **सरपंच, ग्रामपंचायत विल्होळी, ता.नाशिक, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय मोहाडी,ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

## जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय मोहाडी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, स्वच्छ भारत मिशन,१५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक १४/०२/२०२५ पासून ते २०/०२/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय मोहाडी, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय मोहाडी ता. दिंडोरी जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः **श्री. स्वप्निल श्री. स्वप्निल भागवत मांडे**, रा. सिंधी, ता.चाळीसगाव,जि.जळगाव यांस **सौ. सुवर्णा स्वप्निल मांडे, द्वारा श्री. वसत वामन देवरे**, रा.देहगाव, पो.वडांगळी,ता.नांदगाव, जि. नासिक यांचेकडून सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की- तुझा व माझा विवाह हिंदुधर्मशास्त्र व जातीरिवाजानुसार मौजे रा. देहगाव, पो.वडांगळी, ता.नांदगाव, जि. नासिक येथे **दिनांक ११/०६/२०२०** रोजी झालेला असून विवाह संबंधातून एक अपत्य मुलगा नामे **अर्नव वय ३ वर्ष** हा झालेला आहे. सुरुवातीपासूनच तुम्हांला दारूचे व्यसन असल्याने दारुच्या नशेत वेळोवेळी जिवे मारहाण करुन फारकतीची सतत मागणी करुन त्रास देत असत. त्यानंतर तुम्ही माझ्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण शिवीगाळ करुन फारकतीची मागणी करुन हाकलून दिले आहे. त्यादरम्यान तुम्ही बाहेरख्याली असल्यामुळे एक बाई ठेऊन घेतली. महिना महिना तुम्ही घरी येत नसत. आल्यानंतर दारु पिऊन जिवे मारहाण करुन फारकतीची मागणी करुन तुम्ही मला सुमारे अडीच वर्षापुर्वी माहेरी हाकलून दिले आहे. त्यानंतर मी तुमच्याविरुध्द कोर्टात केसेस केल्यात. कोर्टातील केसेसलाही तुम्ही जुमानत नसत. तरी तुम्ही सतत फारकतीची मागणी करीत असत. मला नांदण्यास घेण्यास कधीही आला नाहीत व मुलांची देखील कधीही विचारपूस केली नाही व देखभाल केली नाही. मी व माझे नातेवाईक तुमच्याकडे मला नांदण्याकामी बऱ्याचवेळा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळी तुम्ही फारकतीची मागणी सतत ठेवली. त्याअर्थी तुम्ही माझा व माझ्या मुलांचा त्याग केलेला दिसून येत आहे. सबब तुम्हांस सदरचे जाहीर फारकत नोटीसीने कळविण्यात येते की- सदरची जाहीर फारकत नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे तुम्ही मला वरील प्रकार पुन्हा करणार नाही असा लेखी दस्त पंचासमक्ष लिहून देऊन नांदण्यास घेऊन जावे. वरील मुदतीत तुम्ही वागला नाहीत तर हिच जातीरिवाजानुसार जाहीर फारकत समजण्यात यावी व त्यानंतर जो तो दुसरा घरोबा करण्यास मोकळा राहील. कळावे ही जाहीर फारकत नोटीस. सटाणा दिनांक १४/०२/२०२५
**सौ. सुवर्णा स्वप्निल मांडे, द्वारा श्री. वसत वामन देवरे, रा. देहगाव, पो. वडांगळी, ता. नांदगाव, जि. नाशिक**
**नोटीस आमचे मार्फत प्रतिसध्दीस रवाना**
**ॲड चंद्रकांत नामदेव आहिरे**
**सटाणा कोर्ट (नाशिक)**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ नुसार प्रोसेस जमा** **श्रीमती. किरण के. देवरे, (पवार) ॲडव्होकेटस सटाणा (नाशिक)**
**जा.क्र.३३९/२०२५ दि.१३/०२/२०२५ वारसा प्रमाणपत्र नं.३२/२०२५**
**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात....**
**१) श्री. दिपक अभिमन वनिस, वय - ४९ वर्षे, २) श्री. जितेंद्र अभिमन वनिस**, वय - ४३ वर्षे, दोघांचा धंदा - मजुरी दोघे रा. ताहाराबाद, ता. बागलाण, जि. नाशिक दोघे ह.मु. - रुम नं. ७१५, महादेव नगर -१, डिंडोली, सुरत सिटी, ता. चौन्यासी, जि सुरत, (गुजरात) **अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणीही नाही** **सा. वाला**
ज्याअर्थी अर्जदार हे मुळ ताहाराबाद, ता. बागलाण, जि. नाशिक येथील रहिवासी आहेत. अर्जदारांचे वडील कामधंद्यानिमित्त सुरत येथे गेले होते. अर्जदार नं. १ व २ यांची आई **सुनंदाबेन अभिमन वनिस** ही **दि. ०१/०९/२०१६** रोजी महादेवनगर १, डिंडोली, सुरत येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार नं. १ व २ यांचे वडील **अभिमन नानाजी वनिस** हे **दि. २८/११/२०२४** रोजी महादेवनगर १, डिंडोली, सुरत येथे मयत झाले आहेत. **कै. सुनंदाबेन अभिमन वनिस व कै. अभिमन नानाजी वनिस** यांचे मृत्यु पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस असले बाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. अर्जातील अर्जदार हे मयत **कै. सुनंदाबेन अभिमन वनिस व कै. अभिमन नानाजी वनिस** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत. याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि.२५/३/२०२५** रोजी स्वतः अगर वकीला मार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करतील मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हपाणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक १०/२/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.
**कामगिरी लिपिक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ नुसार प्रोसेस जमा** **ॲड. रेखा महेंद्र शिंदे, सटाणा, जि.नासिक**
**जा.क्र.३४७/२०२५ दि.१३/०२/२०२५ वारस प्रमाणपत्र नं.३५/२०२५**
**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात.......**
**१) श्रीमती ज्योती प्रदिप आहिरे**, वय-४१ वर्षे, **२) कु. वैशाली प्रदिप आहिरे**, वय २० वर्षे **३) कु. दिपाली प्रदिप आहिरे**, वय-१८ वर्षे, **४) चि. किशोर प्रदिप आहिरे**, वय- १६ वर्षे, नं. ४ ची अ.पा.क. जनकआई अर्जदार नं. १ सर्व रा. श्रीपुरवडे, ता.बागलाण, जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** **सा.वाला**
ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदारनं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ४ यांचे वडील नामे **प्रदिप यादवराव आहिरे** हे **दिनांक २३/०९/२०२०** रोजी **मौजे नासिक**, ता. जि.नासिक येथे मयत झालेले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे कथन करुन अर्जदारांनी मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **प्रदिप यादवराव आहिरे** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक २८/३/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ११/०२/२०२५** रोजी माझी सही व मे, कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे
**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय सटाणा, नाशिक**

**✻ शिरुर :** नातेवाईकांच्या लग्नास जाण्यास नकार दिल्याने महिलेचा खून करण्यात आल्याचा प्रकार शिरुरमधील गणेगाव खालसा येथे घडला. पती फरार झाला असून पोलीस तपास करत आहेत. मीनाबाई ज्ञानेश्वर गांगुर्डे (वय २७, रा. गणेगाव तालुका, शिरूर) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. पती ज्ञानेश्वर आत्माराम गांगुर्डे हा फरार झाला आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय कोटमगाव ता. जि. नाशिक**

## जाहीर लिलाव सूचना

तमाम जनतेला याद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत कार्यालय कोटमगाव अखत्यारीतील भंगार जाहीर लिलाव **दि. २२/०२/२०२५ रोजी १०.३० वाजता** ग्रामपंचायत कार्यालय कोटमगाव या ठिकाणी करणेत येणार आहे.

| अ.क्र. | तपशील | नग | संख्या | इतर | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पत्रे लोखंडी, चॅनल दरवाजे खिडक्या | - | ३० | ५ | ग्रा.पं.कार्यालय, कोटमगाव |

**निविदाबाबत अटी व शर्ती**
१) लिलावाची बोली ज्यांचे नावे जास्तीत जास्त होईल ती मंजुरीस पात्र असे.
२) लिलाव मंजूर होताच सर्व रक्कम तात्काळ भरणेची आहे.
३) लिलावातील मंजूर साहित्य/वस्तू/बाबत वाहतूक अन्य परवानगीची आवश्यक ती कायदेशीर पूर्तता स्वता लिलावधारकाने करावयाची आहे.
४) लिलावास पुरेशी उपस्थिती नसल्यास तसेच निर्धारित किमतीपेक्षा कमी असल्यास लिलाव करण्यात येणार नाही.
५) यासबंधीचे सर्व अधिकार मंजूर /ना-मंजूरसह खाली सही करणार यांनी राखून ठेवलेले आहे.
स्थळ- कोटमगाव ता. जि. नाशिक
**सरपंच ग्रामपंचायत अधिकारी** **उपसरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय कोटमगाव ता. जि. नाशिक**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/२५४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.१६/०१/२०२५
एस.आर.एन.क्रमांक NSK/33400/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री.यशवंत बहुउद्देशिय सामाजिक व शैक्षणिक संस्था, सटाणा बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-को-विलास केदा बच्छाव,** अट पोस्ट- ताहाराबाद रोड, सटाणा, बागलाण, जि. नाशिक
**अर्जदार- मनोज विलास बच्छाव.**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH IN HAND | १४०७.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. १४०७/- मात्र
(अक्षरी रुपये एक हजार चारशे सात मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४-११-२०२५ रोजी दिली.
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/४०७/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.२७/०१/२०२५
एस.आर.एन.क्रमांक NSK/46080/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक नाशिक ॲग्रिकल्चरल सोशल असोशिएशन बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-को-दामोदर नारायण मानकर,** अट पोस्ट- शॉप नं. १६ मार्केट यार्ड एम महालक्ष्मी दिंडोरी, रोड,नाशिक
**अर्जदार- गोकुळ दामोदर मानकर.**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH IN HAND | २६१३.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. २६१३/- मात्र
(अक्षरी रुपये दोन हजार सहाशे तेरा मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७-०१-२०२५ रोजी दिली.
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/४२०/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.२७/०१/२०२५
एस.आर.एन.क्रमांक NSK/33967/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक पुरूष स्वाभिमानी फाऊंडेशन बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-को. रांजना मनोज दाभाडे, अट-पोस्ट-** शॉप नं.बी.८०८१ रुंग्टा शॉपी हब अपार्टमेंट, सूर्या ए,नाशिक
**अर्जदार- संकेत मनोज दाभाडे.**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | CASH IN HAND | १४०७.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. १४०७/- मात्र
(अक्षरी रुपये एक हजार चारशे सात मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४-०१-२०२५ रोजी दिली.
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/६२३/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.११/०२/२०२५
एस.आर.एन.क्रमांक NSK/32555/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक बँकिंग अँड फायनान्स होम लोन कौन्सिल अँड ऑल चॅनल पार्टनर वेल्फेअर असोसिएशन बाबत**
**न्यासाचा पत्ता :- द्वारा- केदारनाथ बालमुखन बडोदे,** शॉप नं.बी.५१२, बिजनेस प्लाझा, आडगाव नाका, पंचवटी नाशिक.
**अर्जदार- केदार बालमुखन बडोदे.**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | NIL | NIL | NIL | NIL | NIL | 0.00 |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०६-०२-२०२५ रोजी दिली.
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

# किरकोळ वादातून तरुणाची हत्या

**मुंबई:** किरकोळ वादातून तरुणाची हत्या करण्यात आली आहे. शिवी दिल्याचा राग आल्यामुळे एका व्यक्तीने आपल्या मित्राची हत्या केली. याप्रकरणी अंधेरी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. याप्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंधेरी पूर्वेकडील कोल डोंगरी परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे. कोल डोंगरी सहार रोडवरील यशोधन सोसायटीच्या मोकळ्या जागेत सुजित सिंग आणि सुनील परशुराम कोकाटे वर्षे) हे गप्पा मारत बसले होते.

## नोटीस

**मॉडेल कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,** पत्ता: मॉडेल कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक- ४२२००५ संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या भूखंड व बंगला क्र. १० धारण करणाऱ्या **श्रीमती शारदा माधव जोशी** यांचे **तारीख २२/०४/२०२३** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमतेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक मागण्या/ हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून **१५ (पंधरा)** दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्ट्यार्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक मागण्या किंवा हरकत सादर केल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक/मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारास/हक्कदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचकडे सकाळी १०:०० ते संध्याकाळी ०५:०० पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासुन नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.
**सचिव**
**मॉडेल कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**यांच्या करीता आणि वतीने**
**सचिव मॉडेल कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक**
**७, अनुबंध बंगला, मॉडेल कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक-४२२००५**
**ठिकाण: नाशिक**
**दिनांक : १४/०२/२०२५**

## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशनकरीता)

**चाचडगाव, ता.दिंडोरी येथील गट नं.१९/३ बाबत**
तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते कि, **मिळकतीचे वर्णन:** तुकडी जिल्हा परिषद नाशिक पोट तुकडी तालुका पंचायत समिती दिंडोरी पैकी स्वतंत्र **ग्रामपंचायत-चाचडगाव** या गावचे शिवारातील **शेतजमीन गट न.१९/ ३ यांसी क्षेत्र हे.०-९५ आर, पोटखराबा हे.०-०१ आर,एकूण क्षेत्र हे.०-९६ आर** ही मिळकत सतीश वामन शिंदे याचे स्वतंत्र मालकी, कब्जा, वहिती उपभोगातील अशी असून निर्वेध व बिनबोजाची आहे, असे आमचे पक्षकार याना सांगून त्यांनी आमचे पक्षकाराबरोबर कायमचे फरोक्त खरेदीखताचा व्यवहार करून आमचे पक्षकाराकडून विसाराची रक्कम स्वीकारलेली आहे, तरी सदरहू मिळकती बाबत कोणाचा काही हक्क,हितसंबंध असल्यास त्यांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत कागदपत्रासह व उपलब्ध पुराव्यासह आमचे खालील पत्यावर लेखी हरकती नोंदवाव्यात, सदरहू मुदतीत कोणीही हरकत नोंदविली नाही तर सदर मिळकत हि निर्वेध व बिनबोजाची समजून सदरहू मिळकतीचे खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील व नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार एकूण घेतली जाणार नाही,परस्पर वर्तमानपात्रात पत्रात प्रसिद्ध केलेली हरकत विचारात घेली जाणार नाही,याची नोंद घ्यावी,कळावे हि जाहीर नोटीस
**दि:१४/०२/२०२५**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**
**श्री.शिवाजी वामनराव गायकवाड (ॲडव्होकेट)**
**दिंडोरी कोर्ट, मु.पो.ता.दिंडोरी जि.नाशिक मो.९८६००२१९२५**

**ग्रामपंचायत विल्होळी, ता. जि. नाशिक Psngpvilholi@gmail.com**

## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत विल्होळी ता.जि. नाशिक येथे मारुती मंदीर सार्वजनिक चौक परिसरात कॉंक्रीट रस्ता क्रॉसिंग करून भुमीगत लघुदाब विद्युत वाहीनी टाकणे करीता अधिकृत विद्युत पुरवठादार/अधिकृत विद्युत कंत्राटदार यांचेकडून योग्य दरात पुढीलप्रमाणे सिलबंध निविदा दर मागवण्यात येत आहे
1 ) L.T. Mini Feedar Pillar 100 A Fuse - Qty. 1
2) LT XLPE Armoured cable 3 1/2C X 120 sq mm-Qty-200 RMT.
3 ) Concreting ration 1:4:8 - Qty.1 cmt
4) misc. for XLPE U/G Cable- Qty 1 LS ग्रामपंचायत
5 ) Misc (Bricks, Termination Kit. etc- Qty - 1 LS
6)- Dismentalling Charges & Material . transportation- Qty -1LS
7) Erection on material -
9) Laying of cable for Dambri Road - Qty - 100 Running Mtr
10 कामाचे अनुशंगाने इतर किरकोळ मटेरियल आणि लेबर चार्ज.
वरील प्रमाणे साहित्य/मजुरी दर योग्य दरात सिल बंद निविदामध्ये ७ दिवसांच्या आत ग्रां. पं. विल्होळी येथे कार्यालयीन वेळेत मागवण्यात येत आहे.
**अटी व शर्ती १)** शासन नियमाप्रमाणे सर्व टॅक्स कपात करण्यात येतील.
२) निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
३) साहित्य पुरवठा विषयी सविस्तर माहिती ग्रापं कार्यालयात उपलब्ध आहे.
**ग्रामविकास अधिकारी** **उपसरपंच** **सरपंच**
**ग्रामपंचायत विल्होळी ता.जि.नाशिक**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **राम वाळूपाटील जोपळे (ॲडव्होकेट)**
**दिवाणी चौकशी अर्ज नं : ०५/२०२५**
**नाशिक येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब,वरिष्ठ स्तर नाशिक यांचे न्यायालयात,**
**श्री.काशिनाथ लक्ष्मण गायकवाड,**
वय-५२,धंदा- शेती, रा.श्रीभुवन,ता.सुरगाणा,जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** **सामनेवाले**
**अर्ज:- बॉम्बे रेग्युलरेशन अँक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये.वारस दाखला मिळणेबाबत.**
ज्याअर्थी अर्जदार यांनी लक्ष्मण महादू गायकवाड हे ता.२१/१२/२०२४ रोजी श्रीभुवन,ता.सुरगाणा, जि.नाशिक येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यु पश्चात त्यांचे नांवे असलेले श्रीभुवन, ता.सुरगाणा, जि.नाशिक येथील शेतजमीन मिळकती गट नंबर १०,१८,२१,२४ चे रेकॉर्डला वारस नोंद होणेकामी अर्जदार यांनी लक्ष्मण महादू गायकवाड चे मृत्युपश्चात अर्जदार हे कायदेशिर वारस आहे, असा वारस दाखला मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी सदर अर्जदारांना ते **लक्ष्मण महादू गायकवाड** यांचे कायदेशिर वारस आहेत, असा वारस दाखला अर्जदारास देणेबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी स्वतःअगर वकीलामार्फत **ता.२१/०३/२०२५** रोजी **सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात उपस्थितीत राहून म्हणणे मांडावे, आपण हजर राहीला नाही अथवा कोणाचीही हरकत आली नाही तर सदरचे अर्जदारांना त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदरचे वारस दाखल्याबाबत आवश्यक ते हुकुम करेणत येतील, याची नोंद घ्यावी, आज **दि.१३/२/२०२५** रोजी मे. न्यायालयाचे आदेशान्व्ये व शिक्क्यानिशी दिली असे.
**कामगिरी लिपिक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिंडोरी** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिंडोरी**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/३३१४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.२६/०८/२०२४
एस.आर.एन.क्रमांक NSK/28519/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक अरुण केशव शैक्षणिक संस्था बाबत।**
**न्यासाचा पत्ता :- द्वारा- अरुण केशव लिंबकर,** घर नं. २८७, स.नं.३६९, मु.पो. पाथर्डी गाव, मारुती मंदिराच्या जवळ, पाथर्डी, देवळाली रोड, नाशिक.
**अर्जदार- अरुण केशव लिंबकर**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६-०८-२०२४ रोजी दिली.
**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**नाशिक जवळ ऑटोमेटीक करुगेटेड बॉक्स फॅक्टरी साठी अनुभवी स्टाफ व मशिन ऑपरेटरर्स पाहिजेत.**
1) Quality Inspectors
2) Stores / Dispatch Staff
3) Data entry operator
For all above 3 posts, Minimum 2 years experience in industry. & Computer operation knowledge is must.
4) विविध ऑटोमेटीक करुगेटेड बॉक्स मशीन्स वर काम करणारे अनुभवी ऑपरेटर पाहीजेत.
5) Diploma Engineering Apprentice पाहिजेत
CONTACT / WHAT'S UP YOUR BIODATA 8291706764.

### विकणे आहे
शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

### पाहिजेत
हॉस्पिटल करिता अनुभवी नर्स, हॉस्पिटल ब्रदर,वॉर्ड बॉय पाहिजे, संपर्क - ९१६८४३३५३३, ह्रदयस्पर्श मल्टिस्पेशालिटि हॉस्पिटल, द्वारका, काठेगल्ली, सिग्नल जवळ.फोन-०२५३४०५८०६४

### नोकरीविषयक
त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

### ज्योतिष
गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### विकणे आहे
जनरल वैद्य नगर, द्वारका येथे नवीन २ बीएचके फ्लॅट विकणे आहे. संपर्क - ९७४१०८८४४५

### नावात बदल
मी सौ. प्रिया अर्जुन राज सदर पत्रकाद्वारे कळवू इच्छिते की, माझे लग्नापूर्वीचे नाव प्रिया अशोककुमार जैन असे होते. आता यापुढील सर्व व्यवहार **सौ. प्रिया अर्जुन राज** या नावानेच राहतील.
**आधार क्रमांक ३४८२ ०८३७ २०५१ नुसार**

### नोकरीविषयक
नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### वधू पाहिजे
**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

### ब्राह्मण वधू पाहिजे
**अजिंक्य अविनाश वैद्य**
वय २९, उंची ६.१ भारद्वाज, ऋग्वेदी, गहू, देव, मकर, श्रवण, अंत्य,दुसरे A+,शिक्षण BSC -CHEM सरकारी, पोस्टमन, राहुरी, जिल्हा अहमदनगर, वा. उत्पन्न. ५२५०००/-, अपेक्षा -पदवीधर, सुसंस्कृत, मनमिळाऊ, पत्ता- अविनाश रामचंद्र वैद्य, दत्तनगर, बेलापूर रोड, कोल्हार बु, तालुका-राहाता, अहमदनगर-४१३७१० **मोबाईल व्हाट्सअप -९५५२२७७०९७ कॉन्टॅक्ट ९५११६८०९९८.**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**

## महत्त्वाचे

### सुन्नी दावत-ए-इस्लामीचा आजपासून दोनदिवसीय मेळावा

**जुने नाशिक : वार्ताहर**

प्रेषित मुहम्मद पैगंबर यांनी दिलेल्या शिकवणीचा प्रसार-प्रचार तसेच सुफी संतांच्या विचारांचे आदानप्रदान करण्याचे उद्देशाने सुन्नी दावत-ए-इस्लामी या संघटनेच्या दोन दिवसीय मेळाव्यास (सुन्नी इज्तेमा) आज (दि.१५) दुपारपासून सुरुवात होणार आहे. शहरातील ईदगाह मैदानावर आज केवळ महिलांसाठी मेळावा होणार आहे. उद्या (दि.१६) सकाळी दहा वाजेपासून पुरुषांचा मेळावा होणार असून उद्या रात्रीच्या सामुदायिक प्रार्थनेत हजारो भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे. मेळाव्यात देश-विदेशातील धर्मगुरू व मौलाना मार्गदर्शन करतील. यात वर्ल्ड इस्लामिक मिशनचे सरचिटणीस तथा मुफ्फकिर-ए-इस्लाम म्हणून प्रसिद्ध मौलाना कमरूज्जमा खान आजमी, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मौलाना शाकीरअली नुरी, प्रा. मौलाना कारी रिजवान खान, मौलाना सय्यद अमिनुल कादरी यांच्यासह स्थानिक धर्मगुरू उपस्थित राहणार आहेत. यावेळी इस्लाम आणि जागतिक शांतता, सुफी संतांची जागतिक शांतीमधील कामगिरी, गरिबी नष्ट करण्यासाठी इस्लामची शिकवण, शिक्षणाला उत्तेजन देणारी इस्लामची भूमिका, महिलांच्या जीवनातील प्राधान्यक्रम, मानवी विकासात महिलांचे स्थान अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहेत.

### आरंभ महाविद्यालयात मातृपितृ दिन



**नाशिकरोड :** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या नाशिकरोड येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलचे आरंभ महाविद्यालयात वेदांत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने मातृपितृ दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर शाळा समितीचे अध्यक्ष रावसाहेब गायधनी, प्राचार्य उमाकांत वाकलकर, उपप्राचार्या संगीता पवार, प्रकाश बोराडे, रंजना नवले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य उमाकांत वाकलकर यांनी केले. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष रावसाहेब गायधनी म्हणाले की, भारतीय संस्कृतीत आई-वडील पूजन हे पहिले दैवत आहे. पाश्यात्य संस्कृतीने आक्रमण केले आहे. आज आरंभ महाविद्यालयात आयोजित मातृपितृ दिवस उपक्रम स्तुत्य आहे. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आई-वडील पालव व गुरुजन यांचे पूजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. नीलेश खैरनार यांनी मानले.

### राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत रचना विद्यालयाचा दिव्यांग विभाग द्वितीय



**नाशिक :** येथील महाराष्ट्र समाज सेवा संघ संचालित रचना माध्यमिक विद्यालयात कर्णबधिर विभाग कार्यरत आहे. सार्वजनिक वाचनालय व साने गुरुजी कथामाला कै. सार्वजनिक वाचनालय, नाशिक बालभवन साने गुरुजी कथामाला कै. रत्नाकर गुजराती स्मृती बालनाट्य स्पर्धा. मानाच्या ढालीचा मानकरी ठरलेला महाराष्ट्र समाजसेवा संघ संचालित रचना विद्यालय अपंग एकात्म शिक्षण योजनेतील कार्णबधिर विभागाने महाराष्ट्र शासन आयोजित सहावी अंतिम दिव्यांग बालराज्य नाट्य स्पर्धा २०२५ या महाराष्ट्रातील एकूण ११ एकांकिका सादर झाल्या. त्यामधून स्पर्धेत रचना विद्यालयातील कर्णबधिर विद्यार्थ्यांनी सादर केलेली एकांकिका त्या एका वळणावरती द्वितीय क्रमांक . ''त्या एका वळणावरती'' या नाटकातील सर्व विद्यार्थी हे कर्णबधिर असून, त्यांना विशेष शिक्षिका सौ. नीता घरत व मीनाक्षी बागल यांचे मार्गदर्शन मिळाले. अभिनय रौप्यपदक : साईराज पाटील, दिग्दर्शन : धनंजय वाबळे,तृतीय क्रमांक, प्रकाशयोजना : कृतार्थ कंसारा, प्रथम क्रमांक यांना मिळाला. या यशाबद्दल महाराष्ट्र समाज सेवा संघ या संस्थेचे अध्यक्ष सुधाकर साळी, उपाध्यक्षा हेमाताई पटवर्धन, सहसचिव पंकज पवार, कोषाध्यक्ष निरंजन ओक, संस्था कार्यकारिणी सदस्य शिक्षक प्रतिनिधी यशवंत ठोके, नीलेश ठाकूर, कीर्ती सावंत, शाळेच्या उपमुख्याध्यापिका सुषमा कुलकर्णी, पर्यवेक्षक शिवदास महाजन व सर्व रचना विद्यालयातील शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

### सुदृढ लोकशाहीसाठी संविधानाचा जाणिवपूर्वक अंगिकार आवश्यक : टकले

**वडाळागाव :** देशाचे संविधान कोणीही बदलणार नाही, बदलू शकत नाही अशी वरवरची भाषा जरी काही राज्यकर्ते करीत असले तरीही संविधान आतून पोखरण्याचे आणि संविधानाला शक्तीहीन करण्याचे काम सातत्याने ते करीत आहेत, हे लक्षात घेऊन प्रत्येक भारतीय नागरिक आणि गाव यांनी संविधानाचा प्रचार, प्रसार व अंगीकार केला, आपल्या दररोजच्या जगण्याचा, व्यवहाराचा भाग संविधान केला तरच लोकशाही सुदृढ होईल आणि राहिल, असा ठाम विश्वास ज्येष्ठ पत्रकार व लेखक निरंजन टाकले यांनी संविधान प्रेमी नाशिककर व एम्स चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिय 'आम्ही भारताचे लोक', या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्ष स्थानावर बोलताना कॉम्रेड राजू देसले म्हणाले की संविधान हा या देशाच्या लोकशाहीचा आत्मा आहे .मात्र तोच नष्ट करण्याचा चंग बांधला जात आहे. म्हणून संविधानासाठी बलिदान देण्याची तयारी आपण सर्वांनीच ठेवली पाहिजे. संविधान हेच त्यांच्या दररोजच्या जगण्याचा भाग बनवण्यासाठी नेटाने प्रयत्न करू, असा ठराव यावेळी सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावाचे वाचन महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे यांनी केले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या सामुदायिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रास्ताविक ॲड. प्रभाकर वायचळे तर सूत्रसंचलन एम्स चॅरिटेबल ट्रस्टचे अजमल खान यांनी केले.

# गोदावरी स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी गोदा रन

**नाशिक : प्रतिनिधी**

**दांडी पौर्णिमेचे औचित्य साधत नाशिक रनर्सकडून स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी सहा किलोमीटर अंतराची गोदा रन संपन्न झाली. या गोदा रनची सुरुवात रामतीर्थ गोदावरी सेवा समिती आयोजित गोदा आरतीनंतर करण्यात आली.**



या सोहळ्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंदार जानोरकर यांनी यशस्वी नियोजन केले व रामतीर्थ गोदावरी आरती सेवा समिती, नाशिकचे प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फड यांनी मदत केली.

गोदावरी आरतीनंतर डॉ. मनीषा रौंदळ यांनी रनर्सचे वॉर्म अफ घेतले. त्यानंतर पंचवटी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड सर यांच्या हस्ते झेंडा दाखवून गोदा रनची सुरुवात करण्यात आली. यावेळी 'गोदावरी माता की जय', 'स्वच्छ गोदा सुंदर गोदा', 'गोदामाईची स्वच्छता आपली जबाबदारी' हा जयजयकार करत गोदा रनची सुरुवात झाली. गंगाघाटावर बुधवारचा बाजार असल्याकारणाने हा रन सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला.

रामकुंड, तपोवनमार्गे रामसृष्टी उद्यान येथील भव्य दिव्य श्रीराम मूर्तीस अभिवादन करून तपोवन मार्गे मोदकेश्वर मंदिर यशवंत महाराज पटांगण येथे रनची समाप्ती झाली. सहा किलोमीटर रन सर्वांनी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

यावेळी सर्व नाशिककर मोठ्या संख्येने, सहकुटुंब या उपक्रमात उत्साहाने सहभागी झाले. डाऊन सिंड्रोम असूनही उत्तम डान्सर ट्रेकर विजय पाटील हा मुलगा देखील या रनमध्ये सहभागी झाला. त्याबद्दल विशेष सत्कार माजी अध्यक्ष नारायण वाघ यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सर्व नाशिक रनरचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे मविप्रच्या शिक्षकांना धडे

**नाशिक :** शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रभावामुळे शिक्षकांना 'एआय'च्या उपयोगाबद्दल जागरूक करणे आणि त्यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे शिकविण्याचे मार्गदर्शन करणे, या उद्देशाने मविप्रच्या आडगाव येथील फिजिओथेरपी महाविद्यालयात शिक्षकांसाठी 'एआय'च्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

ही कार्यशाळा फिजिओथेरपी महाविद्यालय 'आयक्यूएसी सेल'च्या क्लस्टर इंडिया व व्हाइटकोड यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे होते. त्यांनी शिक्षकांना 'एआय'बद्दल जागरूक राहणे किती महत्त्वाचे आहे, हे समजावून सांगितले. शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे व मविप्र कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या प्राचार्या डॉ. अमृत कौर यांचेही मार्गदर्शन लाभले.

या कार्यशाळेसाठी डॉ. अमेय पांगरकर हे प्रमुख वक्ते होते. त्यांनी 'एआय'च्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक करून घेतले. 'एआय' आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे तंत्रज्ञान आहे. याचा उपयोग शिक्षणात कसा होऊ शकतो, हे प्रमुख वक्त्यांनी समजावून सांगितले.



## जनता विद्यालय पवननगर विद्यार्थ्यांचे गेटटुगेदर

**नांदूर गाव : वार्ताहर**

**इयत्ता दहावी म्हणजे प्रत्येकाच्या शैक्षणिक मार्गातील महत्त्वाचा टप्पा. या टप्प्यानंतर प्रत्येकजण आपापल्या योग्यतेनुसार, आवडीनुसार पुढच्या मार्गाची निवड करत असतो. असा हा टप्पा ओलांडून आज विद्यार्थ्यांना २० वर्षे झाली. अर्थातच ते साल होते २००४-२००५. जनता विद्यालय, पवननगर इथून दहावीची परीक्षा दिल्यानंतर बहुतांशी मित्र, मैत्रिणी वेगवेगळ्या मार्गांनी आपापले करिअर करण्यासाठी गेले. करिअरच्या मागे धावत असताना दोस्तांना भेटणं तर दूरच पण बोलणंही नव्हतं. पण व्हॉट्सॲप आणि फेसबुकने मित्रांचा मैत्रीचा पुनर्जन्म घडवला.**

दहावीच्या २००४ च्या सर्व तुकड्यांचे गेटटुगेदर ८ फेब्रुवारीला हॉटेलवर मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. एकमेकांच्या माहितींची देवाणघेवाण झाली. गप्पा सुरू झाल्या. सर्वांनी आपापले परिचय शेअर केले. प्रत्येकजण आपापल्या कहाण्या सांगण्यास उतावीळ झाले होते. बोलता बोलता थट्टा मस्करीही होत होती. सर्वांनीच शालेय जीवनातील गमतीजमती सांगितल्या. जेवणानंतर शालेय जीवनातील आठवणींवर दिलखुलास गप्पा झाल्या.

यावेळी मयूर पगारे, मयूर बोरसे, हर्षल आहेर, कुमार गायधनी, प्रवीण राजगिरे, सुरज मराठे, दीपक कासार, बाळासाहेब गीते, सतीश शिंदे, शादाब शेख, शीतल वाघ, नयना पाटील, वैशाली वाघ, योगिता मोगल, दीपिका सोमवंशी, नीलिमा पाटील आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## जनता विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा भावनिक निरोप

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय, गोरेराम लेन, नाशिक येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी जनता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वाय. बी. गायधनी आणि बाल शिक्षण मंदिर शाळेचे मुख्याध्यापक के. के. तांदळे व्यासपीठावर उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनेने झाली. यानंतर विविध विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.


नाशिकमधील *जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहाचे विद्यार्थी प्रतिनिधी प्रसाद भालेकर आणि अदित्य रिकामे यांनी उपस्थित शिक्षक व मुख्याध्यापक यांचे आभार मानत त्यांना विशेष आभारपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार केला.

शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि शिस्त, कठोर परिश्रम आणि सातत्य यांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋचा कोते तेजस्विनी निकम यांनी केले.

विद्यार्थ्यांनी निरोप घेताना शाळेतील आठवणींचा भावनिक ठेवा मनात साठवत भविष्यात यशस्वी होण्याचा निर्धार केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मराठा हायस्कूलच्या १६ खेळाडूंना शिष्यवृत्ती प्राप्त

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलच्या १६ खेळाडूंना नाशिक मनपा अर्थसहाय्य योजनेंतर्गत ३,०८,०००/- रुपये क्रीडा शिष्यवृत्ती प्राप्त. या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर नितीन नेर (उपआयुक्त समाजकल्याण नाशिक मनपा) तसेच आनंद भालेराव (मनपा क्रीडा विभाग प्रमुख), मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल, रामनाथ रायते उपस्थित होते.**



व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. मनपा नाशिक उपआयुक्त नितीन नेर (उपआयुक्त, समाजकल्याण, नाशिक मनपा) यांनी विद्यार्थ्यांना मनपा क्षेत्रातील क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या खेळाडूंकरिता शिष्यवृत्ती योजनांविषयी माहिती दिली. तसेच राज्यस्तरावरील क्रीडा शिष्यवृत्ती अर्थसहाय्य योजनेंतर्गत मराठा हायस्कूल नाशिक हँडबॉल या क्रीडा स्पर्धेमध्ये १४ वर्षाआतील मुलांच्या संघाने राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धा सन २०२३-२४ राज्यात प्रथम क्रमांक मिळवला होता. या सर्व हँडबॉलच्या १५ खेळाडूंना नाशिक मनपा अंतर्गत शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. सदर विद्यार्थी पुढीलप्रमाणे

वरुण रतन कांगणे,रेहान जाकीर शेख,रोहन निवृत्ती महाले,ज्ञानेश प्रभाकर ठाकरे,अजिंक्य शिवाजी कहार,हितेश अमोल हांडगे,सार्थक नवनाथ गवळी,मयंक अजय बोके,सोहम विजय खैरनार,गोविंद अशोक चव्हाणके,स्वराज बाळासाहेब लांडगे,साहिल प्रवीण सानप,प्रतीक जनार्दन बामणे,पृथ्वीराज योगेश खैरनार,आदित्य प्रभाकर भोईर. वरील प्रत्येक खेळाडूला २००००/-रू शिष्यवृत्ती मिळाली.तसेच जलतरण या क्रीडा स्पर्धेमध्ये रुद्र घनश्याम बच्छाव या खेळाडूला ८,०००/- रुपये शिष्यवृत्ती मिळाली. एकूण शिष्यवृत्ती ३,०८,०००/-रु मिळाली. वरील सर्व खेळाडूंचा उपआयुक्त नितीन नेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक जयंत आहेर,मंगला शिंदे,सुहास खर्डे,राजाराम पोटे,हरीभाऊ डेर्ले,अनिल उगले,सुयश कुभार्डे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक अनिल उगले यांनी केले. कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक शंकर कोतवाल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## स्काऊट गाइड जिल्हा मेळाव्यात मराठा हायस्कूलचे यश

**नाशिक : प्रतिनिधी**

**मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्काऊट गाइड जिल्हा मेळाव्यात घवघवीत असे यश प्राप्त केले. सदर सर्व विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सत्कार सोहळा विद्यालयात संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल व रामनाथ रायते उपस्थित होते.**

स्काऊट गाइड जिल्हा मेळावा श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकासाहेबनगर रानवड येथे संपन्न झाला. विद्यालयाचे १० स्काऊट व १० गाइड आणि शिक्षक सहभागी झाले होते. या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.त्यात शोभा यात्रा व फूड प्लाझा या स्पर्धेत विद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. दिंडोरीचे विद्यमान संसद सदस्य भास्कर भगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये सहभागी गाईड वैष्णवी मोरे,लावण्य शिंपी,अंतरा सूर्यवंशी,प्रत्युषा शिंदे, प्रगती कराडे,प्रांजल गावित,प्राची गवळी,तनुष्का मोरे,वैष्णवी देशमुख, कार्तिकी घोलप यांनी सहभाग घेतला. स्काऊट विद्यार्थ्यांनी संचलनात सहभाग घेतला.

या सर्व स्काऊट गाइड विद्यार्थ्यांना संगीता डेर्ले, शकुंतला आगळे, चित्रलेखा नाठे, वैशाली बेडसे, स्वप्नाली कावळे, आशालता उशीर, सुनील बस्ते, संतोष शिंदे, सुयश कुंभार्डे, सुनील काळे यांचे मार्गदर्शन लाभले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाचे धडे घेतले. स्वतः स्वयंपाक बनवणे, जिल्हाभरातून आलेल्या स्काऊटर,गाईडर यांची ओळख झाली. या मेळाव्यातून स्नेहबंधनाची अनोखी शिदोरी विद्यार्थ्यांनी घेतली. ग्रामीण जीवनाचा स्वानुभव विद्यार्थ्यांना मिळाला. विद्यालयातील स्काऊट गाइड प्रमुख सुनील बस्ते व उपप्रमुख आशालता उशीर यांनी या मेळाव्याचे सर्व नियोजन केले.

## नॅशनल कॉलेजमध्ये कॅन्सर प्रतिबंधात्मक जागरूकता कार्यक्रम

**जुने नाशिक : वार्ताहर**

**येथील युथ एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी संचलित नॅशनल सीनियर कॉलेजमध्ये ब्रेस्ट कॅन्सर आणि सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधात्मक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मानवता कॅन्सर हॉस्पिटलचे संचालक राज नगरकर आणि त्यांच्या सहकारी कॅन्सर सर्जन डॉ. मोहसीना हुसेन यांनी या विषयावर महत्त्वपूर्ण माहिती दिली.**



दरम्यान, डॉ. नगरकर यांनी सर्व्हायकल कॅन्सर कसा ओळखावा तसेच त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि उपचार पद्धतीबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. मोहसीना हुसेन यांनी ब्रेस्ट कॅन्सर ओळखण्याची प्रक्रिया, प्रतिबंधात्मक उपाय आणि इतर आवश्यक काळजी याबाबत माहिती दिली. त्यांनी व्हिडिओ आणि पोस्टर्सच्या माध्यमातून कॅन्सरच्या अगदी प्रारंभापासून ते शेवटपर्यंतच्या टप्प्यांची माहिती दिली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश नहिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लूबना शेख यांनी केले. शिरीन मनियार यांनी आभार मानले. यावेळी गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका मुसर्रत शेख, प्राचार्य तौसीफ शेख, वरिष्ठ लिपिक लियाकत पठाण, आफरीन शेख, हॉस्पिटलचे पब्लिक रिलेशन ऑफिसर अशफाक शेख, निखिल सुजल आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन वीमेन एम्पॉवरमेंट कमिटीच्या अंतर्गत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सना खान, सायमा अन्सारी, नायला अन्सारी, तौसीफ मिर्झा, लीलाधर पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन नदीम जैनुद्दीन शेख यांनी केले होते.

# ॲम्रोच्या विद्यार्थ्यांची जेईई-मेन परीक्षेत यश

**नाशिक : प्रतिनिधी**

**राजूर बाहुला येथील ॲम्रो ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जेईई-मेन परीक्षेत चमकदार कामगिरी बजावली आहे.**





नॅशनल टेस्टिंग एजन्सीने जेईई-मेन २०२५ प्रथम सत्र परीक्षेचा निकाल जाहीर केला. या परीक्षेत ॲम्रो ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयाने सर्वाधिक प्रमाणात निकाल देण्याचा वारसा या वर्षीही सातत्य राखले आहे, अशी माहिती ॲम्रो इंस्टीट्युटचे संचालक प्रा. सुनंदा सोनी, ॲम्रो कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. रोहन सोनी आणि प्राचार्य डॉ. गिरीश पाटील, प्रा. विशाल आहेर यांनी संयुक्तपणे दिली.

२०२५ मध्ये झालेल्या जेईई-मेन परीक्षेत ॲम्रो ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या महाविद्यालयातील ओम गायधनी या विद्यार्थ्याला सर्वाधिक ९९.९५५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने यश मिळाले. तसेच वेदांत भट्ट ९९.८९६, हर्ष म्हस्के ९९.८१६, आशिष रकिबे ९९.५०८, प्रसाद वाघ ९९.४०९, पार्थ अचाट ९९.३८०, श्रेयस शुक्ला ९९.२३०, आयुष बोडके ९९.०७१, सतेज कोल्हे ९९.०५१, टक्के या सतरा विद्यार्थ्यांना ९९ पर्सेंटाईलपेक्षाही अधिक गुण मिळून घवघवीत यश मिळाले आहे.

तसेच इतर ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. गिरीश पाटील, प्रा. विशाल आहेर, प्रा. दर्शना आहेर, प्रा. गौरव दीक्षित तसेच अनुभवी विशेष मार्गदर्शक प्रा. स्वप्नील जैन, दिल्ली आयआयटी, प्रा. मनीष शंकर मुंबई आयआयटी, प्रा. नितीन पाठक, प्रा. साकेत राज, प्रा. भोसलेंसह त्यांची टीम यांनी सर्व विषयांचे योग्यरीतीने मार्गदर्शन केले.

आपले मनोगत व्यक्त करताना ओम गायधनी या विद्यार्थिनीने सर्व विषयांचे योग्य व समावेशक मार्गदर्शन, नियमित सूक्ष्म व मोठ्या टेस्ट्स व वेळोवेळी प्रत्येक मार्गदर्शकांनी शंकांचे निरसन केल्यामुळे अभ्यासाला गती मिळाली म्हणून माझा अभ्यास खूप चांगला झाला असा उल्लेख केला. वेदांत भट्ट म्हणाला, सुरुवातीपासूनच अभ्याक्रम व मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, अभ्यासासाठी प्लॅनर दिले होते. यामुळे मला भरपूर फायदा झाला.

# आगबाधितांना आमदार दिलीप बोरसे यांनी केली मदत

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**

**तालुक्यातील अजमेर सौंदाणे शिवारात गुरुवारी(दि.१३) पहाटेच्या सुमारास अचानक लागलेल्या भीषण आगीत जंगलू बुधा माळी यांचे राहते घर भस्मसात झाले. यात त्यांचा संपूर्ण संसार जळून राख झाला असून, याबाबत माहिती मिळताच आमदार दिलीप बोरसे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी आमदार बोरसे यांनी बाधित कुटुंबीयांचे सांत्वन करून धीर देतानाच स्वतः रोख रक्कम मदत म्हणून सुपूर्द केली.**



अजमेर सौंदाणे शिवारात चौगाव बर्डीपासून हाकेच्या अंतरावर माळी हे वास्तव्याला आहेत. गुरुवारी पहाटेच्या सुमारास अचानक त्यांच्या राहत्या घरास आग लागल्याचे लक्षात आले. यावेळी घरात त्यांचे वयोवृद्ध आई-वडील व दोन लहान मुले झोपलेली होती. परंतु त्यांनी प्रसंगावधान राखत जीवावर उदार होत या चौघांना पेटत्या आगीतून घराबाहेर काढले. यामुळे सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे घरातील सर्व धनधान्य, कपडे, भांडे, कागदपत्र आणि इतर चीजवस्तू जळून राख झाल्या. आजूबाजूच्या ग्रामस्थांनी तात्काळ धावून येत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. याबाबत माहिती मिळताच आमदार दिलीप बोरसे यांनी सकाळी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली. यावेळी आमदार बोरसे यांनी बाधित कुटुंबीयांचे सांत्वन करून धीर दिला. तसेच स्वतः रोख रक्कम देऊन त्यांच्या संसारासाठी हातभार लावला. यावेळी आमदार बोरसे यांनी तहसीलदार कैलास चावडे यांच्याशी संपर्क साधून घटनेचा तात्काळ पंचनामा करून तातडीची मदत म्हणून अन्नधान्याचा पुरवठा करण्याची सूचना केली. तसेच कुटुंबास लवकरात लवकर शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यासही सांगितले. त्यानुसार घटनेचा पंचनामा करण्यात आला. आमदार बोरसे यांनी आपत्ती काळात बाधित कुटुंबाला दिलासा दिल्याने याबाबत बाधित कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

अग्निशमन वाहन का पोहोचले नाही? संबंधित घटनास्थळ हे सटाणा शहरापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर आहे. आगीबाबत नगरपालिकेच्या अग्निशमन विभागास माहिती देण्यात आली. परंतु पूर्ण आग विझून गेल्यानंतरही अग्निशमन वाहन घटनास्थळी पोहोचले नाही. त्यामुळे अग्निशमन वाहन घटनास्थळी का पोहोचले नाही? याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## महत्त्वाचे

### राज्यस्तरीय धम्म परिषदेला केंद्रीय मंत्री रिजिजू यांची उपस्थिती



नाशिक : केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांना बौद्ध धम्म परिषदेचे निमंत्रण देताना भदन्त सुगत थेरो, नायरायण गायकवाड, संतोष कटारे.

**नाशिक : वार्ताहर**

येत्या २ मार्च रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बौद्ध धम्म परिषदेचे केंद्रीय संसदीय कार्य व अल्पसंख्याकमंत्री किरेन रिजिजू यांना निमंत्रण देण्यात आले आहे. ते या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लढ्यातील महत्त्वाचा टप्पा म्हणून काळाराम मंदिर सत्याग्रह ओळखला जातो. या लढ्यातील सत्याग्रहींना अभिवादन करण्यासाठी २ मार्च सत्याग्रहदिनी राज्यस्तरीय बौद्ध धम्म परिषद आयोजित केली आहे. गोल्फ क्लब मैदान येथे ही ऐतिहासिक धम्म परिषद होणार असून, यासाठी देशभरातील तसेच इतर देशांमधील बौद्ध भिक्खू उपस्थित राहणार आहेत. तसेच केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे. दरम्यान, रिपाइं आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्म परिषदेचे उत्तर महाराष्ट्राचे सरचिटणीस भदन्त सुगत थेरो, रिपाइं आठवले गटाचे महानगरप्रमुख नारायण गायकवाड, संतोष कटारे आदींनी केंद्रीय मंत्री रिजिजू यांची भेट घेऊन त्यांना निमंत्रण दिले. यावेळी त्यांनी उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

### रविवारी बॉलिवूड क्लासिक्स मैफल

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील स्वरांजली कराओके स्टुडिओतर्फे रविवारी (दि.१६ ) बॉलिवूड क्लासिक्स भाग ३ या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संध्याकाळी ६ वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या प.सा. नाट्यगृहाशेजारी मु. शं. औरंगाबादकर सभागृहात ही विनामूल्य मैफल होईल. शास्त्रीय संगीतावर आधारित हिंदी चित्रपटसृष्टीतील गाण्यांचा समावेश या कार्यक्रमात करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक हर्षद शिंत्रे आणि संजय कथुरीया यांनी दिली. गायिका पूनम शारंगधर, रेवती वाघमारे, कीर्ती नवलाखे, पूर्वा काबरा, राखी पाटील आणि हेमांगी जोशी या सहभागी होणार आहेत. गायकांमध्ये हर्षद शिंत्रे, संजय कथुरीया यांच्यासमवेत अविनाश विसपुते, विजय माळी, भूषण कुलकर्णी, धनंजय भावसार, विनय चंद्रात्रे यांचा समावेश आहे. समीर ओतुरकर निवेदन करणार आहेत. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गाण्यांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### एचएएल प्राथमिक विभागाचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम

**ओझर : वार्ताहर**

येथील गोखले एज्युकेशनच्या एचएएल प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या थाटामाटात झाला. कार्यक्रमात ज्युनिअर के. जी. ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सामुहिक नृत्य सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमास एचएएल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य आर. एम. चौधरी व हायस्कूलचे उपमुख्याध्यापक बी. बी. साळवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली मुळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सर्व विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे नृत्य उत्स्फूर्तपणे सादर करून दाखवले.

## निधन वार्ता

### फिरोज काद्री

**लासलगाव : वार्ताहर**



येथील फिरोज गारमेंट्सचे संचालक फिरोज कमरुद्दिन काद्री (४७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे. तज्जमूल काद्री यांचे ते बंधू होत.


### सुदाम ढगे

**नाशिक : वार्ताहर**



येथील सामाजिक कार्यकर्ते व सुप्रसिद्ध ढगे बंधू भेळभत्त्याचे संचालक सुदाम विष्णू ढगे (४५) यांचे अकस्मात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, भाऊ, पुतण्या असा परिवार आहे.


### उत्तम संगमनेरे



**नांदूर नाका : प्रतिनिधी**

खेरवाडी येथील प्रगतिशील शेतकरी उत्तम झुंबर संगमनेरे (५२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, पुतणे असा परिवार आहे.

### बाळकृष्ण शेळके



**पंचवटी : वार्ताहर**

नाशिक येथील बाळकृष्ण सावळीराम शेळके (७४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. स्वप्नील शेळके यांचे वडील होत.

# विद्यार्थिनीवर अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या

## इगतपुरीत सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचा विराट मूक मोर्चा

**इगतपुरी : प्रतिनिधी**

**इगतपुरी तालुक्यातील टाकेद बुद्रुक येथील विद्यार्थिनीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा द्यावी. पीडित मुलीच्या शिक्षणाचा खर्च व मान्य केलेली १५ लाखांची रक्कम तात्काळ मुलीच्या खात्यावर जमा करावी. ज्या दिवशी ही काळिमा फासणारी घटना घडली, त्या घटनेच्या दिवशी फरार झालेल्या ६ शिक्षकांचे निलंबन करावे. यापुढे महिला आणि मुलींच्या बाबत तक्रार आल्यास त्यावर सत्वर लक्ष घालावे आदी मागण्या पूर्ण न झाल्यास रास्ता रोको व तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष तथा आदिवासी काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष लकीभाऊ जाधव यांनी दिला.**



इगतपुरी तालुक्यातील टाकेद बुद्रुक माध्यमिक शाळेत अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनीवर अत्याचार करणारा मुख्याध्यापक व त्याला मदत करणाऱ्या शिक्षकाला फाशी देण्याच्या मागणीसाठी लकीभाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचा विराट मूक मोर्चा काढण्यात आला होता. इगतपुरी तहसील कार्यालयावर हा मूक मोर्चा काढण्यात आला. नाशिक -मुंबई महामार्गावरील बोरटेंभे फाटापासून इगतपुरी तहसीलदार कार्यालयापर्यंत निघालेल्या विराट मूक मोर्चात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या विराट मूक मोर्चात राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, एल्गार कष्टकरी संघटना, वंचित बहुजन, रिपाइं यांच्यासह मोर्चात पीडित मुलीच्या कुटुंबासहित सर्व आदिवासी संघटना, सकल हिंदू समाज, सर्वपक्षीय संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी तहसीलदार कार्यालयात निवेदन देऊन राज्य शासनाला हे निवेदन तात्काळ पाठवण्यात यावे, असे सांगण्यात आले. टाकेद बुद्रुक न्यू इंग्लिश स्कूलच्या सहावीत शिकणाऱ्या १३ वर्षीय बालिकेवर ७ फेब्रुवारीला मुख्याध्यापक तुकाराम साबळे या नराधमाने अमानवीय शिक्षक गोरक्षनाथ जोशीच्या मदतीने अत्याचार केला.

संबंधित आरोपी अटक असले तरी इतरही काही आरोपी किंवा अशा अनेक घटना या शाळेत घडलेल्या असू शकतात. त्यामुळे सदर गुन्ह्याची पाळेमुळे शोधून संबंधित सर्व गुन्हेगारांना कठोर शिक्षाची फाशी द्यावी. अनुभवी आणि कार्यतत्पर सरकारी वकिलाची नेमणूक करून हा खटला फास्ट ट्रॅक चालवावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष तथा आदिवासी काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष लकीभाऊ जाधव, दीपक गायकवाड, देवीदास जाधव, भगवान मधे, डॉ. श्रीराम लहामटे, किरण फलटणकर, मोहन बऱ्हे, भूषण जाधव, निखिल हांडोरे, तुकाराम वारघडे, काशीनाथ कोरडे, आकाश पारख, भाऊसाहेब खातळे, विनोद भागडे, राम शिंदे, किरण मुसळे, पल्लवी शिंदे, वैशाली आडके, प्रतिभा काळे, दीपा रॉय, आदी सर्वपक्षीय पदाधिकारी, महिला आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मूक मोर्चाप्रसंगी पोलीस निरीक्षक राहुल तसरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### जोरणपाडा येथे वारकरी सामाजिक पुरस्कार वितरण

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील जोरणपाडा येथे वारकरी सेवाभावी संस्थेचा सालाबादप्रमाणे मंगळवार दि.१८ रोजी वर्धापन दिन साजरा करण्यात येणार असून, या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, दिंडोरी लोकसभा मतदारसंघ खासदार भास्कर भगरे, माजी केंद्रीय मंत्री भारती पवार, माजी आमदार धनराज महाले उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाप्रसंगी युवानेते गोकुळ झिरवाळ, वारकरी महामंडळ कार्याध्यक्ष दत्तात्रय डुकरे, गटविकास अधिकारी भास्कर रेगडे, पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर, राष्ट्रवादी महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा प्रेरणा बलकवडे, युवा नेते वैभव महाले, ज्येष्ठ नेते विठ्ठल अपसुंदे, भाजपा आदी मोर्चा शहराध्यक्ष गोरख चौधरी, शाखाधिकारी युनियन बँक निगडोळ, चंद्रशेखर चौधरी, उपरपंच जोरण गोविंद गायकवाड, पत्रकार संघ दिंडोरी तालुकाप्रमुख विलास ढाकणे, ग्रा. सदस्य ज्ञानेश्वर भुसारे, कीर्तनकार माणिक राऊत, माणिक गायकवाड, सुनीता गायकवाड आदी उपस्थित राहणार आहेत.



## नैताळेत तात्पुरते द्राक्षमणी खरेदी-विक्री केंद्र सुरू

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**निफाड तालुक्यात द्राक्ष काढणी हंगाम सुरू झाला असून, द्राक्षांच्या पॅकिंगनंतर उरणाऱ्या द्राक्षमण्यांना योग्य बाजारभाव मिळण्यासाठी शेतकरी बांधवांनी त्यांचे द्राक्षमणी शेतावर विक्री न करता लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नैताळे येथील तात्पुरत्या स्वरूपाच्या तसेच अधिकृत खरेदी-विक्री केंद्रांवरच विक्रीस आणावे, असे आवाहन लासलगाव बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे, भिमराज काळे, छबूराव जाधव यांनी नैताळे येथील द्राक्षमणी लिलाव शुभारंभाच्या वेळी केले.**

> लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सन २००५ पासून नैताळे येथे तात्पुरत्या स्वरूपाचे हंगामी द्राक्षमणी खरेदी-विक्री केंद्र सुरू आहे. सन २००५ ते सन २०२४ पर्यंत ११ कॅरेट द्राक्षमण्यांची खरेदी-विक्री झाली आहे. शेतकऱ्यांना जवळपास २० कोटी रुपयांचा आर्थिक फायदा झाला आहे. याही पुढे हे हंगामी खरेदी-विक्री सुरू राहणार असून, शेतकऱ्यांनी आपल्या आर्थिक सुरक्षिततेसाठी द्राक्षमणी विक्रीस आणावे.
>
> – **नरेंद्र वाढवणे** सचिव, लासालगाव कृ.उ.बा. समिती

नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गालगतच नैताळे शहराच्या पश्चिमेला लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून तात्पुरत्या स्वरूपाचे द्राक्षमणी खरेदी-विक्री केंद्र काल सुरू करण्यात आले. प्रारंभी राजेंद्र बोरगुडे, भिमराज काळे, छबूराव जाधव, सचिव नरेंद्र वाढवणे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते द्राक्षमणी क्रेट्सचे विधिवत पूजन करण्यात आले. नैताळे येथे समाधान जाधव यांचा द्राक्षमणी रु. ३२/- प्रतिकिलो या दराने विक्री झाला. सायंकाळपर्यंत ११६ द्राक्षमणी क्रेट्सची आवक होऊन बाजारभाव कमीत कमी रु. १३/-, जास्तीत जास्त रु. ३२/-, सरासरी रु.२२ /- प्रति किलो याप्रमाणे होते.

## चारचाकी वाहनास बनावट नंबरप्लेट लावणाऱ्या वाहनधारकावर कारवाईची मागणी

**पिंपळगाव बसवंत : वार्ताहर**

**चारचाकी वाहनास बनावट नंबरप्लेट लावून फसवणूक करणाऱ्या वाहनधारकाचा तातडीने शोध घेऊन त्या वाहनधारकावर कडक कारवाई करावी, अशी तक्रार पिंपळगाव बसवंत येथील रामराव माधवराव मोरे (रा. रानमळा) यांनी पिंपळगाव पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.**

दरम्यान, दोन वेगवेगळ्या वाहनांना एकच नंबर असल्यामुळे बनावट नंबरप्लेट असलेले वाहन मोफत टोलनाका पास करत आहे तर त्या वाहनाचा टोल असली नंबरप्लेट असलेल्या वाहनधारकाच्या बँक खात्यातून कपात होत आहे. खात्यातून टोल रक्कम दोनदा कपात झाल्यानंतर सदर झोल लक्षात आला व पिंपळगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी संबंधित तक्रारीची दखल घेऊन बनावट नंबरप्लेट लावून फिरणाऱ्या वाहनधारकाचा शोध घेऊन गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे.



यांबाबत सविस्तर वृत्त असे की, मारुती कंपनीची सेलेरो कार (१५ ७२२३) ही पिंपळगाव बसवंत येथील रामराव माधवराव मोरे यांच्या मालकीची असून, सध्या ती कार रामराव मोरे यांचे मेहुणे अशोकराव उत्तमराव जाधव (राहणार नाशिक) हे वापरत आहे. ते नाशिक शहरात राहत असून, पिंपळगाव बसवंत येथे सेलेरो कार आली नसतानाही ७ फेब्रुवारी रोजी दोन वेळेस अशोक जाधव यांच्या बँक खात्यातून एकूण ३४० रुपयांची टोल कपात झाली. याबाबत अधिक चौकशी करता (१५ ७२२३) हाच सेलेरोचा सारखा नंबर असलेली तवेरा कार नाशिक-पिंपळगाव प्रवास करत असल्याचे लक्षात आले. त्याचे फुटेजही पिंपळगाव टोलप्लाझावरून रामराव मोरे यांना मिळाले. रामराव मोरे व अशोकराव जाधव यांनी तातडीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान, टोल वाचविण्यासाठी पिंपळगाव बसवंत येथीलच वाहनधारकाने ही शक्कल लढवली असल्याची शक्यता आहे. पोलिसांनी याबाबत तातडीने वाहनधारकाचा शोध घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी रामराव मोरे यांनी केली तसेच सेलेरो व तवेरा कारचे फोटो, सारखी नंबरप्लेट आणि बँक खात्यातून कपात झालेल्या संदेशाची प्रत पोलिसांना दिली आहे.

> माझ्या सेलेरो कारचा नंबर वापरून तवेरा वाहनधारक टोल वाचविण्याबरोबरच तवेरा वाहनातून गुन्हेगारी कृत्य करण्याची शक्यता आहे. सदर वाहनधारक पिंपळगाव शहर परिसरातील असण्याची दाट शक्यता आहे. तरी पोलिसांनी संबंधित तवेरा कार व वाहनधारक यांचा शोध घ्यावा.
>
> – **रामराव मोरे,** पिंपळगाव ब.

## स्वप्नील ॲग्रो समूहातर्फे दिव्यांग विद्यार्थ्यास तीनचाकी सायकल वाटप

**देवळा : प्रतिनिधी**

**वडाळा येथील स्वप्निल ॲग्रो समूहाचे संस्थापक, उद्योजक अरुण पवार यांच्याकडून जिजामाता माध्यमिक विद्यालय दहिवड, ता. देवळा या विद्यालयातील इयत्ता नववीचा दिव्यांग विद्यार्थी सोपान कुवर यास तीनचाकी (व्हीलचेअर) सायकलचे वितरण करण्यात आले.**



सदर कार्यक्रमाप्रसंगी गिरीजा अभियान संस्थेचे संचालक व कसमादे ट्रस्ट विठेवाडीचे प्रशासकीय अधिकारी दिनेश देवरे, एन. डी. एस.टी. सोसायटीचे देवळा तालुका संचालक एस. टी. पाटील, देवळा विद्यानिकेतनचे क्रीडा संचालक सुनील देवरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अरुण पवार यांनी सदर विद्यार्थ्यास दोन ते तीन महिन्यांत जयपूर फूट देण्याचे आश्वासित केले. जिजामाता माध्यमिक विद्यालय हे नेहमीच विद्यार्थी हिताचे उपक्रम राबवित असते. तीनचाकी सायकल दिव्यांग विद्यार्थ्यास उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक केदानाना आहेर, संस्थेच्या अध्यक्षा धनश्रीताई आहेर तसेच विद्यालयाचे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक संघाचे अध्यक्ष तसेच पदाधिकारी यांनी उद्योजक अरुण पवार व त्यांच्या टीमचे आभार व्यक्त केले.

### परमेश्वरप्राप्ती मानवी जीवनाचे सार्थक : पडोळ

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

**परमेश्वराने आपल्याला सुंदर, गोमटा असा नरदेह परमेश्वराची भक्ती करण्यासाठी दिलेला आहे. भजन, ध्यान व नामस्मरणाने परमेश्वरप्राप्ती करता येते. परमेश्वर प्राप्ती हे मानवी जीवनाचे सार्थक आहे, अशा आशयाचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळ निफाड तालुका प्रसिद्धीप्रमुख कीर्तनकार लक्ष्मण महाराज पडोळ यांनी केले.**

ते निफाड येथील माणकेश्वर महादेव मंदिरात आयोजित कीर्तनातून बोलत होते.

एक गावे आम्ही विठोबाचे नाम

आणि कापे काम नाही आता या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण करताना हभप पडोळ महाराज बोलत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माणकेश्वर महादेव भक्त मंडळ ग्रामस्थ व भजनी मंडळाने विशेष परिश्रम घेतले

## द्राक्षमालाचे भाव नियंत्रणात आणण्याचा निर्यातदारांचा डाव

### द्राक्षबागायतदारांनी व्यवहारासाठी घाई करु नये; द्राक्षबागायतदार संघाचे आवाहन



**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**यंदाचा द्राक्ष हंगाम हा स्थिर आहे. एकाचवेळी मोठी आवक बाजारात येण्याजोगे उत्पादन झालेले नाही, मात्र काही द्राक्ष निर्यातदार फर्मकडून निर्यातक्षम द्राक्षाचे दर नियंत्रणात ठेवण्याचा डाव केला जात आहे, अशी द्राक्ष उत्पादकांमध्ये चर्चा आहे. द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांनी विक्रीच्या व्यवहारासाठी घाई करू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख, मानद सचिव बबनराव भालेराव यांनी केले.**

निफाड तालुक्यातील ओझर येथील द्राक्ष बागाईतदार संघाच्या कार्यालयात महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक संपन्न झाली. त्यात द्राक्ष हंगामाचा आढावा घेण्यात आला. द्राक्ष निर्यात दरावर ठराविक निर्यातदारांकडून नियंत्रण ठेवले जात असल्याचे चर्चेतून समोर आले आहे.

वास्तविक पाहता गेल्या वर्षी १ नोव्हेंबर २०२३ ते ६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत युरोपीय देशासाठी २४९६ कंटेनरद्वारे सुमारे ३२३५५ मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला आहे तर यरोपीय देशांव्यतिरिक्त इतरत्र ९४१ कंटेनरमधून १५००५ मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला. असा एकूण ३४३७ कंटेनरमधून ४७३६० मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला होता. त्यावेळी निर्यातक्षम द्राक्षमालाला साधारणपणे ७० ते १२५ रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळाले होते. याचे उलट परिस्थिती चालू द्राक्ष हंगामाची आहे. चालू द्राक्ष हंगामाचा विचार करता १ ऑक्टोबर २०२४ ते ६ फेब्रुवारी २०२५ पावेतो युरोपीय देशासाठी १२२७ कंटेनरद्वारे सुमारे १६२६० मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला आहे तर यरोपीय देशांव्यतिरिक्त इतरत्र ८१६ कंटेनरमधून १२०८९ मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला. असा एकूण २०४३ कंटेनरमधून २८२९६ मे. टन द्राक्षमाल निर्यात करण्यात आला आहे. तुलनात्मकरीत्या सदरची निर्यात ही गतवर्षीपेक्षा निम्मीच आहे.

शिवाय, येत्या पंचवीस दिवसांत सिजनदेखील आटोपणार आहे. त्यामुळे निर्यातदार एजन्सीला निर्यातीचे उद्दिष्टदेखील पूर्ण करता येऊ शकणार नाही. द्राक्ष बागाईतदारांनी द्राक्ष निर्यातदार फर्म अथवा त्यांचे प्रतिनिधी (सर्व्हिस प्रोव्हायडर, पायलट) यांच्यासोबत द्राक्षमालाचा व्यवहार करण्यास घाई करू नये. शिवाय प्रत्यक्ष निर्यातदार फर्मचे मालक अथवा व्यापारी यांच्याशी संपर्क करून द्राक्षमालाचा त्याच्या विश्वासार्हतेची पडताळणी करून व्यवहार करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले, नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख, मानद सचिव बबनराव भालेराव आदींसह विभागीय संचालक मंडळाने केले आहे.



## शिंगवे येथील पोल्ट्रीफार्ममुळे आरोग्य धोक्यात; १८ पासून उपोषण

**काजीसांगवी : चांदवड तालुक्यातील शिंगवे येथील गट नंबर २०४ घराच्या शेजारीच गट नंबर २०३ मध्ये पोल्ट्री फार्मच्या मोठ्या प्रमाणात माशांमुळे व दुर्गंधीमुळे भूषण प्रभाकर ठाकरे या कुटुंबाची आरोग्याची मोठी हानी झाल्यामुळे याबाबत शिंगवे ग्रामपंचायत, पंचायत समिती चांदवड, जिल्हा परिषदेला वारंवार लेखी देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने या कुटुंबीयांनी दि. १८ फेब्रुवारीपासून चांदवड पंचायत समिती मुख्य प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषणास बसणार आहे.**

याबाबतचे निवेदन नायब तहसीलदार बाबासाहेब खेडकर, गटविकास अधिकारी पंचायत समिती, पोलीस स्टेशन चांदवड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी नाशिक, विभागीय आयुक्त नाशिक, ग्रामविकास व पंचायत राज विभाग मुंबई, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व नगरपरिषद चांदवड मुख्याधिकारी यांना निवेदनाच्या प्रती दिल्या आहेत. लता प्रभाकर ठाकरे, मुरलीधर शिवराम ठाकरे, अदित्य ठाकरे, सुजाता ठाकरे, श्रव्या भूषण ठाकरे, गार्गी भूषण ठाकरे आदी कुटुंबीय हैराण झाले असून, या पोल्ट्रीचा कायमचा बंदोबस्त करावा, अन्यथा ठाकरे कुटुंबीय येत्या दि. १८ फेब्रुवारीपासून चांदवड पंचायत समिती प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषणास बसणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

महत्त्वाचे

## डॉ. जाकीर हुसेन रुग्णालयात बेटी बचओ, बेटी पढाओ रॅली

**वडाळागाव : प्रतिनिधी**

डॉ. जाकीर हुसेन रुग्णालय व गणपतराव आडके नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक महानगरपालिका मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन रावते यांच्या मार्गदर्शनात बेटी बचाव, बेटी पढाव अभियान रॅली संपन्न झाली. रॅलीत गणपतराव आडके नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी व जाकीर हुसेन रुग्णालयाचे कर्मचारी सहभागी झाले होते. रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांना मुलीच्या जन्माचे महत्त्व विविध घोषणांद्वारे विशद केले. तसेच गणपतराव वाडके नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर पथनाट्य सादर करून उपस्थितांचे मन हेलावून टाकले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता हिरे, परिचारिका मेट्रन वासंती गावित यांचे विशेष परिश्रम होते. तर रॅलीबद्दल परिसरातील नागरिकांना जन जागृत करण्यासाठी रुग्ण कल्याण समितीचे सदस्य समाज सेवक जुबेर हाश्मी यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. अनिता हिरे यांनी आभार व्यक्त केले. रॅलीत डॉ. मनोज कांकरिया, डॉ. किरण शिंदे, डॉ. विशाल जाधव, डॉ.आदिती देवरे, डॉ.हेमराज धोंडगे, डॉ. बच्छाव, डॉ. धुमाळ, औषध भांडार प्रमुख शिरोडे, लॅब प्रमुख शाहिस्ता काझी, एक्स-रे विभागप्रमुख चौधरी आदी उपस्थित होते.

## विनोद पाटील यांचा सन्मान



**नाशिक : प्रतिनिधी**

गोखले शिक्षण संस्थेचे जे.डी.सी. बिटको, आय.एम.एस.आर. महाविद्यालय नाशिक कार्यालयाचे अधीक्षक विनोद संपतराव पाटील यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५ चा गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या ७६ वा वर्धापनदिन सोहळा पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक डॉ.सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर यांच्या उपस्थितीत विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विनोद पाटील यांचे गोखले शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दीप्ती देशपांडे, अध्यक्ष डॉ. आर पी देशपांडे, विभागीय सचिव डॉ राम कुलकर्णी, संस्थेचे प्रोजेक्ट डायरेक्ट पीएम देशपांडे, इ अँड एम संचालक श्री शैलेश गोसावी, संस्थेचे कुलसचिव श्री गिरीश नातू, जेडीसी बिटकोच्या संचालिका डॉ. सरिता औरंगाबादकर यांनी अभिनंदन केले.

## पुणे विद्यार्थीगृहाच्या माध्यमिक विभागात निरोप समारंभ



**नाशिक : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाच्या माध्यमिक विभागात इ. १० वीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद सोहळा व निरोप समारंभ संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून कार्यवाह संजय गुंजाळ होते. कार्यक्रमाची सुरवात इयत्ता नववीच्या विध्यार्थ्यांनी शालेय प्रार्थनेने केली. तसेच शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारे नृत्य सादर केले. शाळेच्या मुख्याध्यापिका भारती पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना यशाचा मूलमंत्र दिला. तसेच परीक्षेच्या काळात शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देताना मनोगते व्यक्त केली. त्यांनी शिक्षक आणि शाळेच्या वातावरणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विध्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात विध्यार्थ्यांच्या यशाचा, शिस्तीचा व १००% हजेरीचा गुणगौरव करण्यात आला. तसेच नर्सरी ते इयत्ता १०वी च्या शालेय जीवन प्रवासावर एका विडिओ द्वारे प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली गाजरे यांनी केले. कार्यक्रमास पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे मॅडम व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, काही पालकवर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रलंबित सीईटीपी, एसटीपी प्रकल्प मार्गी लावण्यास कटिबद्ध

## डॉ. अविनाश ढाकणे : निमा सभागृहात उद्योजकांशी साधला सुसंवाद



**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिकसाठी आवश्यक असलेल्या सीईटीपी आणि एसटीपी प्रकल्प लवकर मार्गी लावण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू व ही प्रकरणे नेमकी कुठे अडली आहेत त्याचा अभ्यास व पडताळणी केली जाईल, असे प्रतिपादन राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांनी केले.**

नाशिक दौऱ्यावर आले असता डॉ. अविनाश ढाकणे यांनी निमा सभागृहात उद्योजकांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. निमा तसेच आयमा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर निमाचे नूतन अध्यक्ष आशिष नहार,आयमाचे अध्यक्ष ललित बूब,राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी लिंबाजी भड,प्रशांत गायकवाड,एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी जयवंत पवार, सीमाचे अध्यक्ष किशोर राठी, महाराष्ट्र चेंबर माजी अध्यक्ष संतोष मंडलेच्या, लघुउद्योग भारती अध्यक्ष निखिल तापडिया, मेटल फिनिशर्स अध्यक्ष आशिष कुलकर्णी आदी होते.

नाशिकमधील सीईटीपी आणि एसटीपी प्रकल्प गेल्या दोन दशकांपासून ताटकळत पडले आहेत, असे माझ्या निदर्शनास आणण्यात आले आहे. इतकी वर्षे हा प्रकल्प लांबला जात असेल तर ते एक प्रकारे अपयशच म्हणावे लागेल, अशी खंत व्यक्त करून उद्योग जगले पाहिजेत, असे ते म्हणाले. निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी प्रास्ताविक केले. औद्योगिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी निमातर्फे सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. नाशकात सीईटीपी आणि एसटीपीची खरी गरज आहे. आम्ही सीईटीपी फाउंडेशनची स्थापनाही केली. परंतु सीईटीपी प्रकल्प पूर्णत्वास गेला नाही. नाशिककरांचे हे स्वप्न साकार झाल्यास आम्हाला आनंद वाटेल, असे नहार यांनी डॉ. अविनाश ढाकणे यांच्या निदर्शनास आणले. आमच्याकडे प्रदूषण करणाऱ्या मोठ्या कंपन्या नाहीत व नाशकातील एसटीपी आणि सीईटीपी प्रकल्प गेल्या दोन दशकांपासून का रखडले हा खरा संशोधनाचा विषय आहे. यावेळी डॉ. उमेश शर्मा, आशिष कुलकर्णी, समीर पटवा यांनी पर्यावरणविषयक विविध प्रश्न उपस्थित केले. त्याला डॉ. ढाकणे यांनी समर्पक उत्तरे दिली. सूत्रसंचालन मिलिंद राजपूत यांनी केले. आभार प्रदर्शन राजेंद्र अहिरे यांनी केले. कार्यक्रमास स्टार्टअप इंडियाचे श्रीकांत पाटील,आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, ग्लेनमार्कचे किरण पाटील, जिंदालचे व्ही.चंद्रशेखरन, गोविंद झा, अविनाश गोखले, सचिन कंकरेज, अखिल राठी, कैलास पाटील आदींसह विविध उद्योजक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## मेरी-रासबिहारी लिंकरोडचे रुंदीकरण करावे

### प्रियांका माने यांचे मनपा आयुक्तांना निवेदन

**पंचवटी : वार्ताहर**

**मेरी-रासबिहारी हा ३० मीटर लिंकरोड व धात्रक फाटा, मानेनगर ते देशमुख चौफुली हा १८ मीटर डी. पी. रस्त्यांचे रुंदीकरण करून कॉंक्रिटीकरण करण्यासंदर्भात २०२५ - २०२६ मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करावा, याबाबतच्या मागणीचे निवेदन मनपा आयुक्त मनीषा खत्री यांना माजी नगरसेविका प्रियांका माने यांनी दिले आहे.**



मेरी-रासबिहारी लिंक रोड (रस्ता) हा ३० मीटर रोड खूप रहदारीचा रोड आहे. या रस्त्यालगत दोन महाविद्यालय असून, तीन मोठ्या शाळा आहेत. याच रस्त्यावरून सुमारे पाच हजार विद्यार्थी रोज सकाळी व सायंकाळी महाविद्यालयीन कॉलेज व शाळेमध्ये ये-जा करत असतात. याच रस्त्यावर अनेक वेळा मोठे अपघात होऊन शालेय विद्यार्थी, नागरिकांची जीवितहानी झाली आहे. गत वर्षभरात या रोडवर अपघात होऊन ४ ते ५ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मेरी रासबिहारी या ३० मीटर लिंक रोडचे चौपदरीकरण करून कॉंक्रिटीकरण करण्यासंदर्भात २०२५ - २०२६ च्या महानगरपालिकेच्या अंदाज पत्रकामध्ये समावेश करून तत्काळ निविदा काढण्याचे आदेश द्यावे. यावर्षीच्या मनपाच्या अंदाजपत्रकात या रस्त्याचा समावेश न झाल्यास मोठे जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केला आहे.यावेळी माजी नगरसेविका प्रियंका माने, धनंजय माने, विलास कारेगावकर, ज्ञानेश्वर सोमासे, बाळासाहेब शिंदे, गोपाळकृष्ण उपाध्याय व प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनतर्फे उद्या 'निमाथॉन'

**नाशिक : प्रतिनिधी**

**नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) या डॉक्टरांच्या संघटनेतर्फे रविवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी निमाथॉन २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, तीन, पाच व दहा किमी धावण्याच्या स्पर्धेत डॉक्टर्स तसेच आरोग्य क्षेत्रातील अन्य स्पर्धकही भाग घेऊ शकतील, अशी माहिती निमाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा वाघ यांनी दिली.**

मॅरेथॉन चौक ते ट्री लँड गंगापूर रोड दरम्यान ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत डॉक्टर्स सहपरिवार आणि वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत सर्वांना भाग घेता येईल. स्पर्धा तीन, पाच आणि दहा किलोमीटर या गटात होणार आहे. जिल्हाधिकारी जलज शर्मा पोलिस आयुक्त संदीप कर्णिक आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, म. वि. प्र. सरचिटणीस अँड. नितिन ठाकरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ अर्जुन गुंडे आरोग्याधिकारी, म. न.पा डॉ. तानाजी चव्हाण, डॉ. राजेंद्र बागुल, डॉ. रविंद्र चौधरी, निमाचे राज्याध्यक्ष अध्यक्ष - डॉ. तुषार सूर्यवंशी, केंद्रीय व राज्य शाखेचे पदाधिकारी डॉ. मनीष जोशी, डॉ. देवेंद्र बच्छाव, डॉ. भूषण वाणी, केंद्रीय संघटक - डॉ. शैलेश निकम यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार आहेत. आरोग्य सेवेतील सर्वांनी कुटुंबीयांसह स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन निमा नाशिक शाखेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा वाघ, सचिव डॉ. संगीत लोंढे, खजिनदार डॉ.तुषार निकम व संघटक डॉ. दिप्ती बढे यांनी केले आहे.



## व्ही. एन. नाईक महाविद्यालयास पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा या वर्षीचा शहरी भागातील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार नाशिक येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास नुकताच प्राप्त झाला आहे. पुणे, नाशिक व अहिल्यानगर या विद्यापीठ क्षेत्रातील एका महाविद्यालयास दरवषी उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार विद्यापीठाकडून दिला जात असतो. सदरचा पुरस्कार विद्यापीठाच्या ७६ व्या वर्धापनदिनी विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या उपस्थितीत महाविद्यालयास प्रदान करण्यात आला.**

व्ही.एन. नाईक नाईक शिक्षण संस्थेचे संचालक शरद बोडके व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सानप, उपप्राचार्य डॉ. पौर्णिमा बोडके यांनी सदरचा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखेचे अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद सदस्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पुरस्कारामध्ये तीन लाख रु. बक्षीस, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड, सरचिटणीस,हेमंत धात्रक,उपाध्यक्ष उदय घुगे,सहचिटणीस दिगंबर गीते यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ संजय सानप व महाविद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी,विश्वस्त,व संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन व महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेतर सेवक,विद्यार्थी व पालक यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे महाविद्यालयास हा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त झाल्याची भावना प्राचार्य डॉ. संजय सानप यांनी व्यक्त केली.

## फिजिओथेरपिस्ट संघटनेची आजपासून राष्ट्रीय परिषद

### प्रख्यात फिजिओथेरपिस्ट उपस्थित राहणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) ची ६२ वी राष्ट्रीय परिषद १५ आणि १६ फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिक येथे आयोजित केली जाणार आहे. या परिषदेचा विषय फिजिओथेरपी : तंत्रज्ञान आणि स्वायत्ततेद्वारे रुग्णसेवेत क्रांती असा आहे, अशी माहिती आयएपीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजीव कुमार झा यांनी दिली. महिला शाखेच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. रुची वार्ष्णेय, राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. के. एम. अन्नामलाई, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. उज्वल येवले, उपाध्यक्ष डॉ. अमित गिरे, महिला सेल महाराष्ट्र प्रमुख डॉ. सुवर्णा गणवीर, डॉ. दर्शना, परिषदेचे समन्वयक नाशिक चे डॉ. सागर महाजन आणि महिला सेल डॉ. पक्षा कांबळे, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस डॉ. भारती दवे हे देखील यावेळी उपस्थित होते.**

आयएपीच्या इतिहासात पहिल्यांदाच नाशिक येथे अशा प्रतिष्ठित परिषदेचे आयोजन केले जाणार आहे. देशभरातील फिजिओथेरपिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. परिषदेत काही आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी देखील सहभागी होणार आहेत. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होईल. आमदार सत्यजित तांबे हे सन्माननीय पाहुणे असतील. समारोप समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार या उपस्थित राहणार आहेत. या ६२ व्या राष्ट्रीय परिषदेचे उद्दिष्टे आहेत.

**तांत्रिक प्रगतीचा शोध घेणे :**

फिजिओथेरपीमधील नवीनतम नवकल्पना, जसे की ए आय, रोबोटिक्स आणि टेलि-रिहॅबिलिटेशन, याचा काळजी आणि उपचारांच्या परिणामांमध्ये कसे बदल करतात याचे प्रदर्शन आणि चर्चा करणे.

**व्यावसायिक स्वायत्ततेला प्रोत्साहन देणे :**

फिजिओथेरपी प्रॅक्टिसमध्ये स्वायत्ततेचे महत्त्व अधोरेखित करणे, फिजिओथेरपिस्टची स्वतंत्र निर्णय घेण्याची भूमिका अधोरेखित करणे. रुग्ण व्यवस्थापन आणि आरोग्य सेवा सेटिंगमध्ये नेतृत्व असे असल्याचे सांगण्यात आले.

## राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**वडाळागाव : प्रतिनिधी**

**शिक्षणहक्क कायद्यातून प्रवेश घेणारी मुले ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांतून, येतात त्यांना चांगले शिक्षण घेण्यासाठी चांगल्या शाळेत प्रवेश घेणे शक्य होत नाही. त्यांना चांगले शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे.**

मात्र सरकार ही जबाबदारी टाळते की काय अशी भीती पालकांच्या मनात निर्माण होत आहे. सरकार आणि संस्थाचालकांच्या या वादात पालक आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. यामुळे शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन सुद्धा होत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्यातील शाळांना आरटीई शुल्काच्या प्रतिपूर्तीचं थकीत २४०० कोटी रूपये देण्याची व्यवस्था करावी या बाबतचे निवेदन गुरुवार (दि.१३) रोजी राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शिक्षण मंत्री दादा भुसे यांना देण्यात आले. यावेळी प्रदेश सचिव रमीज पठाण, जिल्हाध्यक्ष तुषार जाधव, अभिजीत गवते, भूषण बोरसे, विशाल जाधव आदी उपस्थित होते.



## पोलीस आयुक्तांच्या भेटीमुळे अनेक तक्रारींचे तात्काळ निवारण

**जुने नाशिक : वार्ताहर**

**पोलीस आयुक्त आपल्या दारी मोहिमेंतर्गत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी भद्रकाली हद्दीतील दूध बाजार पोलीस चौकी येथे भेट देऊन तक्रारदारांच्या गाऱ्हाणी ऐकून त्यांचे निवारण करण्याचे निर्देश दिले. यामुळे या मोहिमेत भद्रकालीतील सुमारे वीस तक्रारींचे तात्काळ निवारण झाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त केला.**

दरम्यान, शहरातील काही प्रमुख उलेमा व सामाजिक नेतेमंडळीने यानंतर पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांची भद्रकाली पोलीस ठाण्यात जाऊन भेट घेतली. यावेळी शब-ए-बारात, शिवजयंती व आगामी पवित्र रमजान महिना साजरा करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. दरम्यान, पोलीस आयुक्तांच्या भेटीवेळी भद्रकालीतील सुमारे वीस तक्रादारांच्या तक्रारींचे निवारण झाल्याची माहिती भद्रकाली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील यांनी दिली आहे. पोलीस आयुक्तांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळात खतीब-ए-शहर हाफीज हिसामुद्दिन अशरफी, काजी-ए-शहर मौजोद्दीन काजी, माजी नगरसेवक सुफी जीन, माजी नगरसेवक निजाम कोकणी, ॲड. मिन्हाज काझी, गौसनूर खान, शेखन खतीब, हाजी जाकीर अन्सारी, पप्पू कोकणी, आसिफ जानोरीकर, हाजी युनूस तांबोळी, गयास अन्सारी, माजिद पठाण आदींचा समावेश होता. यावेळी पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण व इतर पोलीस अधिकारी देखील उपस्थित होते.

## नाशिकरोडला शिवपुतळ्यावर करणार हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

**नाशिकरोड : वार्ताहर**

**छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही सर्वांनाच प्रेरणादायी व अनुकरणीय असेच आहे. त्यांचा पराक्रम त्यांच्या जीवनातील घटना, राजकारण, समाजकारण, शेतकऱ्यांविषयी व माताभगिनींविषयी त्यांचे विचार आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन त्यांनी उभारलेले स्वराज्य. आज ३९५ व्या जन्मोत्सवानिमित्ताने त्यांच्या कार्याला उजाळा देताना अभिमान वाटतो. त्यामुळेच या १९ तारखेच्या शिवजयंतीला महाराजांच्या पुतळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करून त्यांना अभिवादन केले जाणार आहे, अशी माहिती शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अध्यक्ष योगेश सत्यभामा लक्ष्मण गाडेकर यांनी दिली.**




नवनाथ ग्रुपच्या वतीने त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. त्यांनी या उत्सव सोहळ्याचे निमंत्रणही या ग्रुपला दिले त्यावेळी ते पुढे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. शिवजन्मोत्सव सोहळा वर्षभर विविध उपक्रमांनी साजरा केला जाणार आहे. १७ फेब्रुवारीपासून या कार्यक्रमाची सुरुवात समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या कीर्तन सोहळ्याने होणार आहे. १८ तारखेला रात्री झुलवा पाळणा हा कार्यक्रम होईल तर १९ ला सकाळी शिवपूजन, अभिषेक आणि हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली जाईल. महाआरती, १५१ महिला, पुरुषांचा शंभू नाद हा वाद्यपथकांचा कार्यक्रमही होईल. तसेच भव्य शोभायात्राही काढली जाईल. २० तारखेला लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटरचा मी मराठी हा कार्यक्रमही होईल. २१ तारखेला शिवरायांचे आठवावे रूप या अंतर्गत महानाट्य सादर केले जाईल. या कार्यक्रमाची जयत तयारी केली जात आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. गाडेकर यांचा नवनाथ ग्रुपचे रवीकिरण घोलप, अंबादास गवळी यांनी आयोजित केलेल्या सत्कारात विनोद देशमुख, अय्यास शेख, उत्तम फडोळ, रामदास सदाफुले यांच्या हस्ते महावस्त्र, पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी एस.आर. सुकेणकर, भाऊसाहेब खालकर, दिलीप भोसले, दत्तात्रय ढिकले, एस.बी. भालेराव सर, आर.डी. जाधव, राजेंद्र लहामगे, मनोहर कोरडे, राम गायकवाड, राजेंद्र सोनवणे, बाळासाहेब शिंदे, यशवंत मोरे, दत्तात्रय वाजे, तुषार फडोळ आदींनीही गाडेकरांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक




विद्यार्थिनीवर अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या
पान ६

# गांवकरी

द्राक्षमालाचे भाव नियंत्रणात आणण्याचा निर्यातदारांचा डाव
पान ६




gavakari.in  gavkarinews.com

नाशिक, शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५


# हिवाळी जिल्हा परिषद शाळेचे नाव देशपातळीवर अधोरेखित होणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : नूतन इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यात गुरुजी केशव गावित यांच्यासह विद्यार्थ्यांचे कौतुक

**नाशिक : प्रतिनिधी**

**अतिशय दुर्गम भागातील हिवाळी गावातील शाळेत शिकविणारे शिक्षक केशव गावित हे जादूगर, अवलिया आहेत. शिक्षण विभाग म्हणजे उद्याचे भवितव्य आहे. देशाचे भवितव्य आहे. लहान लहान मुले एकावेळी दोन हाताने लिहितात. मोठमोठ्या तेराशे तीसपर्यंत पाढे बोलतात, ही जादू आहे. या मुलांची बौद्धिक पातळी वाढविण्याचे काम गुरुजी केशव मते यांनी केले आहे. विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहे. दुर्गम भागात हिवाळी शाळेच्या माध्यमातून मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्वक शिक्षण प्राप्त होत आहे, ही अतिशय कौतुकास्पद बाब असून, आजच्या स्पर्धात्मक युगात या शाळेचे नाव देशपातळीवर अधोरेखित झाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवाळी शाळेच्या नूतन इमारत लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, आमदार हिरामण खोसकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. नितीन बच्छाव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नाशिकच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर कानोज, सरपंच माया बागुल यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, हिवाळी शाळेचे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे उपमुख्यमंत्री यांनी बोलताना म्हणाले की, ही शाळा ज्यांनी बांधली, ज्यांनी जागा दिली, ज्यांनी या विद्यार्थ्यांना घडविले त्या सगळ्यांचे मनापासून अभिनंदन. शिक्षक केशव गावित यांच्या जिल्हा परिषद शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रमाचा आदर्श इतर शिक्षकांनीही घ्यावा. हिवाळी शाळेसाठी आवश्यक सेवासुविधांची तरतूद शासनस्तरावर केली जाईल. हिवाळी शाळेस पुन्हा भेट देणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी, शाळेचे प्रगती कशी होईल, शैक्षणिक दर्जा कसा उंचावेल. शाळेची पटसंख्या कशी वाढेल, शिक्षकांना प्रोत्साहन कसे देता येईल यासाठी दादा भुसे शिक्षण विभागाचा कारभार दिल्यापासून पायाला भिंगरी लावल्यासारखे दुर्गम भागातील शाळांना भेटी देत असल्याचे शिंदे म्हणाले.

यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे म्हणाले की, शिक्षक केशव गावित व त्यांचे शिक्षक सहकारी अतिशय समर्पित भावनेने वर्षाचे ३६५ दिवस मुलांना ज्ञानार्जन करीत आहेत. महाराष्ट्रातून असे उपक्रमशील शिक्षक शोधून हिवाळी शाळेचा उपक्रम येणाऱ्या काळात राज्यभरात राबविला जाणार असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आदिवासी पारंपरिक नृत्याने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम हिवाळी जुनी शाळा व मुलांनी तयार केलेल्या परसबागेची भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर त्यांनी हिवाळी शाळेच्या नवीन इमारतीला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी मुलांनी त्यांनी आत्मसात केलेली शैक्षणिक कौशल्ये मान्यवरांसमोर सादर केली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिक्षक केशव गावित यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांना शाळेसाठी पाच लाखांचे अर्थसहाय्य देण्यात आले. शाळेसाठी स्वतःची एक एकर जमीन देणारे शेतकरी हरिदास भुसारे यांचाही स्मृतिचिन्ह देऊन यावेळी सत्कार झाला व त्यांनाही रुपये पाच लाख अर्थसहाय्य देण्यात आले. यानंतर गीव्ह फाउंडेशनचे रमेश अय्यर, विनीत व वीणा मालगावकर, आर्किटेक्ट पूजा खैरनार, महेंद्र भोये, प्रमोद भोये यांचा सत्कार करण्यात आला.



### खोसकरांवर मिश्किल टीका

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी खोसकरांवर मिश्किल टीका करीत म्हणाले की, मला झिरवाळ म्हणाले, खोसकरांना हिवाळी शाळेत प्रवेश द्या. हिरामण तसा चांगला माणूस आहे, असे म्हटल्यावर झिरवाळ म्हणाले खोसकर शाळा बिघडवू शकतात. त्यावर शिंदे म्हणाले, हिरामण खोसकर कलाकार आहेत. त्यांची कला सर्वांना माहिती आहे, असे शिंदे म्हणाल्यावर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

### जि. प. शाळांमध्ये वाढला कल

हिवाळी शाळेतील मुलांची प्रगती पाहून शिक्षणावर भरपूर काम करू शकतो. खासगी शाळेतील मुले सरकारी शाळेत प्रवेश घेत आहेत. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना शिक्षण विभागात दादा भुसे यांच्या सहकार्याने प्रगतीची संधी असल्याचे सांगत इंगजी माध्यमाची मुलेही जि. प. शाळांकडे वळू लागल्याचेही ना. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न

कौशल्याभिमुख, समाजाभिमुख, व्यावहारिक ज्ञानार्जनाचे काम हिवाळी शाळेत दिले जाते. हिवाळी येथील शाळेचे वैशिष्ट्ये म्हणजे तीन वर्षांपासून येथे मुले प्रवेश घेतात. वर्षाचे ३६५ दिवस सकाळी नऊ ते रात्री ९ पर्यंत शाळा भरते. यामध्ये मुलांना पाठ्यपुस्तकासह इतर ॲक्टिव्हिटी करून घेतली जाते. राज्यघटना, कलमे, सामान्यज्ञान, संगणक आदी सर्वच गोष्टीत मुले पारंगत आहेत. शाळेतील वर्गखोल्या शैक्षणिक साहित्याची सुबकपणे केलेल्या मांडणीतून सजलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार शालेय शिक्षण साहित्याची सांगड घातलेली विद्यार्थ्यांची कल्पकता येथे पहावयास मिळते. या शाळेतील मुले आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहतात.



## ड्रोनमुळे पोलिसांची धावपळ; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**नाशिक : प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाशिक दौऱ्यात हेलिकॉप्टर उड्डाणाच्या वेळी एक ड्रोन असल्याचे आढळून आल्याने पोलिस यंत्रणेची चांगलीच धावपळ उडाली. अनधिकृतपणे ड्रोन उडवणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी सुरू आहे.**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिकच्या दौऱ्यावर आहेत. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूलजवळील हिवाळी गावातील एका शाळेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने एकनाथ शिंदे आले होते. हे गाव दुर्गम भागात असल्याने एकनाथ शिंदे यांच्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात आले होते. यावेळी शिंदेंना भेटण्यासाठी लोकांनी गर्दी केली. त्याचवेळी हवेत एक ड्रोन उडताना दिसत होते. हवेत ड्रोन उडताना लक्षात आल्यानंतर पोलिसांची एकच तारांबळ उडाली. नंतर पोलिसांनी त्या ड्रोन उडवणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतलं. हा व्यक्ती कोण आहे, याचा तपास सध्या सुरू आहे. या व्यक्तीविषयी माहिती एकनाथ शिंदे यांनी पोलिस अधीक्षकांकडून घेतल्याचे समजते.

---

### महत्त्वाचे

## सावाना आयोजित देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा उत्साहात



**नाशिक : प्रतिनिधी**

सार्वजनिक वाचनालय, बालभवन सानेगुरुजी कथामालेतर्फे आयोजित देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा प.सा. नाट्यमंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या सुवर्णा क्षीरसागर व सावाना पदाधिकारी यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालभवन समिती सदस्य गीतांजली नाईक यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत / प्रास्ताविक बालभवन प्रमुख प्रा. सोमनाथ मुठाळ यांनी केले. मंगेश मालपाठक यांनी आभार मानले. परीक्षणाची जबाबदारी सुवर्णा क्षीरसागर यांनी पार पाडली. यावेळी सावानाचे प्रमुख सचिव देवदत्त जोशी, सहा. सचिव जयेश बर्वे, सावाना सेवकवृंद, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक शिशुविहार बालकमंदिर माध्यमिक द्वितीय क्रमांक मा. रा. सारडा कन्या विद्यामंदिर तृतीय क्रमांक विद्या प्रबोधिनी प्रशाला मराठी माध्यम उत्तेजनार्थ - रचना विद्यालय प्राथमिक विभाग, नाशिक विशेष पुरस्कार शिशुविहार व बालकमंदिर प्राथमिक.

## के. के. वाघ विद्याभवनात पत्ररूप संदेश उपक्रम



**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

के. के. वाघ विद्याभवन भाऊसाहेबनगर, ता. निफाड येथे इयत्ता ६ वीच्या वर्गात विद्यार्थ्यांचे वडिलांस पत्र या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विज्ञान तंत्रज्ञान व मोबाइलच्या युगात पत्र लेखन करणे, पत्र पाठवणे. हे दुर्मिळ झाले असून, मुलांना पत्रलेखन उपक्रमातून पत्राची ओळख, डाकघरामार्फत पत्र कसे जाते. महागाईच्या या युगात बाजारातील महागडे शुभेच्छा कार्ड न घेता पोस्ट कार्डवर स्वहस्तलिखित शालेय उपक्रमाचे अनुभव, प्रत्यक्ष पत्रलेखन करून वडिलांना संदेश पत्राद्वारे लिहिण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसू लागला होता. यासाठी विषय शिक्षक संजय धनगर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य यशवंत ढगे यांनी उपक्रम व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

---



**नाशिक : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुक्रवारी (दि. १४) हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथे झालेल्या आभार सभेस उपस्थित असलेला जनसमुदाय. (छाया : जगदीश सोनवणे)**

## ना. एकनाथ शिंदेंकडून दादा भुसे पालकमंत्री होणार असल्याचे संकेत

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रि-पदाबाबत असलेल्या सस्पेन्सबाबत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भाष्य करत पालकमंत्रिपदावर शिवसेनेचा दावा कायम असताना सांगत शिक्षणमंत्री दादा भुसेच पालकमंत्री होणार असल्याचे संकेत दिले.**



शिंदे म्हणाले, दादा भुसे पालकमंत्री होतेच. गिरीश महाजन कुंभमेळा मंत्री म्हणून काम पाहत आहेत, असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे पालकमंत्रिपदावर शिवसेनेचाही दावा असल्याचे संकेत देत भुसेच पालकमंत्री होतील, असे संकेत दिले.

आभार दौऱ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सिंहस्थ तयारीचा आढावा घेतल्यानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. एकीकडे सिंहस्थाच्या तयारीला वेगवेगळ्या बैठकांच्या माध्यमातून गती दिली जात असताना नाशिकचा पालकमंत्री का ठरत नाही, असा सवाल शिंदे यांना करण्यात आला. याबाबत ते म्हणाले, पालकमंत्रिपदाचा तिढा सुटेल. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत लवकरच निर्णय घेतील. आजच्या आढावा बैठकीला भुसे उपस्थित होते. यापूर्वी त्यांनी पालकमंत्री म्हणून काम पाहिलेच आहे. गिरीश महाजन हे सध्या कुंभमेळा मंत्री म्हणून काम पाहत आहेत, असे सांगत अप्रत्यक्षपणे दादा भुसे हेच पालकमंत्री होतील, असे सूतोवाच केले.

शिक्षणमंत्री म्हणून दादा भुसे चांगले काम करीत असल्याचे गौरवोद्गारही शिंदे यांनी यावेळी काढले. केशव गावित या शिक्षकाने विद्यार्थ्यांना असे काही घडवलेय की हा चमत्कारच म्हणावा लागेल. हिवाळी शाळा हा चमत्कारच म्हणायला हवा. त्यामुळेच शाळेसाठी चांगली इमारत बांधण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला.

---

## साधुग्रामसाठी भूसंपादन, रस्तेकामांना गती द्या

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला कुंभमेळ्याच्या कामांचा आढावा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित होईल, असे नियोजन करावे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेत रस्ते, साधुग्रामच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करीत कामांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात काल सायंकाळी नाशिक महानगरपालिका, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, कुंभमेळा व अन्य अनुषंगिक विषयांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, आमदार किशोर दराडे, आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सुहास कांदे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. माणिकराव गुरसळ, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, माजी खासदार हेमंत गोडसे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, कुंभमेळ्यासाठीच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार देशभरातून होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता वाहतुकीचे नियोजन करताना रस्त्यांचा आवश्यक तेथे विस्तार करावा. गोदावरी नदीपात्रात स्वच्छता राहील याची दक्षता घेताना जलप्रदूषण टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. मलनिस्सारण, जलशुद्धीकरणाचे प्रस्ताव तातडीने राज्य शासनाला सादर करावेत. त्यासाठी आवश्यक निधीच्या तरतुदीसाठी प्रयत्न केले जातील. कुंभमेळा कालावधीत होणारी भाविकांची गर्दी पाहता सीसीटीव्ही, ध्वनिक्षेपक यंत्रणेचे बळकटीकरण करावे. त्यासाठी नाशिक शहर व ग्रामीण पोलिसांनी समन्वयाने नियोजन करावे.

प्रयागराज येथील कुंभमेळ्यातील नियोजनासाठी अधिकाऱ्यांनी पाहणी दौरा करून तेथे केलेल्या उपाययोजनांची माहिती करून घ्यावी. जेणेकरून त्याचा कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी उपयोग होऊ शकेल. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी रामकालपथ, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मोनोरेलचाही आढावा घेतला.

शालेय शिक्षणमंत्री श्री. भुसे म्हणाले की, गोदावरी नदीपात्रात दूषित सांडपाणी सोडले जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगितले. आयुक्त डॉ. गेडाम यांनी सादरीकरणाद्वारे नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणारा कुंभमेळा शून्य अपघात, सुखद आणि आध्यात्मिक होण्यासाठी तसेच नाशिक शहराला जागतिक पातळीवर आणून अर्थव्यवस्थेस चालना देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. तसेच कुंभमेळ्यासाठीच्या कामांचा नियमितपणे आढावा घेतला जात आहे. प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्याच्या पाहणीसाठी अधिकारी प्रयागराजचा दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार श्रीमती फरांदे यांनीही विविध सूचना केल्या, तर महानगरपालिका आयुक्त खत्री यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.

## उपमुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीमुळे जिल्हाधिकारी कार्यालय गजबजले

**नाशिक : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आभार दौऱ्याच्या निमित्त नाशिक दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. ही बैठक दुपारी ४ वाजता होणार होती, त्यामुळे दुपारी २ वाजेनंतरच पोलीस प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयात कडेकोट बंदोबस्त केला होता.

मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार असल्याने बैठकीस शहरातील आमदार तसेच मनपा आयुक्त, विभागीय आयुक्त तसेच अनेक अधिकारी बैठकीस आल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातील वाहनतळ वाहनांनी भरून गेले होते. ना. शिंदे सव्वासहा वाजेच्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात आले. त्यानंतर एकच गर्दी झाली. त्यांच्यासमवेत शिक्षणमंत्री दादा भुसे देखील होते. त्यामुळे दोन्ही मंत्र्यांचा ताफा आणि त्यांच्यासमवेत असलेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमुळे कार्यालय गजबजले होते.उपमुख्यमंत्र्यांची बैठक ८ वाजता संपल्याने रोज सायंकाळी सहा वाजेनंतर शांतता होणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयात रात्री ८ वाजेपर्यंत गर्दी असल्याचे चित्र होते.



मॅक्सिव्हिजन ग्रुपची ओजस हॉस्पिटलसोबत भागीदारी पान ३

नाशिक आज
# गांवकरी



ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशनने आदिवासी शाळांना दिले संगणक पान ३

नाशिक, शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५

## नियोजनची बैठक होताच १६० कोटींचा निधी

### सिंहस्थाची धावपळ : नियोजित कामांना येणार वेग

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिंहस्थ कामांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये २०३ कोटी रुपयांची वाढीव मागणी करण्यात येताच शासनाकडून प्रलंबित १६० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्याने आता मान्यता मिळालेल्या प्राधान्यक्रमाच्या कामांना सुरुवात होण्याची दाट शक्यता आहे.**

जिल्हा नियोजन समितीला २४-२५ साठी मंजूर केलेल्या ८१३ कोटींच्या आराखड्यापैकी शासनाकडून मंगळवारी (दि. ११) अर्थात १६० कोटींचा निधी प्राप्त झाला. यापूर्वी ४८७ कोटींचा निधी प्राप्त झालेला आहे. यामुळे आता समितीला एकूण ६४७ कोटींचा निधी प्राप्त झाल्यानंतरही शासनाकडे १६६ कोटी रुपये शिल्लक आहेत.

गतवर्षी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीने ८१३ कोटींचा प्रस्ताव शासनाला सादर केला होता. यापैकी ४८७ कोटींचा निधी शासनाने डिसेंबरपर्यंत जिल्हा नियोजन समितीच्या खात्यावर वर्ग केला. त्यानंतर ३२६ कोटींचा निधी शासनाकडे शिल्लक होता.

लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून यंदाचा निधी देण्यास विलंब झाला. त्यामुळे कामांसाठी निधी नसल्याने अनेक विकासकामे मान्यता मिळाल्यानंतरही खोळंबली होती.




शिल्लक ३२६ कोटींच्या निधीपैकी १६० कोटींचा निधी जिल्हा नियोजन समितीच्या खात्यावर मंगळवारी वर्ग करण्यात आला. विशेष म्हणजे, मंगळवारीच अर्थमंत्री अजित पवार यांनी नियोजनची बैठक घेत त्यात माहिती घेतली होती.

### बैठक झाली आणि निधी आला...

जिल्हा नियोजन समितीची मंगळवारी (दि. ११) झालेल्या बैठकीत वित्तमंत्री अजित पवार, कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी मुंबईतून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहत जिल्ह्याच्या विकासाचा आढावा घेतला. यावेळी सिंहस्थकामांना वेग देण्याच्या सूचना अजित पवार यांनी दिल्या आणि लगोलग सायंकाळी निधी प्राप्त झाला.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ कोटी ९० लाखांचे अर्थसहाय्य

**नाशिक : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अपघातग्रस्त तसेच आर्थिक दुर्बल घटकांना अर्थसहाय्य करण्यात येते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून फेब्रुवारी २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीत अपघातात मयत झालेल्या नाशिक जिल्ह्यातील नागरिकांना व गरजवंतांना मदत करण्यात आली आहे. वर्षभराच्या कालावधीत विविध अपघातांत मयत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाइकांना १ कोटी ९० लाख ८७ हजार ६६२ रुपयांचे अर्थसहाय्य केले.**

यात मयत रामदास सिंग यांच्या वारसास १ कोटी ४ लाख ८७ हजार ६६२ रुपये इतके अर्थसहाय्य आरटीजीएस चेकद्वारे करण्यात आली तर मयत अनिता सिंग यांच्या वारसास ३० लाखांचे अर्थसहाय्य करण्यात आले. १२ जानेवारी २०२५ रोजी द्वारका येथे झालेल्या अपघातातील मयतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांचे अर्थसहाय्य करण्यात आले. यात वारस दीपाली संतोष मंडलिक यांना १० लाख, समाधान बानाजी कांबळे यांना ५ लाख, वर्षा प्रभाकर साबळे यांना ५ लाख, मधुमती सुनील घरटे यांना १० लाख, अफसाना शाहरुख खान यांना ५ लाख, दिनेश रघुनाथ पवार यांना ५ लाख, मधुमती मोहन गवांदे यांना १० लाख रुपयांचे अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून करण्यात आले. ज्यांना १० लाख रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. त्यांच्या कुटुंबातील दोन सदस्यांचे अपघातात निधन झाले. तसेच तहसीलदार प्रवीण पवार यांना एक लाखाचे अर्थसहाय्य करण्यात आले.

### सहाय्यता निधीतून यांना मिळते मदत

महाराष्ट्र राज्यातील तसेच देशातील आपत्तीग्रस्तांना तातडीने सहाय्यता देणे, हे मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे उद्दिष्ट आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठ्या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठीही या निधीतून अर्थसहाय्य पुरविले जाते.

## पांडवलेणीच्या डोंगरावर आग, वनसंपदा जळून खाक

### तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**मुंबई महामार्गावरील पांडवलेणीच्या बरोबर त्रिरश्मी लेणीच्या डोक्यावर असलेल्या जंगलाला शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास आग लागली. आगीचे वृत्त समजताच आग विझविण्यासाठी वनविभाग व इतर यंत्रणा तातडीने दाखल झाली. तब्बल तीन तास अथक परिश्रम घेतल्यानंतर आगीवर नियंत्रण करण्यात आले असले तरी या आगीत मोठ्या प्रमाणावर वनसंपदा जळून खाक झाली.**



नाशिक-मुंबई महामार्गावरील पांडवलेणी परिसरात घनदाट जंगल आहे. अतिशय जुने असे हे जंगल असून, या ठिकाणी असलेल्या जंगलात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींबरोबरच मोर, लांडोर, रानडुकरे व बिबटे यांसारखे प्राणी वास्तव्यास आहेत. या ठिकाणची नैसर्गिक वनसंपदा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या जंगलाचे नाशिक शहरातील नागरिकांबरोबरच येणाऱ्या पर्यटकांनादेखील मोठे आकर्षण आहे.

पांडवलेणी परिसरात असलेल्या या जंगलाला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागली. ही आग लागल्याचे लक्षात येण्यापूर्वीच आग मोठ्या प्रमाणावर भडकली. वनविभाग व इतर अधिकाऱ्यांना माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे काम सुरू केले, मात्र सध्या झाडांच्या पानगळीचा हंगाम असून, जंगलामुळे मोठ्या प्रमाणात पानगळ झालेल्या झाडांचा पाला असल्यामुळे आग भडकत आहे. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळविणे अवघड असून, मनपा व वन खात्याच्या प्रशासनाच्या वतीने आगीवर नियंत्रण आणले. पांडवलेणीतील एफडीसीएमचे वनक्षेत्र कक्ष क्र. २२५ मध्ये अज्ञात इसमांकडून आग लावण्यात आली. वनकर्मचारी आणि वनमजूर यांच्या सहाय्याने आग विझवण्यात आली. तसेच जळालेले क्षेत्र २ हे असून, कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच गुन्हा दाखल करून अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वनविभागाचे अधिकारी मयूर धोते यांनी सांगितले.

पांडवलेणी डोंगरावर सुरुवातीला लागलेल्या आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले होते. डोंगरावरील हवेचा वेग वाढल्याने आग जास्त वाढली. याचदरम्यान होणारा अनर्थ टाळण्यासाठी सिडको अग्निशमन विभागाला माहिती कळविण्यात आली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचा एक बंब स्टॅन्ड बाय ठेवण्यात आलेला आहे. फॉरेस्ट डिपार्टमेंट व अग्निशमन दल आग विझवण्याचे प्रयत्न करत आहे.




## आयमा व सीसीआयतर्फे उद्योजकांसाठी कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

**अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) आणि सीआयआय उत्तर महाराष्ट्र झोन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकांसाठी व्यवसायवृद्धी व आर्थिक सक्षमता या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. ६० महिला व पुरुष उद्योजक त्यात सहभागी झाले होते.**

उद्योजकांना यावेळी अमूल्य अंतर्दृष्टी आणि प्रत्यक्ष शिक्षण देण्यात आले. व्यवसाय कौशल्य वाढवणे, व्यवसाय प्रक्रिया आत्मसात करणे आणि महत्त्वपूर्ण आर्थीक अंतर्दृष्टी मिळवण्यास उत्सुक असलेल्या उद्योजकांना आकर्षित करणे, व्यवसायवृद्धी करून परकीय चलन प्राप्त करून देणे हा या कार्यक्रमामागचा हेतू असल्याचे मुख्य उद्देश होता.

उद्घाटनप्रसंगी आयमाचे अध्यक्ष ललित बूब यांच्या हस्ते झाले. भविष्याचा स्वीकार करताना या कार्यक्रमातून भविष्यातील आव्हानांना समोरे जाऊन उद्योजकांना सक्षम बनविण्याचे ध्येय या कार्यशाळेने निश्चितच गाठण्यात येणार आहे. व्यवसायवृद्धी, डिजिटल परिवर्तन आणि एआयचा वापर नवीन संधीच्यादृष्टीने एक कार्यशाळा म्हणजे एकप्रकारे गुरुकिल्लीच असल्याचे बूब यांनी मनोगतात सांगितले.

सीआयआय उत्तर महाराष्ट्र झोनचे सदस्य रवी महादेवकर यांनी कार्यक्रमातून उद्योजकांना स्पर्धात्मक युगात व्यवसाय भरभराटीसाठी आवश्यक असलेल्या ज्ञानाची माहिती उपलब्ध झाल्याचे सांगितले.

अमेय वझे यांनीही मार्गदर्शन केले. सेमिनार कमिटीचे देवेंद्र विभूते यांनी सूत्रसंचालन केले. समारोप आयमाचे बीओटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कार्यशाळेत उपस्थित असलेल्या उद्योजकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## एएचए एयरलाइन अँड हॉटेल मॅनेजमेंट अकॅडमीतर्फे रक्तदान शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

**सर्वांत श्रेष्ठ दान हे रक्तदान समजले जाते. व्हॅलेंटाइन डेच्या दिवशी तरुण-तरुणाई हा दिवस वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करतात. मात्र, एएचए एअरलाइन ॲण्ड हॉटेल मॅनेजमेंट अकॅडमीने या दिवशी समाजासाठी काही तरी केले पाहिजे, या उदात्त भावनेतून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.**



तिडके कॉलनी येथील एएचए एयरलाइन अँड होटल मॅनेजमेंट अकॅडमी, तिडके कॉलनी येथील महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये साईनाथ ब्लड बँकेच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिरात तीस बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. रक्तदात्यांचा यावेळी माणकेश्वर राम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. व्हॅलेंटाइन डे साजरा न करता रक्ताची गरज ही नेहमीच लागते. त्यामुळे या प्रेमाच्या दिवसाचे औचित्य साधून शिबिराचे आयोजन केल्याचे माणकेश्वर राम यांनी सांगितले. रक्तदान शिबिरासाठी अकॅडमीच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी तसेच रक्तपेढीच्या पथकाने या रक्तदान शिबिरासाठी परिश्रम घेतले.

## अल्पवयीन मुलीवर विधिसंघर्षित बालकाकडून बलात्कार

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**अल्पवयीन मुलीशी मैत्री करून तिच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्या विधिसंघर्षित बालकाविरुद्ध अंबड पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

१६ वर्षीय फिर्यादी मुलगी व आरोपी विधिसंघर्षित बालक एकाच क्लासमध्ये शिकत होते. त्यातून त्यांची ओळख होऊन त्यांच्यात मैत्री झाली होती. नोव्हेंबर २०२४ मध्ये दिवाळीची सुट्टी असल्यामुळे पीडितेच्या शाळेला सुट्ट्या होत्या. त्यावेळी फिर्यादी मुलगी ही घरी एकटीच राहत असल्यामुळे विधिसंघर्षित बालक तिला घरी भेटण्यासाठी यायचा. या बालकाने मुलीशी गोड बोलून तिची इच्छा नसताना तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. दोन-तीन दिवसांनंतर विधिसंघर्षित बालक पुन्हा पीडितेच्या घरी आला व त्याने पुन्हा शरीरसंबंध केले. मुलीने विरोध केला होता; मात्र विधिसंघर्षित बालकाने बळजबरी अत्याचार केले. आई रागावेल म्हणून पीडित मुलीने ही गोष्ट आईला सांगितली नव्हती. मात्र, विधिसंघर्षित बालकाकडून अधिकच त्रास होऊ लागल्याने तिने ही माहिती आईला दिली. त्यानंतर पीडितेने अंबड पोलीस ठाण्यात विधिसंघर्षित बालकाविरुद्ध फिर्याद दिली असून, त्याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक फुलपगारे करीत आहेत.

## हृदयी प्रीत फुलली ........

**नाशिक : प्रतिनिधी**

**'व्हॅलेंटाइन डे' हा प्रेमाचा दिवस मोठ्या उत्साहात तरुणाईने साजरा केला. महाविद्यालयातही व्हॅलेंटाइनचे रंग जाणवत होते. प्रेमात असणाऱ्यांसाठी व्हॅलेंटाइन डे खास असतो. व्हॅलेंटाइन डेला आपल्या व्हॅलेंटाइनला सरप्राइज देत आयुष्यात खास असल्याचे सांगण्यासाठी तरुण-तरुणींकडून अनेक दिवसांपासून नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे काल एकमेकांना भेटलेल्या प्रेमीयुगुलांच्या हृदयी प्रीत फुलल्याची भावना होती.**

शहरातील कॉलेज रोड, मॉल्स यांसह शहरातील विविध पर्यटनस्थळांवर प्रेमीयुगुलांनी गर्दी केली होती. गुलाबाचे फुल, चॉकलेट्स, भेटवस्तू देत आपल्या प्रेमभावना प्रियजनांसमोर व्यक्त करण्यात आल्या. तर काही प्रेमीयुगुलांनी आयुष्यभरासाठी प्रेमाच्या आणाभाका घेतल्या. अनेकांना नकार मिळाल्याने काहींचा व्हॅलेंटाइनला हिरमोड झाला. हॉटेल्स आणि कॉफी शॉपवर अनेकांनी गर्दी केली होती. तर काहींनी मात्र डेस्टिनेशन डेटला जात प्रेमाचा दिवस साजरा केला. नवश्या गणपती, बालाजी, सोमेश्वर, बापू पूल, कॉलेज रोड, गंगापूर डॅम बॅकवॉटर, तपोवन, खंडोबा टेकडी, पांडवलेणी, त्र्यंबकेश्वर ही ठिकाणे प्रेमीयुगुलांनी बहरली होती. आजच्या काळात व्हॅलेंटाइन हा फक्त महाविद्यालयीन युवक-युवती पुरता मर्यादित राहिला नाही. व्हॅलेंटाइनच्या निमित्ताने विवाहित दांपत्यांनीही पती, पत्नीवरील प्रेम नव्याने व्यक्त करत व्हॅलेंटाइन डे चे सेलिब्रेशन केले. सिंगल असणाऱ्यांनी आपल्या मित्रमैत्रिणींना व्हॅलेंटाइनच्या शुभेच्छा देत व्हॅलेंटाइन साजरा केला. व्हॅलेंटाइनच्या निमित्ताने अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरातील विविध भागात पोलिस बंदोबस्त होता. सोशल मीडियावर व्हॅलेंटाइनचे रंग सोशल मीडियावर स्टेट्स आणि मेसेजच्या माध्यमातून प्रेमभावना व्यक्त करण्यात आल्या. चित्रपटातील ग़ाणे, कविता, शायरी, चारोळीच्या माध्यमातून आपल्या प्रियजनांप्रति भावना व्यक्त करण्यात आल्या. तरुण-तरुणींप्रमाणे विवाहित दांम्पत्यही व्हॅलेंटाइन डेचे सेलिब्रेशन करण्यात अग्रेसर होते.

### सोशल मीडियावर व्हॅलेंटाइनच उत्साह

सोशल मीडियावर ही व्हॅलेंटाइनचा उत्साह जाणवत होता. व्हाटस अँपवर आपल्या व्हॅलेन्टाईन चे स्टेटस ठेवत प्रेम व्यक्त करत व्हॅलेंटाइनचे सेलिब्रेशन केले.



## महत्त्वाचे

### चंदुकाका सराफ यांचे 'स्पार्कल्स ऑफ लव्ह' कलेक्शन!

चंदुकाका सराफ
SINCE 1827
बारामतीची सुवर्णपेढी™

**नाशिक : प्रतिनिधी**

फेब्रुवारी हा प्रेमाचा महिना समजला जातो. या काळात आपल्या प्रियजनांना नावीन्यपूर्ण भेटवस्तू देण्याकडे लोकांचा विशेष कल असतो. प्रियजनांना खास प्रेमाची भेट देण्यासाठी चंदुकाका सराफ यांनी 'स्पार्कल्स ऑफ लव्ह' कलेक्शन! घेऊन आले आहेत. हिऱ्यांच्या अलंकारांची मनमोहक कलाकृती. ज्यामध्ये वैविध्यपूर्ण आणि नावीन्यपूर्ण हिऱ्यांचे दागिने आम्ही तुमच्यासाठी उपलब्ध करून देत आहोत. हे हिऱ्यांचे दागिने घेण्यासाठी चंदुकाका सराफ यांच्यातर्फे खास ऑफरही देण्यात येत आहे. आवडीच्या हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्क्यांपर्यंत सूट देत आहोत. ही ऑफर फक्त २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंतच लागू असणार आहे. हिऱ्यांच्या दागिन्यातून आपलं प्रेम व्यक्त करण्याची ही अप्रतिम संधी आहे. प्रियजनांसह स्टोअरला आवर्जून भेट द्या आणि तुमच्या प्रियजनांसाठी आवडीचे हिऱ्यांचे दागिने खरेदी करा, असे आवाहन चंदुकाका सराफ यांच्यातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी १८०० २६७ ८५५५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करा.

### नंदू चव्हाण यांना आरोग्य सेवारत्न पुरस्कार जाहीर

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



महिलांच्या मासिक पाळीबाबत समाजात जनजागृती, स्वयंरोजगार व पर्यावरण या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नंदू चव्हाण यांना माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन, मलकापूर, जि. बुलढाणा यांच्या वतीने राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार - २०२५ अंतर्गत आरोग्य सेवारत्न या पुरस्काराने मान्यवरांच्या उपस्थितीत दि. १६ मार्च २०२५ रोजी तालुका शिक्षक संघ पतसंस्था हॉल, मलकापूर, जि. बुलढाणा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सरपंच कमलबाई गायधनी, शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ आगळे, नासाकाचे माजी चेअरमन तानाजी गायधनी, कामगार नेते विष्णुपंत गायखे, उपसरपंच भाऊसाहेब गायधनी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष गणेश गायधनी, शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख दीपक गायधनी, माजी सरपंच नवनाथ गायधनी, अजित गायधनी, शाखाप्रमुख प्रकाश गायधनी आदींसह विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### एसएमआरकेमध्ये कॉमर्स वीकचा समारोप

**नाशिक : प्रतिनिधी**

एसएमआरके कॉलेजमध्ये कॉमर्स वीकचा समारोप झाला. गोखले एज्युकेशन सोसायटीचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर उपस्थित होते. कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या प्रमुख डॉ. आश्लेषा कुलकर्णी यांनी कॉमर्स वीक २०२५ चा अहवाल सादर केला. निबंध स्पर्धा, रिसर्च पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा तसेच मॅनेजमेंट गेम्स स्पर्धांतील विजेत्यांना अध्यक्षांच्या आणि प्राचार्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. जसलिन कौर बिंब हिला सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून गौरविण्यात आले. सर्व स्पर्धांचे प्रा. छाया लोखंडे, डॉ. सुरेश कानडे, प्रा. गुलाब गायकवाड, प्रा. तृप्ती जाधव, प्रा. मनीषा जाधव, डॉ. बोरसे, प्रा. प्रज्ञा अभ्यंकर, सविता यामिनी गालापुरे या परीक्षकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. विशाल वाघ यांनी आभार मानले. प्रा. यशवंत केळकर आणि प्रा. वाल्मीक गुंजाळ यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी मनीषा जोशी, संदीप ओढेकर, हेमा देशमुख, प्रणेता निकुंभ, अभिलाष शर्मा, वैशाली गायकवाड, वैशाली चौधरी, तृप्ती जाधव, संजोग अहिरवार यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

## मित्रांचे व्यापारी करार

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील द्विपक्षीय बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. तसेच अनेक क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावरही भर देण्यात आला. चर्चेदरम्यान रशिया-युक्रेन युद्धाचाही उल्लेख करण्यात आला. दोन्ही देशांच्या महत्वाच्या गोष्टींवर चर्चा करण्यात आली आणि करारही करण्यात आले. ते करार दोन्ही देशाच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगण्यात आले. मोदी आणि ट्रम्प एकमेकांचे खास मित्र आहेत, हे साऱ्या जगाला ठाऊक आहे. आठ वर्षांपूर्वी ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले होते तेव्हा मोदी यांनी त्यांना भारत भेटीचे खास निमंत्रण दिले होते. मोदी यांनी त्यांचे 'नमस्ते ट्रम्प' म्हणत जंगी स्वागत केले होते. त्यानंतर मोदी हे अमेरिकेच्या भेटीला गेले तेव्हा ट्रम्प यांनी तितकेच जंगी स्वागत केले होते. त्यावेळी 'हाऊडी'ची बरीच चर्चा झाली होती. परंतु, ट्रम्प यांचा निवडणुकीत बायडेन यांनी पराभव केल्याने सरकारी पातळीवर दोघांच्या मैत्रीत खंड पडला होता. ट्रम्प आता पुन्हा अध्यक्ष झाल्याने ही मैत्री पुन्हा एकदा बहरत आहे. मोदी अमेरिकेच्या भेटीला येणार असल्याचे ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हाच सांगितले होते. त्यानुसार मोदी दोन दिवसांच्या अमेरिका भेटीवर गेले. ट्रम्प यांनी मोदींचे विशेष भेट देऊन स्वागत केले. मिस्टर प्राईम मिनिस्टर, यू आर ग्रेट! अशा शब्दांत ट्रम्प यांनी मोदींचे स्वागत केले. व्हाईट हाऊसमध्ये त्यांच्या अनौपचारिक गप्पा रंगल्या. मोदींनी ट्रम्प यांची गळाभेटही घेतली. यानंतर ट्रम्प यांनी स्वत:चं फोटोबुक 'अवर जर्नी टुगेदर' मोदींना भेट दिले. या पुस्तकात डोनाल्ड ट्रम्प यांचा राष्ट्राध्यक्षपदाचा पहिला कार्यकाळ, त्यातील महत्त्वाच्या घटना यांचा समावेश आहे. मोदी सप्टेंबर २०१९ मध्ये अमेरिका दौऱ्यावर असताना 'हाऊडी मोदी' या कार्यक्रमातील फोटोंचाही समावेश करण्यात आला आहे. 'नमस्ते ट्रम्प'चाही समावेश आहे. बैठकीनंतरच्या पत्रकार परिषदेदरम्यान ट्रम्प यांनी मोदींना ते पुस्तक भेट म्हणून दिले. या पुस्तकात ट्रम्प यांनी स्वहस्ते मोदींसाठी संदेश लिहिला आहे. यात मिस्टर प्राईम मिनिस्टर, यू आर ग्रेट (मिस्टर प्राईम मिनिस्टर, तुम्ही महान आहात), असा उल्लेख ट्रम्प यांनी केला आहे. यावरुन दोघांची मैत्री किती घट्ट आहे, याचा प्रत्यय येतो. या मैत्रीत भारताचे आणि अमेरिकेचे हित दडलेले आहे. त्याचे प्रत्यंतर दोन देशात झालेल्या चर्चेत आणि करारांमध्ये दिसून येते. दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय तसेच महत्त्वाच्या जागतिक विविध मुद्द्यांवर चर्चा झाली आणि काही निर्णयही झाले. अमेरिकत आयात वस्तूंवर भरमसाठ तर लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आहे. भारतही अमेरिकन वस्तूंवर जादा कर आकारत आहे. याचा व्यापारावर होत आहे. हे दोन्ही नेत्यांच्या लक्षात आले. भारत अनेक वस्तूंवर ३०, ४०, ६० आणि अगदी ७० टक्के कर लादतो. काही बाबतीत तर त्याहूनही जास्त कर आकारला जातो. अमेरिकन मोटारगाड्यांवर भारतात ७० टक्के कर लावला जात असल्याने त्या कार विकणे जवळजवळ अशक्य झाले आहे. यामुळे व्यापारी तूट निर्माण झाली आहे. ती सुमारे १०० अब्ज डॉलर्स इतकी आहे. ही तूट भरून काढण्यासाठी तेल आणि वायूची विक्री अमेरिका भारताला करणार आहे. व्यापारातील असमानता दूर करण्यासाठी वाटाघाटी करण्यावर ट्रम्प यांनी भर दिला. इंधन तेल आणि वायू, द्रवरुप नैसर्गिक वायूच्या (एलएनजी) विक्रीद्वारे तूट भरुन काढण्याचे ट्रम्प यांनी ठरविले आहे. अमेरिकेकडे एलएनजी उत्पादने सर्वाधिक आहेत. यामुळे भारताला एलएनजी उत्पादने अमेरिकेकडून मिळणार आहेत. भारताला तेल आणि वायूचा पुरवठा करण्याचा करारही करण्यात आला आहे. आता अमेरिकेडूनही तेल व वायू उपलब्ध होणार असल्याने दोन्ही देशांतील व्यापारी तूट कमी होण्यास मदत होणार आहे. इंधन आणि वायूसाठी भारत बऱ्याच अंशी रशियावर अवलंबून आहे. युक्रेन युध्द सुरू झाले तेव्हा भारताने रशियाकडून स्वस्तात तेल घेतले होते. भारत आणि अमेरिकेतील व्यापार दुप्पट करण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली आहे. अणु तंत्रज्ञानासाठी भारत आपल्या कायद्यांमध्ये सुधारणा करत आहे. यामुळे लाखो भारतीयांना सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणारी वीज मिळेल आणि भारतातील अमेरिकन नागरी अणु उद्योगाला अब्जावधी डॉलर्स मिळतील. सध्या भारत आणि अमेरिकेतील व्यापार १२९.२ अब्ज डॉलर्सचा आहे. सन २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत न्यावा लागणार आहे. ट्रम्प यांनी भारताला एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने पुरवण्याचा निर्णय घेतला आहे. हा संरक्षणविषयक करार आहे. याशिवाय भारताला लष्करी उपकरणांची विक्री मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात येणार आहे. यामुळे भारताची संरक्षण यंत्रणा मजबूत होण्यास मदत होणार आहे. भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉरसाठी अमेरिका तयार झाली आहे. खरं तर, हा एक असा कॉरिडॉर आहे. याद्वारे शिया, अरबी आखात आणि युरोपमधील आर्थिक एकात्मता आणि कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळू शकते. चीनच्या रोड अँड बेल्ट प्रोजेक्टला विरोध म्हणून या कॉरिडॉरकडे पाहिले जात असल्याने त्याला महत्त्व आहे. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे अमेरिकेत भारताचे दोन नवीन दूतावास उघडण्यात येणार आहे. लवकरच बोस्टन आणि लॉस एंजल्समध्ये ही दूतावासे असतील. या दूतावासांमुळे भारत आणि अमेरिकेतील जनतेशी असलेले संबंध अधिक मजबूत होतील. सन २००८ साली नोव्हेंबर महिन्यात मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार तहव्वूर राणाला भारताकडे सोपवले जाणार असल्याची घोषणा ट्रम्प यांनी करुन भारताची जुनी मागणी मान्य केली आहे. पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असलेल्या तहव्वुर राणाच्या प्रत्यार्पणाची मागणी भारत बऱ्याच काळापासून करत होता. हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड कोलमन हेडलीला मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणांवर रेकी करण्यासाठी त्याने मदत केली होती. काही दिवसांपूर्वीच अमेरिकेतील न्यायालयाने राणाचे प्रत्यार्पण करण्यास मंजुरी दिली होती. त्यानुसार ट्रम्प हा निर्णय जाहीर केला. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत आणि अमेरिका एकत्र उभे असल्याचे यातून पुन्हा एकदा दिसून आले आहे. द्विपक्षीय संरक्षण व सुरक्षा, व्यापार व तंत्रज्ञान, ऊर्जा संबंध , लोकसंपर्क आणि दहशतवादाविरोधी कारवाई यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. यात दोन्ही देशांचे हित साधले जाणार आहे. मात्र, अमेरिकेचा भारताशी व्यापार वाढणार आहे. या भेटीत मोदी यांनी भारताच्या काही भूमिका स्पष्ट केल्या. युक्रेन युध्दात भारत तटस्थ असल्याचे दिसत आले आहे. परंतु, भारत तटस्थ नाही, तर भारताला शांतता हवी आहे, अशी मुत्सद्दी भूमिका मोदींनी मांडली. युद्ध संपवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी चर्चा केल्याची बातमी आली असताना ट्रम्प यांच्या प्रयत्नांना मोदींनी आपला पूर्ण पाठिंबा दिला. 'हे युद्धाचे युग नाही.' असे आपण पुतिन यांना सांगितल्याची आठवण मोदी यांनी करुन दिली. दहशतवादविरोधी लढाईत भारत अमेरिकेबरोबर असल्याची ग्वाही त्यांनी पुन्हा एकदा दिली. दोन मित्रांनी केलेल्या चर्चेतून अमेरिकेचा व्यापारी फायदा होणार असून, भारताला तेल, वायू, विमाने, संरक्षण साधने, अणुऊर्जा तंत्रज्ञान मिळणार आहे. दोन्ही देशांतील संबंध आणखी दृढ होतील.

## विचारधन



### जेथे नाम, तेथे मी

मला नामात पहा असे मी म्हणतो याचा अर्थ, मी देहात नसून, माझी वसती नामातच असते; कारण आपले मन जिथे असते तिथेच आपण खऱ्या अर्थाने असतो. समजा तुम्ही यात्रेला गेला आहात; पण मन घराबद्दलच चिंतन करीत असेल तर तुम्ही देहाने क्षेत्रात असलात तरी खऱ्या अर्थाने घरीच आहात असे नाही का होत? त्याप्रमाणे तुम्हाला जर कुणी विचारले की, 'तुम्ही नेहमी कुठे असता', तर आम्ही नेहमी विषयातच असतो, असेच सांगावे लागेल. ज्यांना जे जास्त आवडते त्यातच ते असतात, हे खरे ना? मग तुमचा गुरू कुठे आहे असे जर कुणी विचारले तर तो नामात आहे असेच म्हणाल ना? म्हणून, जिथे नाम चालू आहे तिथे मी आहेच; जो नामस्मरण करतो त्याच्या मागेपुढे मी उभा आहे. शास्त्री-पंडित म्हणतात की, आमच्याकरिता ज्ञानमार्ग आहे. पण त्यांच्या लक्षात येत नाही की तो अत्यंत कठीण आहे. त्यात अभिमान नष्ट होण्याऐवजी वाढण्याचाच संभव जास्त असतो. 'ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या' हे तत्त्व त्यांच्या बुद्धीला पटते, पण त्यांच्या अनुभवाला मात्र येत नाही. जग मिथ्या आहे असे ते म्हणतात, पण आपल्या देहाला मात्र सत्य मानतात. नुसत्या विचाराने देहाचे मिथ्यत्व अनुभवाला येणे अत्यंत कठीण आहे. कर्मठ लोक म्हणतात की, 'आम्ही आमच्या कर्ममार्गानेच जाणार. आमचा नामावर विश्वास नाही. आम्ही वेदांनी घालून दिलेली बंधने आणि नियम यांचे पालन करणार' असे म्हणून ते बंधने आणि नियम यांचे इतके काही पालन करतात की, ते बंधनालाच सर्वस्व मानतात. त्यांच्या हे लक्षात येत नाही की, ईश्वरप्राप्ती हे साध्य असून, बंधने आणि नियम हे साधनरूप आहेत. साध्य साधण्यापुरतीच बंधने पाळायला हवीत. फुलझाडांची बाग रक्षण करण्यपुरतेच तिचे कुंपण सांभाळायला हवे. पण ते कुंपणालाच सर्वस्व मानतात, त्याला खतपाणी घालून वाढवितात; आतल्या बागेकडे लक्ष देत नाहीत. वैदिक कर्माने चित्तशुद्धी होते हे मी मान्य करतो, परंतु ज्या भगवंताची प्राप्ती व्हावी म्हणून चित्तशुद्धी करायची, त्या भगवंताचे अधिष्ठान जर वैदिक कर्मांना नसेल, तर कर्ममार्गाचे पर्यवसान कर्मठपणात होते. नामावर विश्वास नाही असे ते म्हणतात, पण संध्येच्या किंवा कोणत्याही वैदिककर्माच्या सुरुवातीला 'ॐ केशवाय नम:' असे म्हणतात, ते नाम नव्हे काय? वेद म्हणजे भगवंताची स्तुती होय. ती करीत असताना आपले लक्ष शब्दांकडे नसावे, त्यांच्या अर्थाकडे असावे; अर्थ न समजला तरी भगवंताकडे असावे. - **गोंदवलेकर महाराज**

# साहित्यात जीवनाचे गंभीर तत्त्वज्ञान मिर्झा गालिब

**मंथन**


**श्रीकृष्णदास निरंकारी**

_ मिर्झा असदुल्ला खान 'गालिब' हे एक प्रसिद्ध फारसी आणि उर्दू कवी होते. ते सुधारक वृत्तीचे, सर्व धर्मांना समान मानणारे, कर्मठ नसलेले, नमाज पढणारे, रोजा ठेवणारे, कलेचे आसक्त, रसिक व्यक्ती होते. मिर्झा गालिबजी हे थोरल्या बाजीरावांची पत्नी मस्तानी हिच्या वंशात जन्माला आले होते. त्यांनी फारसी भाषेत लिखाण काम सुरू केले. त्यांच्या साहित्यात जीवनाचे गंभीर तत्त्वज्ञान त्यांनी मांडले.

जीवनाच्या झळा सोसून मिर्झा गालिबजींनी त्या सुंदर करून काव्यातून मांडल्या. त्यांनी एकूण १८ हजारच्या वर शेर फारसी भाषेत रचले. पुढे मित्रांच्या आग्रहाखातर त्यातीलच हजार-बाराशे शेर त्यांनी उर्दू भाषेत लिहिले. त्यांनी कधी कोणताही उद्योगधंदा केला नाही. मित्रांच्या आणि नातेवाइकांच्या सहकार्याने ते राहत. त्यांना स्वत:ला प्रसिद्धी मिळविण्याची गरज वाटली नाही. उत्तर मोगल काळातील राजांच्या, उमरावांच्या दरबारी जाणेही त्यांना आवडत नसे. ते म्हणाले होते, माझ्या कविता माझ्या मृत्यूनंतरही अजरामर राहतील. ते तंतोतंत सत्यात उतरले आहे. त्यांच्याच शब्दांत-

**हैं और भी दुनियामें**
**सुखन-वर बहुत अच्छे;**
**कहते हैं कि गालिब**
**का अंदाज-ए-बयाँ और।**

मिर्झा गालिब हे एक प्रख्यात उर्दू कवी होते. त्यांचे पूर्णनाव मिर्झा अब्दुल्ला खान व टोपणनाव 'गालिब' असे होते. गालिबजींचा जन्म आग्रा येथे दि. २७ डिसेंबर १७९७ रोजी झाला. त्यांचे वडील मिर्झा अब्दुल्ला बेग खान हे लष्करात अधिकारी होते. ते गालिब पाच वर्षांचे असतानाच एका लढाईत मारले गेले. त्यानंतर त्यांचा सांभाळ आग्र्यास त्याच्या आजोबांनी केला. तेथे ते ऐषो-आरामात वाढले. तत्कालीन पद्धतीनुसार त्यांचे अरबी व फारसीचे शिक्षण झाले. ते मुळातच बुद्धिमान आणि प्रतिभासंपन्न होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा उमराव बेगमशी विवाह झाला आणि सतराव्या वर्षी ते दिल्लीत स्थायिक झाले. सन १८२८च्या सुमारास ते वर्षासनाच्या खटल्यानिमित्त कलकत्त्यास गेले. तेथे ते सुमारे दोन वर्षे होते, तथापि या खटल्याचा निकाल त्यांच्याविरुद्ध गेल्याने ते दिल्लीस परतले. या खटल्यात त्यांचे सर्व प्रयत्न अपयशी ठरल्यामुळे त्यांना फार मनस्ताप झाला. कर्जही बरेच झाले, मात्र त्यांनी वर्षासनास आपले प्रयत्न मोठ्या चिकाटीने चालूच ठेवले. त्यांचे बहुतांश आयुष्य दिल्लीतच व्यतित झाले. मिळणारे तुटपुंजे वर्षासन तसेच अयोध्येच्या नबाबाकडून आणि दिल्ली दरबारातून मिळणाऱ्या थोड्याफार वेतनावरच राहावे लागले. अतिशय तंगीत ते आपला निर्वाह करू लागले. उत्पन्नाच्या मानाने त्यांचा खर्च बराच होता. त्यातल्या त्यात त्यांना दारूचेही व्यसन होते. त्यामुळे ते अतिशय कर्जबाजारी बनले. त्यांना जुगाराचाही नाद असल्याने तुरुंगातही जावे लागले होते. या



घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाल्याचे त्यांच्या काव्यातून आणि पत्रव्यवहारातून दिसून येते. त्यांना सात मुले झाली, पण ती अल्पवयात वारली. त्यांचे कौटुंबिक जीवनही फारसे सुखी नसावे, असे दिसते. सन १८५७च्या उठावाच्या वेळी ते दिल्लीतच होते. दस्तंबू या रोजनिशीवजा फारसी गद्यग्रंथात त्यांनी या उठावाची हकिगत लिहून ठेवली आहे. दि.११ मे १८५७ ते ३१ जुलै १८५८ पर्यंतच्या घटना या रोजनिशीत आल्या आहेत. त्यात त्यांनी केवळ आपद्धर्म म्हणून इंग्रजांची स्तुती आणि उठाव करणाऱ्यांची निंदा केली आहे. तथापि त्यांनी आपल्या मित्रांना लिहिलेल्या पत्रांतील त्यांची मते याहून सर्वस्वी वेगळी व विरोधीही आहेत. एक शेर-

**दिल-ए-नादाँ तुझे हुँआ क्या?**
**आख़िर इस दर्द की**
**दवा क्या है?**
**नुक्ताचीं है ग़म-ए-दिल**
**उस को सुनाये न बने!**

त्यांच्या समग्र फारसी कवितांचा कुल्लियात-इ-गालिब हा संग्रह प्रसिद्ध असून, त्यात कसीदा, गझल, मस्नवी आदी प्रकारांतील रचनांचा समावेश आहे. त्यांच्या उर्दू रचनेचा दीवान-इ-गालिब हा संग्रह इतका गाजला, की त्यांच्या हयातीतच त्याच्या चार आवृत्त्या निघाल्या. फारसी धर्तीच्या रचनेमुळे यातील त्यांची काही रचना दुर्बोध झाली आहे, तथापि जी सोपी आहे ती अतिशय कलात्मक व प्रसन्न आहे. आपला आशय ते सखोल अनुभूतीतून व अभिनव पद्धतीने व्यक्त करतात. या दोन काव्यसंग्रहांव्यतिरिक्त त्यांचे काही फारसी व उर्दू गद्यग्रंथही आहेत. फारसी गद्यग्रंथांत मिहर-इ-नीमरोज हा तैमूर वंशाचा हुमायूनपर्यंतचा इतिहास, पहिला खंड, कुल्लियात-इ-नस्र हा गद्यलेखांचा संग्रह, दस्तंबू हा १८५७च्या उठावाची हकीगत, पंज-गंज-इ-आहंग हा फारसी व्याकरण व शैलीवरील प्रबंध, कातिअ-इ-बुर्हान हा बुर्हान-इ-कातिअ या फारसी शब्दकोशावरील टीका यांचा समावेश होतो. त्यांच्या उर्दू गद्यग्रंथांत ऊद-इ-हिंदी आणि उर्दू-इ-मुंअल्ला या दोन पत्रसंग्रहांचा अंतर्भाव आहे. त्यांच्या या सर्वच फारसी-उर्दू ग्रंथांच्या अनेकांनी पुढे विविध आवृत्त्या प्रकाशित केल्या.

गालिबजींनी आपल्या मित्रांना व अनुयायांना वेळोवेळी लिहिलेली उर्दू पत्रे वाङ्मयीनदृष्ट्या श्रेष्ठ असून, त्यांची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळेच ते आधुनिक उर्दू गद्याचे प्रवर्तक मानले जातात. त्यांच्या या पत्रांतून तत्कालीन मुस्लिम समाजाच्या विविधांगावर तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरही चांगला प्रकाश पडतो. त्यांच्या या पत्रांची गणना उर्दूतील अभिजात साहित्यात केली जाते. फारसी व उर्दू यांच्या संश्लेषणातून गालिबजींनी आपली उर्दू कविता लिहिली. सखोल अनुभूती व तात्त्विक चिंतन यांचा कलात्मक आविष्कार त्यांच्या काव्यात आढळतो. धार्मिक व सांप्रदायिक भेदभावांना त्यांच्या विचारात स्थान नाही. त्यांच्या मते केवळ एकाच परमेश्वराची शुद्ध उपासना करणाऱ्याच्या ठिकाणी धार्मिक भेदभावाच्या भावनेचा लोप होतो. प्रत्येक धर्मी व उपासकास तो एकच परमेश्वर नेतो. अपार सहानुभूती व मानवतेचे असीम प्रेम यांचे ते उपासक होते. त्यांचा मित्रपरिवार व अनुयायीवर्ग फार मोठा होता व त्यांत विविध धर्मांचे लोक होते. त्यांचे काव्य कळावयास कठीण असले, तरी त्यात एकदम हृदयाला जाऊन भिडण्याचे सामर्थ्य आहे. तुर्की परंपरेस अनुसरून त्यांच्या ठिकाणी पावित्र्याची चाड, पराकाष्ठेचा अभिमान, गूढवाद, ऐहिक जीवनातील सुखदु:खे, परंपरागत सामाजिक रूढी, उदारमतवाद तसेच नैराश्य व आशावाद यांचे चमत्कारिक मिश्रण झालेले दिसून येते. गालिबजींची फारसी गद्य-पद्य रचना उत्कृष्ट असूनही आजवर ती उपेक्षितच राहिली आहे. समीक्षकांचे तिच्याकडे म्हणावे तसे लक्ष वेधले नाही आणि त्यामुळेच तिचे यथायोग्य मूल्यमापनही होऊ शकले नाही. बघा-

वयाच्या अकराव्या-बाराव्या वर्षापासूनच ते कविता रचू लागले आणि पंचविसाव्या वर्षापासून त्यांनी उर्दूत काव्यरचना केली. त्यांच्या सुरुवातीच्या रचनेवर फारसी कवी बेदिल यांचा प्रभाव होता. बेदिलचे ऋण त्यांनी आपल्या काव्यात मोकळ्या मनाने मांडले आहे. नंतरच्या त्यांच्या रचनेवर मात्र कोणाही कवींचा प्रभाव नसून, ती संपूर्णपणे स्वतंत्र आहे.

# थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

**आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले, ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच, पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्त्वज्ञान सांगितले. त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते.**

**मंथन**

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपूर, जिल्हा आंध्र प्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की, त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी-परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेपणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई



धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरीती आहेत. या अनिष्ट चालीरीतीमुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरीती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे, असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता. म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याचा विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षांपूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली. या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला. त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यांसारखे शूरसेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा, जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शूरसेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# रेवडी संस्कृतीला न्यायालयाने आरसा दाखविला

**विशेष**

**सुनील कुवरे**

गेल्या काही वर्षांपासून निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय पक्षांनी रेवडी संस्कृती अमलात आणली आहे. रेवडी संस्कृतीला धरबंदच उरला नाही. निवडणुकीत मतदारांना लालूच दाखवण्याच्या स्पर्धेतून रेवडी संस्कृतीचा जन्म झाला. रेवडी संस्कृतीच्या कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. केंद्र सरकारने गरिबांना फक्त मोफत रेशन देत राहण्यापेक्षा रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनांना रेवडीची उपमा देत खिल्ली उडवली होती. मात्र, आता ते आणि त्यांच्या पक्षांच्या सरकारांनी ही रेवडी संस्कृती मध्य प्रदेश, महाराष्ट्र अशा अनेक राज्यांतून अमलात आणली. आता या रेवडी संस्कृतीला सर्वोच्च न्यायालयाने आरसा दाखविला आहे. न्यायमूर्ती भूषण गवई आणि जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने लाडकी बहीण, मोफत रेशन यांसारख्या योजनांमुळे लोकांना काम करावेसे वाटत नाही. असे निरीक्षण नोंदवून लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणा, असे सांगून न्यायालयाने केंद्र सरकारला आरसा दाखविला आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. मुळात सरकार लोककल्याणकारी असले पाहिजे आणि सामान्यांची काळजी घेतली पाहिजे. पण त्यासाठी केवळ मोफत योजना जाहीर करून जनतेला आळशी बनविणे योग्य नाही. जनता जर सरकारवर अवलंबून राहणार असेल तर ते एकूणच देशाच्या विकासासाठी देखील पोषक नसते. जनतेचे सरकार अवलंबून राहणे वाढले की, सरकार मोफतच्या योजनांमध्ये अडकून सरकार कोणतेही निर्णय घेण्यास मोकळे. सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. या देशाचे करदाते जो कर भारतात तो देशाच्या विकासासाठी. परंतु सरकारी तिजोरीवर मोफत योजनांचा ताण पडला तर तेथे खडखडाट होतो. त्यामुळे सरकारची आर्थिक स्थिती बिघडते. लोकांना मोफत रेशन, पैसा, घर मिळाले तर त्यांना जबाबदारीची जाणीव होणार नाही. तसेच सरकारी तिजोरीवर पडणारी वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आम जनतेवर कराचा बोजा लादला जातो. एका हाताने देऊ, दुसऱ्या हाताने काढून घेते. हे लोकांना कळत नाही. ऐंशी कोटी जनतेला मोफत धान्य पुरवठा केल्याबद्दल केंद्र सरकार स्वत: ची पाठ थोपटून घेते. पण यामुळे केंद्राच्या तिजोरीवर जवळपास तीन लाख कोटी रुपयांचा बोजा पडत आहे. आज मोफत योजनेमुळे महाराष्ट्र राज्याची आर्थिक स्थिती बिघडली आहे. विकास योजनांचा पैसा मोफत योजनांकडे वळविला गेला आहे. तेव्हा सर्वोच्चन्यायालयानेरेवडीसंस्कृतीला चाप लावण्याची आवश्यकता आहे.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### सण असताना डेज कशाला?

व्हॅलेंटाइन वीकला सुरुवात झाल्याने समस्त गिफ्ट शॉप्स रंगीबेरंगी भेटवस्तूंनी सजली आहेत. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली; मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचीच ही चिन्हे आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. व्हॅलेंटाइन डेची क्रेझ जेवढी भारतात पाहायला मिळते तेवढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये क्वचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध डेज भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात त्यातही खासकरून शहरांसारख्या ठिकाणी तरुण-तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण आहे. या दिवसांत डेजच्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. असल्या विदेशी भोगवादी



दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या डेजचा कमालीचा मनस्ताप होतो. रोज डे, प्रपोझ डे, प्रॉमिस डे, किस डे, हग डे, चॉकलेट डे आणि व्हॅलेंटाइन डे यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. अशा डेजच्या माध्यमातून स्वैराचाराला प्रोत्साहन मिळते. प्राचीन हिंदू संस्कृतीने आपल्याला सण-उत्सवांचे भांडार उपलब्ध करून दिले असताना भारतीय संस्कृतीवर आघात करणारी आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारी ही डेज नावाची विकृती आपल्या देशात हवी तरी कशाला?

**- मोक्षदा घाणेकर**

### फक्त साहित्य मेजवानी मिळावी!

९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाची स्थळासह घोषणा झाली खरी आणि यजमानपदावरून डाव्या उजव्यांची कुजबूज रंगू लागली, अशी बातमी वाचण्यात आली. निदान साहित्य प्रांतात तरी डावे, उजवे, गट तट असे काही नसावेत. विचारांचे प्रवाह वेगवेगळे असू शकतात पण ते केवळ साहित्यविषयक निगडित राहावेत. उपस्थितांना फक्त साहित्य मेजवानी मिळावी एवढीच अपेक्षा साहित्यप्रेमींची असते आणि ती मिळावी. श्रेयवाद, डावे, उजवे अशा गोष्टी साहित्य संमेलनापासून कोसभर दूर राहाव्यात हीच माफक अपेक्षा.

**- विश्वनाथ पंडित,** ठाणे

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मंडळ बरखास्त

**मुंबई :** न्यू इंडिया कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेडवर रिझर्व बँकेनं मोठी कारवाई केली आहे. या बँकेचं मुंबईचं संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलं आहे. १२ महिन्यांसाठी हे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलं आहे. आरबीआयकडून संचालक मंडळाला हा मोठा दणका मानला जात आहे. आरबीआयकडून या बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. प्रशासकाच्या मदतीला अॅडव्हायजर कमिटीची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. कमिटीमध्ये आरबीआयचे माजी जनरल मॅनेजर रविंद्र सप्रा आणि सीए अभिजित देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. न्यू इंडिया कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड या बँकेवर आरबीआयकडून कारवाई करण्यात आली असून ही कारवाई ३५ अ अंतर्गत करण्यात आली आहे. दरम्यान, बँकेच्या अंधेरी शाखेबाहेर उभ्या असलेल्या ग्राहकांना बँकेने आत घेतले आहे. ज्यांचे लॉकर संदर्भात काम आहे त्यांनाच आत घेतले आहे. इतरांना उद्या येण्यास सांगितले आहे. बँकेची वेळ संपल्याने शाखा बंद करण्यात येत आहे. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहता, ठेवीदारांना त्यांच्या बचत किंवा चालू खात्यातून पैसे काढू देऊ नयेत, असे निर्देश बँकेला देण्यात आले आहेत. बँकेला ठेवींवर कर्ज सेट ऑफ करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. ठइख च्या म्हणण्यानुसार, पात्र ठेवीदारांना डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन कडून ५ लाख रुपयांपर्यंतची विमा रक्कम मिळण्याचा अधिकार असेल.

### नाईन पर्ल्स हॉस्पिटलमध्ये रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रियेला सुरुवात

**नाशिक : प्रतिनिधी** उत्तर महाराष्ट्रातील सर्वाधिक १४,००० हून अधिक सांधेरोपण शस्त्रक्रिया करण्याचा १९ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉ. योगेश चौधरी यांच्या नाईन पर्ल्स हॉस्पिटल येथे रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर करून उतार वयात गुडघे दुखीने त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी हे तंत्रज्ञान उपयोगी ठरत आहे . या तंत्रज्ञानाच्या साह्याने गुडघेरोपण (सांधेरोपण) शस्त्रक्रिया करताना सांधेरोपण शस्त्रक्रियेपूर्वीच पूर्णतः नियोजन केले जात असून याचे अनेक फायदे रुग्णांना होत असतात . योगेश चौधरी हे गुडघे रोपणातील नॅनो टेक्नॉलॉजीचे प्रणेते असून उत्तर उत्तर महाराष्ट्रात सांधेरोपण बाबत जनजागृती करायचे काम देखील ते गेली अनेक वर्ष करत आहेत. वयोमानानुसार गुडघ्यांची झीज होते त्याला दुसरा कृत्रिम गुडघा लावण्याशिवाय पर्याय नसतो .गुडघा बदलल्यानंतर नियमित जीवनशैली जगता येते. गुडघ्याच्या त्रासामुळे अनेकदा हालचाल कमी होते त्यामुळे स्थूलता, मधुमेह रक्तदाब असे अनेक आजार देखील उद्भवू शकतात याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले. यावेळी नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे संचालक व कर्मचारी उपस्थित होते.



### सावनी रवींद्रच्या मधुर आवाजासोबत अभिनयाचीही चर्चा

**मुंबई :** सर्वत्र व्हॅलेंटाइन वीक सुरू असल्याचं पाहायला मिळतंय. आणि या व्हॅलेंटाइन वीकदरम्यान अनेक नवनवीन प्रेमगीत प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत. अशातच सर्वांची लाडकी, राष्ट्रीय पुरस्कार विजेती गायिका सावनी रवींद्र हिच्या सुद्धा एका सुंदर अशा गाण्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. सावनीने आजवर अनेक भाषांमध्ये गायन केले आहे. तसेच मराठी आणि इतर भाषिक चित्रपटांसाठी अनेक सुमधुर गाणी गायली आहेत. यामधे फक्त गाण्यावरच ती न थांबता तिने या गाण्यात अभिनयसुद्धा केला असल्याचं पाहायला मिळतंय. 'मनमोही' असे या गाण्याचे नाव असून या गाण्यात सावनी रविंद्र सह सुप्रसिद्ध अभिनेता अभिजीत खांडकेकरने मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. तसेच लोकप्रिय बालकलाकार केया इंगळे हिने साकारलेली भूमिका ही लक्षवेधी ठरली आहे. मनमोही चं सुंदर संगीत प्रणव हरिदास याचे असून वलय मुळगुंद याचे शब्द मनाला भावणारे आहेत. सावनी बरोबर या गाण्यात सुप्रसिद्ध गायक अभय जोधपुरकर याच्या आवाजाची जादू अनुभवायला मिळते. 'मनमोही' या गाण्याची कथाही आशयघन असल्याचे पाहायला मिळते. एक मोडलेला संसार जेव्हा दुसरा व्यक्ती येऊन सावरतो आणि त्या कुटुंबाला आधार देतो याचं वर्णन या गाण्यातून करण्यात आलं आहे. गाण्याबद्दल बोलताना सावनी म्हणाली, या गाण्याला अल्पावधीतच प्रेक्षकांचा मिळालेला पाठिंबा पाहून खूप छान वाटतंय. सावनी ओरिजनल चं हे पहिलं असं मराठी गाणं आहे ज्यात मी गायन आणि अभिनयाच्या दोन्ही भूमिका साकारल्या आहेत.



आजवर 'सावनी ओरिजनल'मध्ये मी तामिळ, तेलगू, मल्याळम,बंगाली, गुजराती अशा विविध भाषांमध्ये गाणी गायली होती पण आज मी पण मराठी गाण्यातून पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीसाठी येत आहे. या गाण्यात काम करण्याचा आनंद खूपच चांगला होता. गाणं गाताना मजा आली त्याहून जास्त गाणं शूट करताना आली. या गाण्यात माझा सहकलाकार अभिजित खांडेकर आहे. अभिजित माझा चांगला मित्र असून, बरेच दिवसांपासून आम्हाला एकत्र काहीतरी काम करायचं होतं आणि तो योग या 'मनमोही' गाण्यानिमित्त जुळून आलाय. यंदाच्या लग्नसराईमध्ये हे गाणं धुमाकूळ घालेल यात शंका नाही.

### एचपी,भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑईलतर्फे सक्षम पंधरवडा

**नाशिक : प्रतिनिधी** पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी, इंधन कार्यक्षम उपकरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेट्रोलियम संवर्धनासाठी धोरणे आणि धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्यानी (ओएमसी) सक्षम उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण देशभर ज्याची टॅगलाइन ग्रीन अॅड क्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायर्नमेंट असेल १४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत तेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येणारअसल्याची माहिती पत्रकार परिषदेत सेल्स ऑफिसर प्रथमेश सोनवणे यांनी दिली यावेळी एचपी,भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑईल कंपन्यांचे सेल्स ऑफिसर जयदीप बारडोले.देवेंद्र पाटील अविनाश सक्सेना उपस्थित होते. या पंधरवड्यात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा/वादविवाद, महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी/भिंतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेख लेखन, टीव्ही/रेडिओवरील टॉक शो असे विविध उपक्रम राबवले जातील.

# सेन्सेक्स २०० पेक्षा जास्त अंकांनी वधारला : निफ्टीतही ५० अंकांची वाढ

**मुंबई**

आठवड्याच्या शेवटच्या ट्रेडिंग दिवशी, सेन्सेक्स २०० पेक्षा जास्त अंकांच्या वाढीसह ७६,३६० वर उघडला. निफ्टी देखील ५० अंकांनी वाढला आहे, तो २३,०८० च्या पातळीवर व्यवहार करत आहे.

सेन्सेक्सच्या ३० पैकी २६ शेअर्समध्ये वाढ झाली आहे तर ४ मध्ये घसरण झाली आहे. निफ्टीच्या ५० पैकी ४३ शेअर्समध्ये वाढ झाली आहे तर ७ मध्ये घसरण झाली आहे. एनएसई क्षेत्रीय निर्देशांकाच्या आयटी क्षेत्रात सर्वाधिक ०.५६% वाढ झाली आहे.

**आशियाई बाजारही वधारले**

आशियाई बाजारात, कोरियाचा कोस्पी ०.५०% वर आहे. हाँगकाँगचा हँग सेंग २.३९% आणि चीनचा शांघाय कंपोझिट इंडेक्स ०.२५% वर आहे.

क्वालिटी पॉवर इलेक्ट्रिकल इक्विपमेंट्स लिमिटेडचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर म्हणजेच आयपीओ आज उघडेल. गुंतवणूकदार १८ फेब्रुवारीपर्यंत या इश्यूसाठी बोली लावू शकतील. कंपनीचे शेअर्स २१ फेब्रुवारी रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज वर सूचीबद्ध होतील.त्याआधी, काल म्हणजेच १३ फेब्रुवारी रोजी सेन्सेक्स ३२ अंकांच्या घसरणीसह ७६,१३८ वर बंद झाला होता. निफ्टीमध्येही १३ अंकांची घसरण झाली आणि तो २३,०३१ वर बंद झाला. सेन्सेक्सच्या ३० पैकी १५ शेअर्समध्ये घसरण झाली आणि १५ वर गेले. निफ्टीच्या ५० पैकी २७ शेअर्समध्ये घसरण झाली तर २३ शेअर्समध्ये वाढ झाली. एनएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, आयटी क्षेत्र सर्वात जास्त १.००% ने घसरले.

**मालामाल केलेला स्टॉक आता रडवतोय**

यापैकी एक स्टॉक वारी रिन्यूएबल टेक्नॉलॉजीजचा आहे, ज्याने एकेकाळी गुंतवणूकदारांवर पैशाची बरसात केली आणि एका वर्षात १४००% पेक्षा जास्त परतावा देऊन अनेकांना मालामाल केलं. पण, आता काही काळापासून शेअर्समध्ये विक्रीचा दबाव दिसत असून गुरुवारीही शेअर्सनी तळ गाठला. आदल्या दिवशी या मल्टीबॅगर कंपनीचे शेअर्स ०.१८% घसरून ८७६.५५ रुपयांवर स्थिरावले.

**वर्षभरात गुंतवणूकदारांना केलं श्रीमंत**

या स्टॉकने एका वर्षात गुंतवणूकदारांना १४०० टक्क्यांहून अधिक परतावा दिला असून मे २०२३ च्या सुरुवातीला शेअर्सची किंमत सुमारे २०० रुपये होती जी मे २०२४ मध्ये ३०३७ रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर उसळली. अशाप्रकारे एका वर्षात गुंतवणूकदारांना १४१८% परतावा मिळाला. या काळात लोकांना एक लाखांच्या गुंतवणुकीवर १५ लाखांपेक्षा जास्त फायदा झाला.



# मॅक्सिव्हिजन ग्रुपची ओजस हॉस्पिटलसोबत भागीदारी

**नाशिक : प्रतिनिधी**

डोळ्यांची देखभाल करणाऱ्या नेटवर्कच्या भारतातील प्रमुख शृंखलांपैकी एक असलेल्या मॅक्सिव्हिजन ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, मुंबईतील जगप्रसिद्ध आणि प्रतिष्ठित नेत्रसेवा प्रदाता असलेल्या ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल सोबत धोरणात्मक भागीदारीद्वारे महाराष्ट्रात प्रवेश करण्याची घोषणा केली.

या भागीदारीचा औपचारिक शुभारंभ डॉ. जीएसके वेलू, प्रवर्तक आणि अध्यक्ष, मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स आणि डॉ. नितिन देधिया, प्रवर्तक आणि अध्यक्ष, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, डॉ. रोहन देधिया, प्रवर्तक आणि संचालक ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया, सीईओ, ओजस ग्रुप ऑफ आय हॉस्पिटल्स, सीए प्रणव देधिया यांच्या उपस्थितीत करण्यात आला. मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्स एकत्रितपणे, नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त उपक्रम - ओजस मॅक्सीव्हिजन आय हॉस्पिटल्सचे संपूर्ण महाराष्ट्रात कारभार वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट आहे.

डॉ. नितिन देधिया यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, आय हॉस्पिटल्स चा ओजस ग्रुप सध्या मुंबई-वांद्रे (प.) आणि कांदिवली (ई) येथे तीन प्रमुख केंद्रे चालवत आहे-तज्ज्ञ नेत्र शल्यचिकित्सक आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे रूग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाची असाधारण नेत्रसेवा प्रदान करते. मागील ४० वर्षात ५,००,००० हून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार केल्याने, डॉ. देधिया आणि त्यांची टीम वैयक्तिक रूग्ण सेवेवर लक्ष केंद्रित करून डोळ्यांच्या काळजीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानात आघाडीवर आहे. त्यांनी कॉर्निया, काचबिंदू, डोळयातील पडदा, मोतीबिंदू आणि अपवर्तक डोळ्यांच्या शस्त्रक्रियांमध्ये प्रगत डोळ्यांच्या उपचारांची सुरुवात केली आहे. दृष्टी सुधारण्यासाठी फ्लॅपलेस ELITA SILK प्रक्रिया, ३ डी इमेजिंग आणि रोबोटिक मोतीबिंदू प्रक्रिया, खूप उच्च डोळ्यांची शक्ती सुधारण्यासाठी फॅकिक लेन्स उपचार आणि आगाऊ कोरड्या डोळ्यांचे उपचार यांसारख्या प्रगत नेत्र उपचारांचा परिचय करून देणारे ओजस हे पश्चिम भारतातील पहिले आय हॉस्पिटल आहे. रूग्णांना सर्वोत्कृष्ट दृश्य परिणाम देण्यासाठी रुग्णालय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास समर्पित आहे.

मॅक्सिव्हिजन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल्सचे प्रवर्तक आणि अध्यक्ष डॉ. जीएसके वेलू यांनी या विलीनीकरणाबद्दल उत्साह व्यक्त करताना सांगितले की, ओजस आय हॉस्पिटल्स सोबतची आमची भागीदारी महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट डोळ्यांची निगा राखणार्या उपचारांसाठी सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे. पुढील काही वर्षांमध्ये रु.५०० कोटींच्या गुंतवणुकीसह संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार करण्याच्या मॅक्सिव्हिजनच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.

# जानेवारीत घाऊक महागाई दर २.३१ टक्क्यांपर्यंत घसरला

**नवी दिल्ली :**

वाढती महागाई पाहता सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली. किरकोळ महागाईनंतर घाऊक महागाईच्या आकडेवारीतही मोठी घसरण झाली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, जानेवारी महिन्यात देशातील किरकोळ महागाई दरात ०.९१ टक्क्यांची घट झाली आहे. विशेष म्हणजे देशातील महागाई ऑगस्ट २०२४ नंतरच्या सर्वांत कमी पातळीवर आहे. तज्ज्ञांच्या मते, येत्या काळात महागाई आणखी कमी होऊ शकते.

नवीन वर्ष २०२५ हे महागाईबाबत चांगली बातमी घेऊन आले आहे. जानेवारी महिन्यात किरकोळ महागाईत ०.९१ टक्क्यांची घट झाली आहे. विशेष म्हणजे ऑगस्ट २०२४ नंतर देशातील किरकोळ महागाई सर्वात कमी आहे. दरम्यान जानेवारी २०२५ मध्ये महागाई दर ४.५० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. तर रॉयटर्सच्या सर्वेक्षणात महागाई ४.६ टक्के असल्याचा अंदाज होता. यामध्ये अन्नधान्य महागाई ६ टक्क्यांच्या जवळ पोहोचली आहे. त्यामुळे एकूण महागाईत घट झाली आहे. सरकारने किरकोळ महागाईचे आकडे कसे जाहीर केले आहेत ते जाणून घेऊया

अन्नधान्याच्या वाढत्या किमती कमी झाल्यामुळे डिसेंबरमध्ये भारतातील किरकोळ महागाई दर ५.२२ टक्क्यांवरून जानेवारीमध्ये ४.३१ टक्क्यांवर आला. रॉयटर्सच्या एका सर्वेक्षणात जानेवारीमध्ये भारतातील महागाई ४.६ टक्क्यांपर्यंत घसरेल असा अंदाज होता. महागाईतील घट ही भारतीय कुटुंबांसाठी दिलासादायक बातमी आहे, जे त्यांच्या बजेटचा मोठा भाग अन्न आणि पेयांवर खर्च करतात.

**स्वस्त होणार कर्ज?**

गेल्या आठवड्याच्या शेवटी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात करून तो ६.२५ टक्के केला होता, त्यामुळे महागाईत झालेल्या तीव्र घसरणीचे स्वागत रिझर्व्ह बँकेकडूनही केले जाईल. डिसेंबरमध्ये ग्रामीण भागातील महागाई ५.७६ टक्क्यांवरून ६.३१ टक्क्यांवर होती. तर शहरी भागातील महागाई ५.५३ टक्क्यांवर आली, जी मागील महिन्यात ४.५८ टक्क्यांवरून ५.५३ टक्क्यांवर पोहोचली.

**अन्नधान्य महागाईत घट**

दुसरीकडे अन्नधान्य महागाई, जी एकूण ग्राहक किंमत निर्देशांक बास्केटच्या जवळपास निम्मी आहे. डिसेंबरमध्ये ८.३९ टक्क्यांवरून जानेवारीमध्ये ६.०२ टक्क्यांवर घसरली, जी ऑगस्ट २०२४ नंतरची सर्वात कमी आहे. स्थानिक बाजारपेठेत येणाऱ्या हिवाळ्यातील उत्पादनांमुळे अन्नधान्याच्या किमतीत वाढ कमी झाली आहे. जे सीपीआय बास्केटच्या जवळपास निम्मे आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, अन्नपदार्थांमध्ये, भाज्यांच्या किमतीत झालेली घसरण कदाचित सर्वांत जास्त कारणीभूत ठरली आहे.

**महागाईवर आरबीआय**

आरबीआय एमपीसीने गेल्या आठवड्यात म्हटले होते की, अन्नपदार्थांवरील अनुकूल परिस्थितीमुळे महागाई कमी झाली आहे आणि आर्थिक वर्ष २६ मध्ये ती कमी होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे भारतीय कुटुंबांना आणखी दिलासा मिळेल. आरबीआयचे ध्येय महागाई २-६ टक्के लक्ष्य मर्यादेत ठेवणे आहे. आर्थिक वर्ष २६ च्या चार तिमाहींसाठी, आरबीआय एमपीसीने पहिल्या तिमाहीत महागाई ४.५ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. दुसऱ्या तिमाहीत ४ टक्के; तिसऱ्या तिमाहीत तो ३.८ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ४.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

# 'वीर हनुमान' मालिकेतील पोशाखांवर अजिंठा, वेरूळच्या लेण्यांसारखी डिझाइन

**नवी दिल्ली :**

सोनी सबवरील 'वीर हनुमान' ही आगामी पौराणिक मालिका प्रेक्षकांच्या मनात भक्तिरस निर्माण करण्यासाठी येत आहे! या मालिकेत महाबली हनुमानाचे जीवन चरित्र उलगडून दाखवणार आहेत. ज्यात त्याच्या बाल्यावस्थेपासून स्वतःमधील दिव्य शक्ती ओळखण्यापर्यंतचा त्याचा प्रवास असेल. या मालिकेत केसरीच्या भूमिकेत आरव चौधरी, अंजनीच्या रूपात सायली साळुंखे वाली आणि सुग्रीव यांच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी आणि बाल हनुमानाच्या भूमिकेत आन तिवारी हा बाल कलाकार दिसणार आहे.

या मालिकेतील एक उठून दिसणारा विशेष म्हणजे बारीक कलाकुसर केलेले पोशाख. या पोषाखांसाठी अजिंठा आणि वेरूळच्या (इलोरा) लेण्यांमधून प्रेरणा घेण्यात आली आहे. ज्यामधून या लेण्यांमधील भित्तिचित्रे



(म्यूरल्स) आणि शिल्पकलेचे कलात्मक सौंदर्य दिसते. हे कालातीत सौंदर्य पोषाखांमध्ये आणल्यामुळे 'वीर हनुमान' ही मालिका नेत्रसुखद तर होतेच, पण ती खऱ्याखुऱ्या नेत्रदीपक पद्धतीने समृद्ध भारतीय संस्कृतीचा वारसा जपते. मालिकेतील व्हिज्युअल आकर्षणाविषयी बोलताना कॉस्च्युम डिझाईनर शिवप्रिया सेन म्हणते, अजिंठा आणि वेरूळच्या अद्भुत लेण्यांमधून प्रेरणा घेऊन बनवलेला प्रत्येक पोशाख म्हणजे प्राचीन काळाच्या भव्यतेचे प्रतिबिंब आहे. आमचे ध्येय होते की असा पोशाख बनवायचा, जो केवळ दिसायला अप्रतिम नसेल, तर ऐतिहासिक अस्सलता देखील त्यात असेल. केसरीच्या मुकुटात भारतातील प्राचीन पर्वत आणि प्रदेश यांचे प्रतिबिंब दिसते. आम्हाला आशा आहे की, प्रत्येक लुकचा प्रेक्षकांवर वेगळा, दीर्घ प्रभाव पडेल. 'वीर हनुमान' मालिकेत अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, अंजनीची भूमिका साकारणे हा खूप समृद्ध करणारा अनुभव असणार आहे. अजिंठा आणि वेरूळच्या लेण्यांमधील कलात्मक भव्यतेची प्रेरणा मालिकेतील पत्रांच्या पोशाखांत आहे. त्यामधून त्या काळातील समृद्ध संस्कृती दिसते.

# ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशनने आदिवासी शाळांना दिले संगणक

**नाशिक : प्रतिनिधी**

ग्रामीण शिक्षणातील डिजिटल दरी कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन लिमिटेड यांनी रोटरी क्लब ऑफ नाशिक मिडटाऊन यांच्या सहकार्याने संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व(सीएसआर) उपक्रमांतर्गत १० आदिवासी शाळांना ३० हून अधिक संगणक दान केले.या संगणक वितरण समारंभाचे आयोजन बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता ईएसडीएस डेटा सेंटर, नाशिक येथे करण्यात आले होते. या वेळी विविध मान्यवर आणि शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन लिमिटेडचे मुख्य संचालन अधिकारी श्री. जितेंद्र पाठक, रोटरी क्लब ऑफ नाशिक मिडटाऊनचे अध्यक्ष अजय जाधव आणि इनर विल क्लबच्या अध्यक्षा माधुरी महाजन यांच्या हस्ते लाभार्थी शाळांना संगणक सुपूर्द करण्यात आले.



**डिजिटल साक्षरतेद्वारे शिक्षणाला नवा आयाम**

आजच्या तंत्रज्ञानयुगात डिजिटल साक्षरता अत्यंत गरजेची झाली आहे. मात्र, अनेक आदिवासी आणि ग्रामीण शाळांमध्ये संगणक शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. ही गरज ओळखून ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन लिमिटेड यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला.

**लाभार्थी शाळा आणि संगणक वाटप**

| शाळेचे नाव | शिफारस करणारे सदस्य | संगणक संख्या |
| --- | --- | --- |
| उन्नती प्राथमिक शाळा | देवनाथ पाटील | ३ |
| जि. प. शाळा घोटी | शिरीष भालेराव | ३ |
| सर्वहारा परिवर्तन केंद्र | आभास थोरात | ३ |
| सरस्वती गुलाबराव पाटील | डॉ. किरण बेरारी | ३ |
| स्वामी विवेकानंद सोसा. | जे. जे. पवार | ३ |
| सेकंडरी विद्यामंदिर एकलहरे | अजय जाधव | ३ |
| जि.प.शाळा क्र. १, दिंडोरी | गिरीश वाबळे | ३ |
| डांग सेवा मंडळ | दीपक ढोलकिया | ३ |
| जनता विद्यालय, नानाशी | प्रतिभा चौधरी | ३ |
| म्युनिसिपल शाळा क्र. ४६ | चेतन भगत | ३ |

ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन लिमिटेड हे शिक्षण, पर्यावरण शाश्वतता आणि सामाजिक कल्याण यांसाठी सातत्याने योगदान देत आहे. या उपक्रमाद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी मिळणार असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि कारकिर्दीसाठी नवे मार्ग खुले होणार आहेत.

या सहकार्याच्या माध्यमातून ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन लिमिटेड आणि रोटरी क्लब ऑफ नाशिक मिडटाऊन हे वंचित समुदायांसाठी डिजिटल समावेशन आणि शैक्षणिक सशक्तीकरणाचा मार्ग मोकळा करत आहेत.

# आर्बिट्राज फंड्स : बाजारातील तफावतींना संधीमध्ये कसे करतात रूपांतरित



**कार्तिक कुमार**
**फंड मॅनेजर,**
**अॅक्सिस म्युच्युअल फंड**

सतत बदलणाऱ्या गुंतवणूक क्षेत्रात, बाजारातील किमतींमध्ये तफावत निर्माण झाल्यावर संधी अनेकदा अनपेक्षितपणे समोर येतात. अशा तात्पुरत्या किंमत फरकांचा लाभ घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रणनीतीला आर्बिट्राज म्हणतात. आर्बिट्राज फंड हे म्युच्युअल फंडांचे एक विशेष प्रकार आहेत, जे बाजारातील या संधींचा फायदा घेत परतावा मिळवण्याचा प्रयत्न करतात. पण गुंतवणूकदारांसाठी याचा नेमका अर्थ काय आहे? आणि भारतातील सध्याच्या बाजारपेठेत हे फंड का अधिक लोकप्रिय होत आहेत? चला, आर्बिट्राज फंडांची संकल्पना, त्यांचा कार्यप्रणाली आणि संभाव्य लाभ यांचा सखोल अभ्यास करूया.

**आर्बिट्राज फंडांची संकल्पना समजून घेऊ**

समजा, कंपनीचे इक्विटी शेअर्स कॅश मार्केटमध्ये आयएनआर १०० ला व्यवहार करत आहेत, तर फ्युचर्स मार्केटमध्ये आयएनआर १०२ ला (प्राइस प्रीमियममुळे) उपलब्ध आहेत. फंड मॅनेजर कॅश मार्केटमधून आयएनआर १०० ला शेअर्स खरेदी करतो आणि त्याच वेळी फ्युचर्स मार्केटमध्ये १०२ ला विकण्याची योजना आखतो. महिन्याच्या शेवटी, फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट संपल्यावर, कॅश आणि फ्युचर्स मार्केटमधील किंमती एकसारख्या होतात. त्यावेळी फंड मॅनेजर व्यवहार उलट करतो आणि आयएनआर२ चा नफा कमावतो. हीच प्रक्रिया आर्बिट्राज फंडांना जोखीम कमी ठेवून स्थिर परतावा मिळवण्यास मदत करते.

मूळत: आर्बिट्राज फंड हे म्युच्युअल फंड असतात, जे स्टॉक आणि डेरिव्हेटिव्ह्ज मार्केटमध्ये हीच रणनीती वापरतात. सोप्या भाषेत सांगायचे तर, हे फंड एका मालमत्तेच्या (शेअरच्या) स्पॉट प्राईस आणि त्याच्या फ्युचर्स मार्केटमधील किंमतमधील तफावतीचा फायदा घेतात. हे फंड विशेष अल्गोरिदम आणि कुशल फंड मॅनेजर वापरून स्पॉट आणि फ्युचर्स मार्केटमधील किंमतींतील फरक सतत निरीक्षण करतात. मात्र, ही संधी मिळवणे सोपे नसते, कारण या प्रकारच्या किंमत तफावती काही सेकंदांत नाहीशा होऊ शकतात. यामधील नफा हा स्पॉट आणि फ्युचर्स मार्केटमधील किंचित किंमत फरकावर अवलंबून असतो, आणि तो लवकरच कमी होतो, कारण अधिकाधिक गुंतवणूकदार अशा संधी ओळखतात आणि त्याचा फायदा घेतात.

भारतीयांसाठी आर्बिट्राज फंड का आकर्षक आहेत?

अलीकडेच डएइख ने फ्युचर्स आणि ऑप्शन्स विभाग सुधारण्यासाठी काही उपाययोजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये २९ नोव्हेंबर २०२४ पासून ४५ नवीन सिक्युरिटीजवर ऋज करार सुरू करणे आणि २० नोव्हेंबर २०२४ पासून निर्देशांक डेरिव्हेटिव्ह्जचा करार आकार १५ लाखांपर्यंत वाढवणे यांचा समावेश आहे. या बदलांचा उद्देश भारतीय डेरिव्हेटिव्ह्ज मार्केटचे विस्तार आणि विविधीकरण करणे, कार्यक्षमतेत वाढ करणे आणि किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग प्रोत्साहित करणे हा आहे. यामुळे आर्बिट्राज फंडांसाठी नवीन संधी निर्माण होतील, कारण या नव्या फ्युचर्स करारांमुळे विविध क्षेत्रे, कंपन्या आणि मार्केट कॅप्समध्ये रणनीती विविधीकृत करता येतील. परिणामी, आर्बिट्राज संधी अधिक गतिशील होतील आणि फंड मॅनेजर्ससाठी अधिक लवचिकता निर्माण होईल.

**गुंतवणुकीचे मुख्य फायदे**

तुलनेने कमी जोखीम : आर्बिट्राज फंडांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते बाजाराच्या दिशेवर कोणताही अंदाज बांधत नाहीत. हे फंड बाजारातील किंमत तफावत ओळखून ती पुढील एक्स्पायरीपर्यंत निश्चित करण्याच्या रणनीतीवर काम करतात. त्यामुळे जोखीम तुलनेने कमी असते.

निष्कर्ष

आर्बिट्राज फंड ही एक प्रगत गुंतवणूक रणनीती आहे, जी तात्पुरत्या बाजारातील चढ-उतारांना संधीमध्ये परिवर्तित करते. सध्याच्या भारतीय बाजारातील अस्थिरता, तरलता आणि नियामक स्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, आर्बिट्राज फंड भांडवल संरक्षण आणि स्थिर वाढ प्राधान्य देणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी एक व्यवहार्य पर्याय ठरू शकतात. नेहमीप्रमाणे, गुंतवणूक करण्यापूर्वी जोखीम क्षमता आणि गुंतवणूक उद्दिष्टे तपासणे आवश्यक आहे. मात्र, बाजारातील अस्थिरतेपासून बचाव आणि स्थिर परताव्याचा पर्याय शोधत असलेल्या गुंतवणूकदारांसाठी आर्बिट्राज फंड नक्कीच विचार करण्यासारखे आहेत.

# गांवकरी लाईफ स्टाईल

नाशिक, शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५


# हट्टीपणा घातक


गणेश खाडे
९०११६३४३०१





जिद्द आणि हट्ट या परस्परविरोधी परिणाम देणाऱ्या बाबी आहेत. जिद्द जीवन घडवते तर हट्ट जीवन बिघडतो आणि सध्या विद्यमान परिस्थितीमध्ये मुलांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात हट्टीपणा वाढीस लागला आहे. ही भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे. कुटुंब संस्था ही संस्कारांची पाठशाळा होती, पण आज कुटुंब हीच संस्था मोडकळीस आली आणि कुटुंब ही संकल्पना सीमित झाल्याने त्याचे अनेक दुष्परिणाम सुद्धा आपल्याला दिसत आहेत. पण सद्यपरिस्थितीमध्ये आपण जे कुटुंब समजतो त्या कुटुंबांच्या पातळीवर जरी मुलांच्या सोबत मजबूत संवाद ठेवला तर नक्कीच चांगले परिणाम दिसतील. यामध्ये शंका नाही.

सिनेमांच्या माध्यमातून नकारात्मक अहितकारक बाबींचा कोमल बाल मनावर होणारा प्रभाव इतका वाढत चाललेला आहे की, परिणाम स्वरूप बालवयात प्रचंड गुन्हेगारी वाढत आहे. सोशल नेटवर्कर वेगवेगळ्या प्रकारच्या विघातक बाबींचा उच्छाद मांडलाय त्याचे परिणाम खूप मोठ्या प्रमाणात लहान मुलांच्या मनावर होऊन होत आहे. चांगले विचार कमी आणि वयात जास्तीत जास्त वाईट विचार मनावर कोरले जाण्यासाठी पूरक वातावरण आपोआप तयार होत असल्याने समाजिक पातळीवर असो अथवा कौटुंबिक पातळीवर याचे विघातक परिणाम समोर येत आहेत. लहान लहान मुलं युवा अवस्थेतील तरूण हे दिवसेंदिवस हट्टी होत आहेत. याची कारण देखील आपल्या आजूबाजूलाच आहेत. आपण या मूळ कारणांना प्रचंड खतपाणी घालतोय.हे खतपाणी घालणं बंद करणं हितकारक ठरेल. मुलांचा जास्तीत जास्त वेळ हा पालकांच्या सोबत संवाद, वेगवेगळ्या धार्मिक कथा, रामायण, भगवत गीता तसंच मैदानी खेळ वेगवेगळ्या महापुरुषांची प्रेरणादायी पुस्तक सहजपणे हसत-खेळत वाचण्यासाठी कलात्मक पद्धतीने पालकांनी नियोजन करणं गरजेचं आहे.

पालकांनी मुलांना विश्वासात घेणं वेगळ्या पद्धतीने त्यांच्यावर आपला प्रभाव निर्माण करत संवाद वाढवत मुलं आपल्या आज्ञेबाहेर जाणार नाहीत याची काळजी दक्षता घेतली तर नक्कीच यामध्ये चांगल्या पद्धतीने यश मिळेल. लहान वयात मुलं कोमल असतात आणि बहुतांश बुद्धीचा विकास हा युवक अवस्थेत होत असतो. ज्या वेळेत चांगल्या बाबी घडतात त्याच वेळी वाईट बाबी पण घडत असतात आणि याच वाईट बाबीविषयी आपण सचेत जागरूक असलं पाहिजे. आपली जागरूकता हाच आपला बचाव आहे. जीवन जितकं सरळ सोपं आहे, तितकंच कठीण आहे. दिवसेंदिवस जसा जसा तंत्रज्ञान विकास होत आहे. तसं तसं सामाजिक पातळीवर मात्र वेगवेगळ्या समस्या डोकं वर काढत चिंतेत भर घालत आहेत. मुलांचं हित व्हावं अथवा आयुष्य घडाव ही सर्वसाधारणपणे प्रत्येक पालकाची इच्छा असते. पण सध्या मुलकाचा आळशीपणा वाढला आहे. चैनयुक्त जीवन आणि चंगळवाद फोफावत चालला असल्याने मुलं पण या विळख्यात अडकत चालली आहेत. मग वेगळ्या चैनेच्या वस्तू अनेक भौतिक सुविधा, मोबाइल, टीव्ही, अजून काही काही या सगळ्यामध्ये कसरत व्यायाम नको आहे, अभ्यास नियोजनबद्ध जीवनशैली नको आहे. धार्मिक आचरण अथवा सुसंस्कृत जीवनाची मार्गदर्शक तत्त्वे फार कोणीही आचरणात आणायला तयार नाही. मग वेगवेगळ्या सिनेमातील खुखंर क्षण चित्र पाहून उत्कृष्ट असे गुण कसे काय प्रगट होतील.

मुळात आपण आपल्या मेंदूत काय टाकतो हे खूप महत्त्वाचं आहे. चांगल्या बाबी आपल्या आयुष्यात असल्या पाहिजेत पण आपण चांगल्या बाबीला नाही तर वाईट बाबींना थारा देतो आणि आयुष्याचा बोऱ्या वाजवून घेतो. सध्याच्या तरुण पिढीमध्ये अहंकार राग जास्त नक्कीच आहे याबद्दल दुमत नाही. पण लहानपणापासून हट्टीपणा हा बळावत चाललाय आणि तो पुढे जाऊन विदारक रूप धारण करतोय. याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम पालक आई-वडील यांनाच भोगावे लागतात. मग हा हट्टीपणा एकाएकी वाढत नाही. हळूहळू हा वाढत असताना आपण वेळीच लक्ष दिलं पाहिजे. आणि संवाद वाढवला पाहिजे. जिद्द वेगळी, जिद्दीपणा वेगळा आणि हट्टीपणा वेगळा असतो. जिद्द जिद्दीपणा आयुष्य घडवते. हट्टीपणा आयुष्य उद्ध्वस्त करतो. आयुष्य उद्ध्वस्त करणारा हट्टीपणा सध्या मुलांच्या मध्ये दिवसेंदिवस वाढीस लागला आहे. ही पालकांच्या साठी चिंतेची बाब असली तरी चिंता करण हा अंतिम उपाय नाही तर त्यावर योग्य असा उपाय काढता आला पाहिजे.

# मन करा रे प्रसन्न..




गिरीश उदास
९४२२७६३४१२


## मतभेद – मनभेद

मतभेद म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयावर किंवा चर्चेवर भिन्न विचार किंवा मत असणे. मनभेद म्हणजे हृदयातील भावनांमधील मतभिन्नतेमुळे आलेले अंतर.

*भवेद्वा नो मतोभेदो मनोभेदः परं भवेत् ।*
*यतो यत्र मनोभेदः सम्बन्धास्तत्रनोत्तमाः।*

मतभिन्नता असावी पण मनभेद नसावेत. कारण जिथे मनभेद असतात तिथे चांगले संबंध नसतात. समर्थन आणि विरोध फक्त विचारांचे असावे कुठल्या व्यक्तीचे नाही कारण चांगल्या माणसाच्या मनातही चुकीचे विचार असू शकतात आणि वाईट माणसाकडे सुद्धा योग्य कल्पना असू शकतात. म्हणूनच मतभेद हे कधीच मनभेद होऊ नयेत.

*सबहु का लिजीए साचा शब्द निहार*
*पक्षपात मत किजीये कहे कबीर विचार*

कनिष्ठ - श्रेष्ठ असा भेदभाव न ठेवता आपल्यापुढे विचार मांडणाऱ्याचे मत पारखून घ्यावे.

निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई यांना संन्यास्याची मुलं म्हणून किती त्रास भोगावा लागला ते सर्वश्रुत आहे. तरीही जन्मताच ब्रम्हरूप असलेल्या ह्या भावंडांनी समाजाच्या उद्धाराचा व आळंदी, पैठणच्या विद्वानांचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न सोडला नाहीं. आपल्या मुंजीकरिता शुद्धीपत्र मिळविण्यासाठी पैठणच्या विद्वानांकडून होणाऱ्या तीव्र विरोधाला निवृत्तीनाथ कंटाळले व ज्ञानदेवांना म्हणाले की आपल्याला ईश्वर, धर्म, नाम आदींची अनुभूती झाली आहे त्यामुळे आपण हा प्रयत्न थांबवावा. तेंव्हा ज्ञानदेव निवृत्तीनाथांना म्हणतात :

*प्रत्यवाय आहे अशास्त्री चालता ।*
*पावन अवस्था जरी जाली ।।*
*ज्ञानदेव म्हणजे ऐकाजी निवृत्ती ।*
*बोलिली पध्दती धर्मशास्त्री ।।*

आपल्याला पावन अवस्था प्राप्त झाली हे खरे आहे परंतु आपल्याला शस्त्रानुसारच चालावे लागेल अन्यथा प्रत्यवाय असा दोष आपल्याला लागेल. हे स्पष्टीकरण निवृत्तिनाथ स्वीकारतात. निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे गुरू आहेत तरीही ते ज्ञानदेवांचे स्पष्टीकरण मान्य करतात. हे मतभेद असूनही मनभेद नसल्याचे उत्तम उदाहरण आहे.

बोध : चर्चेद्वारे होणाऱ्या संवादतील सत्यांशाला जाणणे हे मतभेद होऊनही मनभेद न होऊ देण्याचे साधान आहे.

*तुका म्हणे मज कळते चांचणी ।*
*बडबडीची वाणी अथवा सत्य ।।*

वायफळ बडबड व सत्य याची परीक्षा करता आल्यास मतभेद असूनही मनभेद टाळता येतील.

# यूट्यूब चॅनल सुरू करा अन् पैसे कमवा


प्रा. योगेश हांडगे
सहाय्यक प्राध्यापक संगणक विभाग, पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पुटर टेक्नॉलॉजी




आजकाल सर्वांकडेच उत्तम क्वालिटीचा मोबाइलवरू आहे. त्यावरून आजची तरुणाई विविध व्हिडिओ शूट करत असतात. शूट केलेले व्हिडिओ फेसबुकवर अपलोड करत असतात. कुठलाही व्हिडिओ शूट करण्याचा छंदच तरुणाईला जडलाय. तरुणाई केवळ फेमस होण्याकरिता फसबुकवर व्हिडीओ उपलोड करीत असते, परंतु फेमस होण्याबरोबरच पैसे मिळवायचे असतील तर त्यांनी यूट्यूब चॅनलचा विचार केला पाहिजे आणि स्वतःचे यूट्यूब चॅनल सुरू करायला हवे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून पैसा कमावण्याचा नवीन मार्ग यूट्यूब चॅनलमुळे निर्माण झाला आहे.

**यूट्यूब चॅनलबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊया :**

**यूट्यूब चॅनलचा कसा सुरू करावा?**

यूट्यूब चॅनल सुरू करण्याकरिता फक्त एक गूगल अकाउंट क्रिएट करावे लागते . या एका अकाउंटवरून ब्लॉग तसेच जीमेलही ॲक्सेस करता येतात .

गूगल अकाउंट क्रिएट केल्यानंतर व्हिडिओ अपलोड करण्यासाठी यू ट्यूब चॅनल क्रिएट करावे. यूट्यूबच्या माय चॅनल फीचरच्या माध्यमातून स्वतःचा चॅनल क्रिएट करता येतो. तिथे व्हिडिओ, स्लाईड शोच्या स्वरुपात व्हिडिओ अपलोड करता येतो. तसेच तिथे व्हिडिओ अपलोज, व्ह्यूज इत्यादी गोष्टी संग्रहित करता येतात. तयार केलेल्या यूट्यूब चॅनलला जास्त आकर्षक करून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्याकरिता तसेच चॅनल सुरक्षित ठेवण्यासाठी विविध सेटिंग्जमध्ये उपलब्ध आहेत. व्हिडिओ अपलोड करण्यासाठी व्हिडिओ मॅनेजरची मदत घेता येते. तसेच व्हिडिओ रे एडिट करण्याच्या सुविधा देखील तिथे दिलेल्या आहेत.

**यूट्यूब चॅनलवर अपलोड करण्याकरिता व्हिडिओ कसा असावा?**

यूट्यूब चॅनलवर अपलोड करण्याकरीता व्हिडिओ हटके विषयाचे असायला हवेत. जे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतील काहीतरी वेगळे व्हिडिओत असेल तरच युजर्स तुमचा व्हिडिओ पूर्ण पाहण्यासाठी वेळ देतील. स्वतःच्या यूट्यूब चॅनलवर स्वतःच्या हक्काचेच/मालकीचे व्हिडिओ अपलोड करावे इतरांच्या कॉपीराइटचे व्हिडिओ अपलोड करू नये.

महत्त्वाची सूचना : ऑडिओ हा तुम्ही तयार केलेला हवा. शिवाय कॉपीराइटचा भंग होता कामा नये ही काळजी घेतली तर तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता.

**यूट्यूब चॅनलवरील व्हिडिओद्वारे पैसे मिळवा :**

यूट्यूब चॅनलवरील व्हिडिओद्वारे पैसे मिळवण्यासाठी गूगल ॲडसेन्स अकाउंट तयार करावे. हे ॲडसेन्स गूगलच्या जाहिरातीच्या माहितीचे ऑफिशिअल टूल आहे. इथे तुम्हाला तुम्ही अपलोड केलेल्या तुमच्या व्हिडिओसंदर्भात कुणी आणि किती जणांनी व्हिडिओ पाहिला. त्यांच्या कमेंट्स किती वगैरे सर्व माहिती मिळते. तसेच एखाद्या व्हिडिओच्या जाहिरातीतून किती पैसे मिळतील याचीही माहिती तुम्हाला मिळते.

ॲडसेन्स अकाउंट तयार केल्यानंतर यूट्यूबच्या सेटिंग्जमध्ये असलेले यूट्यूबचे मोनेटायझेशन फीचर सुरू करावे. मोनेटायझेशन सुरू केल्यानंतर यूट्यूबकडून तुमच्या माहितीची सविस्तरपणे शहानिशा केली जाते आणि तुम्हाला व्हिडिओच्या माध्यमातून पैसे कमावण्यासाठी परवानगी दिली जाते. तुम्हाला जाहिराती निवडण्याचा पर्याय उपलब्ध असतो. या मोनेटायझेशन फीचरमुळे तुमच्या व्हिडिओमध्ये जाहिराती दिसण्यास सुरुवात होऊन त्याचे पैसेही तुम्हाला मिळण्यास सुरुवात होते.

तुमच्या आवडीच्या विषयांची माहिती, खेळाची, रेसिपीची माहिती व्हिडिओच्या रुपात तुम्ही तुमच्या चॅनलवर अपलोड करू शकता. आणि आवडीच्या तसेच छंदाच्या माध्यमातून तुम्ही पैसे कमवू शकतात. फॅशन, धार्मिक, संगीत, न्यूज, बिझनेस, कला,कॉमेडी यांचे हटके व्हिडिओ बनवून अनेक लोक पैसे कमावत आहेत. तुमच्या यूट्यूब चॅनलवर व्हिडिओ अपलोड झाले आणि त्यावर जाहिराती सुरू झाल्या तर पैसे मिळायला सुरू होतात. १०० डॉलरची कमाई झाल्यावर पैसे तुमच्या अकाउंटवर जमा होतात.

**व्हिडिओच्या हिट्स वाढविण्याकरिता सोशल मीडियाचा वापर :**

यूट्यूबवर व्हिडिओ अपलोड केल्यानंतर फेसबुक, ट्विटर या शेअर सोशल मीडियावर व्हिडिओची लिंक शेअर केल्याने व्हिडिओच्या हिट्स वाढतात. जेवढ्या जास्त हिट्स, तेवढ्या मोठ्या प्रमाणात तुम्हाला पैसे कमवता येतो.

# वर्केशन लूक

## स्टाईलिश आणि आरामदायी फॅशन

गेल्या काही वर्षांत 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना प्रचंड लोकप्रिय झाली आहे. घरात बसूनच काम करताना लोकांनी अधिक आरामदायी आणि सहज कपड्यांची निवड करण्यास सुरुवात केली. मात्र, केवळ आरामदायी कपडे घालण्याऐवजी स्टायलिश आणि प्रोफेशनल टच असलेला लूक तयार करणंही तितकंच महत्त्वाचं आहे. 'वर्केशन लूक' म्हणजेच घरबसल्या सुटसुटीत आणि आकर्षक दिसण्याचा नवा ट्रेंड अनेकांना आवडू लागला आहे.

**वर्केशन लूक म्हणजे काय?**

वर्केशन हा 'वर्क' (काम) आणि 'व्हेकेशन' (सुट्टी) या दोन संकल्पनांचा संगम आहे. घरात किंवा एखाद्या निवांत ठिकाणी काम करताना स्वतःला आरामदायी ठेवणं गरजेचं आहे, पण त्याच वेळी स्वतःचं व्यक्तिमत्त्व खुलवणाऱ्या फॅशनची निवड करणंही महत्त्वाचं ठरतं. हे केवळ स्टाइलसाठीच नाही, तर मानसिक दृष्टिकोन सुधारण्यासाठीही आवश्यक आहे.

**वर्केशन लूक का महत्त्वाचा आहे?**

घरात असलो तरी योग्य फॅशनमुळे आत्मविश्वास वाढतो आणि काम करण्याचा मूडही चांगला राहतो. संशोधन असं सांगतं की, आपण जसे कपडे घालतो, त्याचा आपल्या विचारसरणीवर आणि कार्यक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे झोपायच्या कपड्यांत काम करण्यापेक्षा, एक व्यवस्थित आणि सुंदर वर्केशन लूक तयार करणं फायद्याचं ठरतं.



**वर्केशन लूकसाठी काही महत्त्वाच्या टिप्स**

१. हलके आणि मोकळे कपडे निवडा

उन्हाळ्यात त्वचेला श्वास घेता येईल असे कापडांचे प्रकार वापरणे योग्य ठरते. कॉटन, लिनेन, खादी, आणि जॉर्जेट यांसारख्या फॅब्रिक्समुळे दिवसभर फ्रेश वाटतं.

- हलक्या रंगाचे लूज-फिट शर्ट आणि पलाझो
- आरामदायी टी-शर्ट आणि जॉगर्स
- मॉडर्न कुर्ता आणि लेगिंग्स

**२. कंफर्ट आणि स्टाइल यांचा मेळ साधा**

- वर्केशन लूक निवडताना कंफर्टबरोबरच ट्रेंड लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.
- ओव्हरसाईज टी-शर्ट + हाय-वेस्ट ट्राऊझर्स आरामदायी आणि प्रोफेशनल लूक
- सिंपल कुर्ता + स्ट्रेट पँट्स स्लीक आणि एलिगंट स्टाईल
- जंपसूट किंवा को-ऑर्ड सेट सहज घालण्याजोगे आणि आकर्षक

**३. योग्य रंगसंगती ठेवा**

हलके आणि मऊ रंग उन्हाळ्यासाठी उत्तम पर्याय आहेत. पेस्टल शेड्स, ऑफ-व्हाइट, स्काय ब्लू, मिंट ग्रीन यांसारखे सौम्य रंग वातावरण प्रसन्न ठेवतात आणि उष्णतेपासून आराम मिळतो.

**४. मिनिमल ॲक्सेसरीज वापरा**

- वर्केशन लूकमध्ये ॲक्सेसरीज हलक्या आणि सोप्या असाव्यात.
- साधे हूप्स किंवा स्टड्स
- हलका स्कार्फ
- मिनिमलिस्टिक घड्याळ किंवा ब्रॅसलेट
- ब्लू लाइट कट असलेले स्टायलिश चष्मे

**५. योग्य फूटवेअर निवडा**

घरात असल्याने चप्पल किंवा स्लीपर चालतात, पण एखाद्या महत्त्वाच्या व्हिडिओ मीटिंगसाठी योग्य फूटवेअर वापरल्यास लूक अधिक नीटनेटका दिसतो.

# उन्हाळ्यात तरुणींमध्ये लोकप्रिय लिनन आणि कॉटन साडी


ज्योती हांडगे, पुणे




उन्हाळा म्हणजे प्रखर उन्ह, घाम आणि उष्णतेमुळे होणारा थकवा. अशा परिस्थितीत आपण घालणाऱ्या कपड्यांनी फक्त स्टायलिश दिसायला नको, तर ते आरामदायी आणि हवेशीर असायलाही हवे. यामुळेच भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक तरुणींमध्ये उन्हाळ्यासाठी लिनन आणि कॉटन साडीची लोकप्रियता वाढताना दिसते. साडी ही केवळ पारंपरिक पेहराव न राहता आता फॅशन ट्रेंडचाही एक भाग झाली आहे.

**लिनन आणि कॉटन साडी उन्हाळ्यासाठी का उत्तम पर्याय?**

**१. हलकी आणि आरामदायी**

लिनन आणि कॉटन हे दोन्ही नैसर्गिक तंतूंपासून बनवले जातात, जे उन्हाळ्यात घाम शोषून घेतात आणि शरीराला थंडावा देतात. हे दोन्ही प्रकाराच्या साड्या अत्यंत हलक्या असतात, त्यामुळे दिवसभर त्या नेसूनही त्रास होत नाही.

**२. हवा खेळती ठेवणारा पोत**

कॉटन आणि लिनन फॅब्रिकच्या रचनेमुळे त्यामध्ये हवा खेळती राहते, त्यामुळे घाम लगेच वाळतो आणि शरीरावर चिकटत नाही. परिणामी, उन्हाळ्यातील दमट हवामानातही या साड्या आरामदायी वाटतात.

**३. स्टाइल आणि पारंपरिकतेचा अनोखा संगम**

पूर्वी साडी केवळ पारंपरिक प्रसंगांसाठी घातली जायची, पण आता कॉलेज जाणाऱ्या तरुणींपासून ते ऑफिसमध्ये काम करणाऱ्या महिलांपर्यंत अनेक जणींनी साडीला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवले आहे. लिनन आणि कॉटन साडी दोन्ही सहज नेसता येतात, त्यामुळे त्या फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही प्रसंगांसाठी योग्य ठरतात.

**तरुणींमध्ये लोकप्रिय लिनन आणि कॉटन साडीचे प्रकार**

**१. साधी कॉटन साडी**

साध्या, प्लेन कॉटन साड्या उन्हाळ्यासाठी परफेक्ट असतात. विशेषतः हलक्या रंगांच्या कॉटन साड्या उन्हाच्या उष्णतेपासून संरक्षण करतात.

**२. ब्लॉक प्रिंट कॉटन साडी**

ब्लॉक प्रिंट असलेल्या साड्या खासकरून राजस्थान, गुजरात आणि पश्चिम बंगालमध्ये बनवल्या जातात. या साड्या हलक्या आणि स्टायलिश दिसतात. त्यामुळे त्या कॉलेज आणि ऑफिससाठी उत्तम पर्याय असतात.

**३. चेक्स आणि पट्टे असलेली लिनन साडी**

आजकाल चेक्स आणि स्ट्राइप्स असलेल्या लिनन साड्या तरुणींमध्ये खूप लोकप्रिय आहेत. त्या ट्रेंडी आणि मॉर्डन लूक देतात.

**४. हॅण्डब्लॉक किंवा बाटिक प्रिंट लिनन साडी**

भारतीय हस्तकलेला समर्पित अशा बाटिक किंवा हॅण्डब्लॉक प्रिंट लिनन साड्या उन्हाळ्यात सहज आणि सुंदर दिसतात.

**लिनन आणि कॉटन साडी**

**कशी नेसावी? स्टाइल टिप्स**

**१. योग्य ब्लाउजची निवड**

साडीला मॉर्डन टच देण्यासाठी स्लीव्हलेस, हॉल्टर-नेक किंवा शर्ट स्टाइल ब्लाउज घालता येईल. ऑफिससाठी फुल-स्लीव्ह कॉटन ब्लाउज उत्तम पर्याय आहे.

**२. योग्य दुपट्टा किंवा स्टोलसह प्रयोग**

काही तरुणी साडीला स्टोल किंवा लाइट दुपट्ट्यासह पेअर करतात, ज्यामुळे फॅशनमध्ये वेगळेपणा येतो.

**३. मिनिमल ॲक्सेसरीज आणि फूटवेअर**

लिनन किंवा कॉटन साडीसोबत ऑक्सिडाइज्ड झुमके किंवा हलकी चेन आणि कम्फर्टेबल सँडल्स हा उत्तम कॉम्बिनेशन ठरतो.

**उन्हाळ्यात लिनन आणि कॉटन साडीची काळजी कशी घ्यावी?**

१. हाताने किंवा सौम्य डिटर्जंटने धुणे कठीण साबण किंवा मशीन वॉशमुळे साडीची मऊसरता कमी होते.

२. थोडे ओलसर असतानाच इस्त्री करणे लिनन आणि कॉटनच्या साड्या लवकर सुरकुत्या पकडतात, त्यामुळे इस्त्री करताना त्या किंचित ओलसर ठेवाव्यात.

३. थंड आणि हवेशीर ठिकाणी साठवणूक करणे उन्हाळ्यात कपड्यांमध्ये बुरशी लागू नये म्हणून त्यांना व्यवस्थित फोल्ड करून ठेवावे.

**तरुणींमध्ये लिनन आणि कॉटन साडीची वाढती मागणी**

आजकाल अनेक फॅशन ब्रँड्स आणि ऑनलाइन स्टोअर्स उन्हाळ्यासाठी खास लिनन आणि कॉटन साड्या सादर करत आहेत. उदा. अनेक स्थानिक हँडलूम ब्रँड्सनी या प्रकाराच्या साड्यांचा ट्रेंड आणला आहे.

कॉलेज तरुणींना फॅशनसह कम्फर्ट हवा असल्याने त्या कॉटन साड्यांना मॉर्डन ट्विस्ट देऊन घालतात. तसेच, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या महिलांसाठीही लिनन आणि कॉटन साडी उत्तम पर्याय ठरतो.

उन्हाळ्यात कोणत्याही मुलीला जड आणि घट्ट कपडे घालायला नको असतात. त्यामुळेच हलकी, मोकळी आणि आरामदायी लिनन आणि कॉटन साडी हा सर्वोत्तम पर्याय आहे. आजकाल साड्यांमध्ये फॅशन आणि कंफर्ट यांचा सुरेख समन्वय दिसतो. त्यामुळे पारंपरिकतेसह आधुनिक लूक हवा असलेल्यांनी या उन्हाळ्यात निश्चितच लिनन किंवा कॉटन साडीला आपल्या वॉर्डरोबचा भाग बनवावा!

गांवकरी



महत्त्वाचे

## नाईक महाविद्यालयात सेल्स ॲण्ड मार्केटिंग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार



**सिन्नर : प्रतिनिधी**
येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे सेल्स ॲण्ड मार्केटींग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वायफोरडी फाउंडेशनचे अमोल भोळे, रवींद्र राठोड, संस्थेचे संचालक जयंत आव्हाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पखाले आदी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सेल्स व मार्केटिंग या विषयावर मार्गदर्शन करताना अमोल भोळे यांनी डिजिटल मार्केटिंग, सेल्स टेक्निक, ऑनलाइन मार्केटिंग स्किल याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संस्थेचे संचालक जयंत आव्हाड यांनी विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे विशेष कौतुक करून विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पखाले यांनीही विद्यार्थ्यांना भविष्यात स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी या वयातच मार्केटिंग स्किल माहिती करून घेणे फार गरजेचे असल्याचे सांगितले. उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.सुजाता दिघे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. ज्योती गायकवाड यांनी मानले.

## चांडक कन्या विद्यालयात तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा



**सिन्नर : प्रतिनिधी**
येथील चांडक कन्या विद्यालयात तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. गटविकासाधिकारी अशोक भवारी, गटशिक्षाधिकारी राजेश डामसे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय पोषण आहार योजनेमध्ये आहार शिजवणाऱ्या महिलांना प्रेरणा मिळावी, तसेच त्यांच्या पाककलेस उत्तेजन मिळावे, या उद्देशाने तालुक्यातील पोषण आहार योजनेचे प्रमुख म्हणून काम पाहणाऱ्या रूपाली पगार, अधीक्षक शालेय पोषण आहार योजना यांच्या नियोजनांतर्गत ही पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जि. प. शाळा चास (प्रथम), जि.प. शाळा ठाणगाव (द्वितीय), एस.जी. पब्लिक स्कूल प्राथमिक विभाग (तृतीय) यांनी यश संपादित केले. विजेत्या स्पर्धकांना व सहभागी शाळांना गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे यांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धा यशस्वितेसाठी विस्ताराधिकारी कैलास सांगळे, विजय बागुल, मंजुषा साळुंके यासह सर्व केंद्रप्रमुख, विषयतज्ज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक, पोषण आहार शिजवणारे मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

## मविप्र चित्रकला स्पर्धेत बालशिक्षण मंदिराच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश




**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या बालशिक्षण मंदिर, गोरेराम लेन, नाशिक येथील विद्यार्थ्यांनी मविप्र चित्रकला स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. गट पहिला (इयत्ता पहिली ते चौथी) मध्ये कु. स्वरा रवींद्र बोरसे (चौथी ब) हिने संपूर्ण संस्थेत दुसरा क्रमांक मिळवला. तिने १०० पैकी ८९ गुण मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. कु. खुशी गणेश वाघ (तिसरी अ) हिने संस्थेत चौथा क्रमांक मिळवत १०० पैकी ८७ गुण संपादन केले. गट दुसरा (इयत्ता पाचवी ते सहावी) मध्ये ज्ञानेश घनश्याम जाधव (सहावी क) याने संस्थेत दुसरा क्रमांक मिळवत १०० पैकी ८९ गुण प्राप्त केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. के. तांदळे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या यशामागे चित्रकला विषयाच्या शिक्षिका श्रीम. सविता पेखळे व शीतल गडाख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाकृती साकारल्या. शाळेच्या वतीने या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# उघड्यावर दारु पिणाऱ्या ९ तळीरामांवर अंबड पोलिसांनी केली कारवाई



**अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या तळीरामांच्या विरोधात कारवाई केल्यानंतर त्यांचे समुपदेशन करताना अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्यासह अंबड पोलीस ठाण्याचे कर्मचारी. (छाया : दिलीपराज सोनार)**

**सिडको : विशेष प्रतिनिधी**
**पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघड्यावर दारू पिणाऱ्या ९ तळीरामांवर अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. चौकाचौकात टवाळखोरी करणाऱ्या शंभरहून अधिक टवाळखोरांचे समुपदेशन केले. दरम्यान, ही कारवाई सुरूच राहणार असल्याचे अंबड पोलिसांनी सांगितले.**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी असलेल्या वाइन शॉपच्या बाहेरच बरेचसे मद्यपी मद्यपान करून त्या ठिकाणी धिंगाणा घालत असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्या होत्या. यावरून पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमूर्ती चौक, दत्त चौक, पाथर्डी फाटा परिसरातील जनता स्वीटजवळ असलेल्या चौपाटीसह अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणी तळीराम उघड्यावर मद्यपान करून धिंगाणा घालणाऱ्या मद्यपींविरोधात गुन्हे शोध पथकाने कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले तर विविध चौकाचौकात टवाळखोरी करणाऱ्या शंभरहून अधिक टवाळखोरांना ताब्यात घेत त्यांचे समुपदेशन केले. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या तळीरामांच्या विरोधात कारवाई चालूच राहणार असल्याचे अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पवार यांनी सांगितले.

# लहान मुलांच्या संगोपनाविषयी जागरूकता अत्यंत गरजेची : आ. आशुतोष काळे



**वावी : वार्ताहर**
माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात रोज नवनवीन शोध लागत आहेत या तंत्रज्ञानाचा परिणाम म्हणून आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आला असून, हा स्मार्ट फोन पालकांबरोबरच या लहान मुलांच्या हातात देखील दिसू लागला आहे. याची कारणे जरी वेगवेगळी असेल तरी लहान मुलांना स्मार्ट फोन देणे हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे त्याचा तोटा आपल्याला भविष्यात भोगावा लागू शकतो. आपला देश महासत्तेकडे वाटचाल करीत असून शून्य ते सहा वर्ष वयोगटातील बालक हे आपल्या देशाचे उद्याचे भविष्य आहे. याची जाणीव ठेवून पालकांमध्ये लहान मुलांच्या संगोपनाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी सांगितले.

कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख येथे एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प तसेच 'कोपरगाव आरंभ' च्या अंतर्गत टाकळी गटाच्या 'धमाल मेळाव्याचे' गुरुवार (दि.१४) रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येवून 'धमाल मेळाव्याचे' उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी आ.आशुतोष काळे यांचे 'धमाल मेळाव्यात' आगमन होताच चिमुकल्या विद्यार्थिनींनी त्यांचे औक्षण केले. नवनवीन तंत्रज्ञान जेवढे आपल्या गरजेचे आहे तेवढाच आपण त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प तसेच 'कोपरगाव आरंभ' हा उपक्रम अत्यंत स्तुत्य उपक्रम असून या माध्यमातून बालवयातच मुलांवर चांगले संस्कार होणार आहेत व बालकांचा सर्वांगीण विकास साधला जाणार असल्यामुळे निश्चितपणे चांगले विद्यार्थी घडणार आहे. त्यासाठी अंगणवाडी सेविकांनी आपली जबाबदारी ओळखून योग्य पद्धतीने आपले कर्तव्य पार पाडावे व आपण देशाचे भविष्य घडवत आहोत याची नेहमी जाणीव ठेवावी, असे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

## सरपंच संजय गुरसळ यांचा कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश



**वावी : वार्ताहर**
**कोपरगाव तालुक्यातील विकासाच्या दिशेने शीघ्र गतीने वाटचाल करीत असलेल्या डाऊच खु.चे लोकनियुक्त सरपंच संजय गुरसळ यांनी नुकताच आपल्या सर्व ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आ. आशुतोष काळे यांनी सरपंच संजय गुरसळ व त्यांच्या सहकारी सदस्यांचे व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.**

यावेळी सरपंच संजय गुरसळ यांच्या बरोबरच भैयासाहेब सय्यद, देविदास पवार, प्रवीण गुरसळ, चंद्रकांत गुरसळ, सुनील गुरसळ, वेनुनाथ पवार, संजय गुरसळ, सर्जेराव गुरसळ, बाळासाहेब गुरसळ, माणिक चव्हाण, मोहनराव गुरसळ, बाबासाहेब गुरसळ, अर्जुन होन, देविदास गुरसळ, चंद्रकांत गुरसळ, राहुल बढे, गणेश बढे, बाबासाहेब बढे, सखाराम बढे, बिरू बढे, किरण गुरसळ, भास्कर गुरसळ, मुन्ना सय्यद, जावेद पठाण, शाहरुख शेख, मेहबूब सय्यद उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी शिकून देशसेवा करावी : नंदू पवार

## सोनांबे विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**सिन्नर : प्रतिनिधी**
**विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय निश्चित करून त्याचा पाठलाग करावा व आदर्श नागरिक बनून देशाची सेवा करावी, असे आवाहन जनता विद्यालय शालेय समितीचे अध्यक्ष नंदू पाटील पवार यांनी केले.**

तालुक्यातील सोनांबे येथील जनता विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आशीर्वाद समारंभात बोलत होते. व्यासपीठावर देवनदी पतसंस्थेचे चेअरमन बी. एम. पवार, संचालक हरिभाऊ पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य केरू पवार, शालेय समिती सदस्य कचरू शिंदे, मुख्याध्यापक प्रभाकर फटांगळे, पर्यवेक्षक शिवनाथ पांगारकर, ज्येष्ठ शिक्षक शांताराम चांदोरे, सोपान पवार, जनाबाई सुडके, नवनाथ माळी, किरण पवार आदी उपस्थित होते.

आजचा कार्यक्रम हा निरोपाचा नसून आशीर्वादाचा असल्याने आपण निरोप समारंभ न म्हणता आवर्जून आशीर्वाद समारंभ म्हणत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम ज्या विद्यालयात होते. त्या विद्यालयाविषयी कृतज्ञता भाव कायम असू द्या, असेही ते म्हणाले.

शाळेने केलेले संस्कार व शिस्त ही आयुष्यभर अंगी बाळगून विद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन मुख्याध्यापक प्रभाकर फटांगळे यांनी यावेळी केले. पर्यवेक्षक शिवनाथ पांगारकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांना ही शाळा सोडून जाताना जसे वाईट वाटत आहे तशीच अवस्था तुम्हाला निरोप देताना शिक्षकांची होत असल्याचे ते म्हणाले. देवनदी पतसंस्थेचे चेअरमन बी. एम. पवार, संचालक हरिभाऊ पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य केरू पवार, जनाबाई सुडके, रुपावली काळे, दीपक भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले. शाळा व शिक्षक यांच्या विषयी भावना व्यक्त करतांना अनेक विद्यार्थ्यांना गहिवरून आले होते. वेदिका पवार,पौर्णिमा शिंदे यांनीसूत्रसंचालन केले. ज्येष्ठ शिक्षक शांताराम चांदोरे यांनी आभार मानले. यावेळी भारती धाकतोडे, मीना केदार, सोनाली पाटील, वर्षा मोरे, रुपाली महाले, योगिता शिंदे, भाऊसाहेब दहिफळे, संवेदिता जाधव, सुनील पवार आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे बना

## मी उद्योजक कार्यशाळेत स्टाइसचे अध्यक्ष आवारे यांचा सल्ला



**सिन्नर : प्रतिनिधी**
**सिन्नरच्या औद्योगिक वसाहतीमुळे लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे सिन्नर शहराचा विकास झाला. औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून उद्योजक बनण्याची नामी संधी तरुणांना निर्माण झाली आहे. कौशल्याच्या अभावामुळे युवकांना नोकरीत स्थैर्य नाही. त्यामुळे नोकरी करणारे होण्यापेक्षा नोकरी देणारे बना. व्यवसायाकडे वळा व उद्योजक व्हा, असा सल्ला सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीचे अध्यक्ष नामकर्ण आवारे यांनी दिला.**

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक, संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १४) मी उद्योजक कार्यशाळा नुकतीच पार पडली. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष बापूसाहेब पंडित, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विनोद निरभवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये सिन्नर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शिवराज सोनवणे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यवसायपूरक शिक्षण घेणे किती गरजेचे आहे, हे आपल्या व्याख्यानातून सांगितले. यावेळी ते म्हणाले की, नवीन व्यवसाय तयार करणे, विकसित करणे आणि व्यवस्थापित करणे ही एक प्रक्रिया आहे. उद्योजक बनण्यासाठी स्वतःची मानसिकता असली पाहिजे. त्याशिवाय ते काम पूर्णत्वास जाणार नाही. स्वागतगीत व दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. राजश्री बागुल यांनी करुन दिला. प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. रेखा वरंदळ यांनी तर सूत्रसंचालन प्रा. वर्षा गरगटे यांनी केले. आभार विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. महेश शिंदे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. सुनील गूरुळे, कावेरी गोसावी, प्रा. सोनाली केकान, प्रा. पायल जाधव, प्रा. धनश्री गांगुर्डे, प्रा. गणेश राजगुरू, प्रमोद आंबेकर, संतोष डुंबरे, योगेश गोसावी यांनी परिश्रम घेतले.

### चर्चासत्रातून विद्यार्थ्यांना प्रेरणा

या कार्यशाळेसाठी उपस्थित विद्यार्थ्यांचे एक चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रामध्ये इव्हेंट मॅनेजमेंट, प्लास्टिक रीयुज, पशुखाद्य, ब्युटीशियन, वायनरी शॉप, आयुर्वेद यासारख्या विविध उद्योगावर चर्चा करताना विद्यार्थ्यांनी आपल्या सहभाग नोंदवला. त्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.




## डुबेरे विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सिन्नर : प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून प्रगती करावी. भविष्यात शाळा व गावच्या विकासाठी एकत्र यावे. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी. विविध कर्तृत्ववान व्यक्तींचे मार्गदर्शन व सल्ला घेऊनच विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी, असे आवाहन पेशवे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरुणशेठ वारुंगसे यांनी केले.

डुबेरे येथील जनता विद्यालयातील एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद प्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने होते. व्यासपीठावर पेशवे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरुणशेठ वारुंगसे,विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोकराव गवळी, माजी सरपंच शरदराव माळी ,भारतीय सैन्य दलात कप्तानपदी कार्यरत असलेले मच्छिंद्र वारुंगसे ,पोलीस पाटील रामदास वारुंगसे,दापूरचे केंद्रप्रमुख संजय आव्हाड, मुख्याध्यापक रामदास वाजे ,जेष्ठ शिक्षक दिगंबर, जाधव, उत्तम कामडी आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून प्रगती करावी असे आवाहन विठ्ठल वामने यांनी अध्यक्षस्थानावरुन बोलताना केली. विद्यार्थ्यांच्या वतीने शिवम शिंदे, सोनाली चव्हाण, लावण्या वाजे,श्रावणी वारुंगसे, ऋतुजा वामने, श्रद्धा माळी यांनी तर शिक्षकांच्या वतीने सोमनाथ पगार, डी. ए. रबडे, राजेंद्र गांगुर्डे यांनी मनोगत व्यक्त केले.

# विद्यार्थिनींच्या संरक्षणासाठी पोस्को कायदा महत्त्वाचा : संजय वाघमारे

## सिन्नर महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान कार्यशाळा




**सिन्नर : प्रतिनिधी**
**विद्यार्थिनींच्या संरक्षणासाठी पोस्को कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे. १८ वर्षांखालील मुलांना लैंगिक अत्याचार आणि शोषणापासून संरक्षण देण्यासाठी, हा मंजूर करण्यात आला. यानुसार, जर अल्पवयीन मुलगी गर्भपात करू इच्छित असेल तर पोलिसांकडे तक्रार नोंदवणे आवश्यक असते, असे प्रतिपादन सिन्नर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक संजय वाघमारे यांनी यांनी केले.**

येथील नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित निर्भय कन्या अभियान कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेश शिंदे, पोलीस अंमलदार अंकुश दराडे, आय.टी.आय. कॉलेजचे प्राचार्य शिवराज सोनवणे आदी उपस्थित होते. किशोर अवस्थेतील आकर्षण, मोबाइलचे दुष्परिणाम, व्यसनाधीनता, सायबर थॉट तसेच कायद्याच्या वेगवेगळ्या कलमांविषयी वाघमारे यांनी विद्यार्थिनींना सखोल माहिती दिली. प्रश्नोत्तराच्या तासात गायत्री थोरवट, रोहिदास कुमावत, स्नेहा पाबळे, ऋषिकेश पवार इ. अनेक विद्यार्थ्यांच्या अनेक शंकांचे निरसन यावेळी त्यांनी केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात सारिका पालवे व सुशांत मेंगाळ यांनी विद्यार्थिनींना तायक्कांदो चे प्रशिक्षण दिले. तिसऱ्या सत्रात गीता कुलकर्णी यांनी 'आम्ही लेकी अहिल्येच्या' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींना लाठी प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणासाठी वैशाली वैद्य, वीणा कानकाटे, ज्योती गुजराती यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. धनश्री गांगुर्डे यांनी केले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. महेश शिंदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. वर्षा गरगटे यांनी करुन दिला. आभार प्रदर्शन प्रा. राजश्री बागुल यांनी केले. या कार्यशाळेसाठी प्रा. कावेरी गोसावी, प्रा. रेखा वरंदळ, प्रा. पायल जाधव, दर्शना बिन्नर व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मुक्त विद्यापीठाचे विशेष क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**
**कुठल्याही खेळात सहभागी होणे हे आनंददायी असते तर खेळाच्या स्पर्धेत भाग घेतल्यानंतर खेळाला कौशल्याची जोड देऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. त्यासोबत अंगी खिलाडूवृत्ती कायम असू द्यावी, असे आवाहन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी येथे केले.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या सभागृहात झालेल्या विशेष क्रीडा प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी मा. कुलगुरू प्रा. सोनवणे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांची विशेष उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी शरद पाटील, सचिन वार्लीकर, दीपक लभडे, कांतीलाल महाले, डॉ. ज्ञानेश्वर गडाख, डॉ. सुनील धोंडगे यांनी परिश्रम घेतले.

# अभ्यासूवृत्ती हेच यशाचे खरे सूत्र : शरद घुले

## कोमलवाडी जनता विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**सिन्नर : प्रतिनिधी**
**ज्ञान समृद्ध होणे हे विद्यार्थ्याचे आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी अभ्यासूवृती हेच यशाचे खरे सूत्र आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित करावे आणि या परीक्षेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उच्चत्तम गुण संपादन करून या विद्यालयाचे नाव रोशन करावे, असे प्रतिपादन स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद घुले यांनी केले.**

तालुक्यातील कोमलवाडी येथील जनता विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर मुख्याध्यापक अमोल नाईक, लहानू घुले, सुनील सहाणे, सोमनाथ जाधव आदी उपस्थित होते.

विनोबा भावे म्हणतात की, आकाशातून पडणारा पाण्याचा थेंब हातात पडला तर तो पिण्यायोग्य असतो. तोच थेंब गटारीत पडला तर पाय धुण्यासारखा नसतो. तोच थेंब कमळाच्या फुलावर पडला तर मोत्यासारखा चमकतो. सिंपल्यावर पडला तर मोती तयार होतो. थेंब तोच परंतु सहवास जसा मिळाला तसा परिणाम त्याच्यावर होत असतो. तेच आपल्या जीवनातही घडत असत. म्हणून चांगल्या मित्रांच्या सहवासात रहा म्हणजे आपल्या जीवनावर चांगला परिणाम होईल, असे आवाहन विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक यांनी केले. स्वप्न विचारांना जन्म देतात, विचार कृतींना जन्म देतात आणि कृती जीवनात परिवर्तन घडवून आणतात. हिच शिक्षणाची किमया आहे. म्हणून आपली उन्नती घडवायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. येणाऱ्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी यशस्वी व्हा आणि आपल्या भविष्यासाठी उदात्त असे स्वप्ने बघा. त्यासाठी आपले व्हिजन निश्चित करा.असे आवाहन ज्येष्ठ शिक्षिका मनीषा गोराडे- वारुंगसे यांनी केले. माणसाला शिक्षणच तारु शकते. म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करून चांगले यश संपादन करावे, असे आवाहन सोमनाथ जाधव यांनी केले. समीक्षा सहाणे व सिद्धी वाजे या विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंत विद्यालयातील विविध आपले अनुभव कथन करून विद्यालयातील सर्व शिक्षकांनी योग्य पद्धतीने ज्ञानदानाचे कार्य केल्यामुळेच आम्ही या परीक्षेस सामोरे जाण्यासाठी सज्ज व सक्षम झालो आहोत, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी इयत्ता १० वीच्या निरोपार्थी विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे सर्व शिक्षक यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन येथोचित सन्मान केला. याप्रसंगी समीक्षा सहाने, सिद्धी वाजे, वैष्णवी भोर, प्रतीक घुले, प्रसाद उगले, केशव वळवी, सौरभ कमानकर, सुदर्शन गांडोळे, सागर बस्ते, स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे आदींसह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### ओझरला विश्वसत्य बीएड छात्र सेवाकाल समारंभ



**ओझर : वार्ताहर**
येथील विश्वसत्य बीएड कॉलेजचा छात्र सेवाकाल समारंभ बोरस्ते विद्यालयात सकाळ व दुपार सत्रात मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर प्रा. सुनीता वाघमारे, प्रा. जया सूर्यवंशी, प्रा. मनविता खैरनार, शिक्षक नंदकुमार न्याहारकर, रवींद्र निकम, बाळासाहेब ढेपले, सुनील पाटील, मंगल सावंत, संगीता शेटे उपस्थित होते. प्रास्ताविक छात्रशिक्षिका नीलम उखर्डे, श्रुती गर्ग यांनी केले. प्रारंभी छात्र शिक्षिका जयश्री रसाळ, अमृता क्षत्रिय, कल्याणी कुलकर्णी यांनी अध्ययन अध्यापन अनुभव कथन केले. प्राध्यापक मनोगत प्रा. जया सूर्यवंशी, डॉ. सुनीता वाघमारे, शिक्षिका मंगल सावंत यांनी व्यक्त केले. याप्रसंगी विद्यालयात राबविलेल्या उपक्रमातील प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, चित्रकला, निबंध, काव्यवाचन, सामान्यज्ञान, हस्ताक्षर, आकृती काढणे या स्पर्धेतील प्रथम तीन यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित केले. याप्रसंगी छात्रशिक्षकांनी मार्गदर्शक शिक्षकांना भेटवस्तू देऊन सन्मानित केले. विश्वसत्य कॉलेजतर्फे बोरस्ते विद्यालयास फोटोफ्रेम भेट देण्यात आली. कार्यक्रमासाठी छात्रशिक्षक, प्राध्यापक शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन नीलम उखर्डे, भाग्यश्री कुंभार यांनी केले तर प्रियंका टेमगर, अश्विनी देवकर यांनी आभार मानले.

### अज्ञात दुचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**चांदवड : वार्ताहर**
येथील चांदवड-मनमाड रोडवरील निकम वस्तीजवळ स्कूटीने दुचाकीला धडक दिल्याने ६४ वर्षीय दुचाकीचालक गंभीर जखमी झाले. भास्कर कारभारी नारळे (६४, रा. रायपूर) हे ४ फेब्रुवारीस दुचाकीने (एमएच १५ डीटी ७३३२) रायपूर येथून चांदवड येथे जात असताना पाठीमागून येणाऱ्या दुचाकीच्या अज्ञात चालकाने त्यांच्या दुचाकीस धडक दिली. यात दुचाकीचालक नारळे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर अज्ञात स्कूटीचालक पळून गेला. याबाबत भास्कर नारळे यांनी चांदवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात दुचाकीचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला. याबाबत हवालदार कमल आहिरे तपास करीत आहे.

### ट्रॅक्टर ट्रॉलीतून पडून ४ वर्षीय बालकाचा मृत्यू

**चांदवड : वार्ताहर**
तालुक्यातील सोनीसांगवी येथे गुरुवारी दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी एका ४ वर्षीय बालकाचा ट्रॅक्टर ट्रॉलीतून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. आयुष सुभाष पवार असे या बालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयुष हा त्याच्या कुटुंबासोबत सोमनाथ बाबूराव ठाकरे यांच्या शेतवस्तीवर राहत होता. त्याचे वडील धुळे जिल्ह्यातील सलाईपाडा येथील रहिवासी असून, ते येथे मोलमजुरीचे काम करतात. गुरुवारी दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी आयुष ट्रॅक्टरच्या ट्रॉलीवर खेळत असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो खाली पडला. या घटनेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने चांदवड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. चांदवड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, अधिक तपास सुरू आहे.

### चांदवडला महाशिवरात्रीनिमित्त चंद्रेश्वर गडावर कार्यक्रम



**चांदवड : वार्ताहर**
येथील पुरातन चंद्रेश्वर गडावरील श्री चंद्रेश्वर महादेव मंदिरात दि. २५ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती चंद्रेश्वर गडाचे महंत स्वामी जयदेवपुरीजी महाराज व चंद्रेश्वर भक्त मंडळाने दिली. महाशिवरात्र महोत्सव माघ कृष्ण त्रयोदशी बुधवारी (दि. २६) साजरा होणार असून, त्यानिमित्त मंगळवारी (दि. २५) सकाळी सात वाजता चंद्रेश्वर गडावरून श्री चंद्रेश्वर भगवान पालखीची भव्य मिरवणूक चांदवड शहरातून निघेल. बुधवारी (दि. २६) पहाटे ४ वाजता, दुपारी १२ वाजता व रात्री १२ वाजता श्री चंद्रेश्वर महादेव भगवानचा रुद्र अभिषेक, सकाळी ६ वाजता प्रथम व द्वितीय चंद्रेश्वर बाबा समाधी पूजन, सकाळी ७ वाजता सप्तऋषी समाधींचे पूजन होईल. सकाळी ९ वाजेपासून भाविकांना फराळ वाटप होणार आहे. सायंकाळी ५ ते ६ वाजता सामुदायिक भजनाचा कार्यक्रम होईल. रात्री ९ वाजता जगदीश महाराज उंद्रे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार (दि. २७) फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेपासून महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवात अनेक प्रतिष्ठित संत सहभागी होणार आहेत, ज्यात डॉ. नागेंद्रपुरी (नाशिक), स्वामी गणेशपुरी (देवधारा), स्वामी अजयपुरी (त्र्यंबकेश्वर), स्वामी पृथ्वीपुरीजी महाराज, स्वामी जयदेवपुरीजी महाराज, स्वामी प्रमोदपुरीजी महाराज, स्वामी लक्ष्मीनारायणपुरीजी महाराज, स्वामी महेशपुरीजी महाराज, स्वामी खटवानपुरीजी महाराज आणि महंत स्वामी बन्सीपुरीजी महाराज यांचा समावेश आहे. महाशिवरात्री महोत्सवात श्री चंद्रेश्वर भक्त मंडळ, श्री चंद्रेश्वर हनुमान धाम गोशाळा ट्रस्ट आणि समस्त ग्रामस्थ, चांदवड यांनी सर्व भाविकांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# तणनाशक फवारणीमुळे मुखेड, धामोडे येथील शेतकऱ्यांच्या कांदा पिकाचे नुकसान

**येवला : प्रतिनिधी**
**सदोष तणनाशक फवारणीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान हाततोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांना अश्रू अनावर सुमारे तीन हेक्टरवरील दोन महिन्यांचे कांदा पीक खराब झाले असून, मोठ्या प्रमाणात लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सांगितले.**

दरम्यान, येवला तालुक्यातील धामोडे येथील दोन शेतकऱ्यांनी कांदा लागवडीनंतर सदर कांद्यावर सदोष तणनाशक फवारणीमुळे त्यांच्या कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले होते. याबाबत सविस्तर वृत्त असे की, येवला तालुक्यातील धामोडे येथील शेतकरी अशोक येवले यांनी दोन एकर व मारुती गायकवाड यांनी दीड एकर कांदा लागवड केली असून, त्यावर कंपनीच्या विक्री प्रतिनिधीच्या सांगण्यावरून गव्हावर फवारण्याचे औषध कांद्यावर फवारले. गव्हावर फवारण्याचे औषध कांद्यावरदेखील चालते, असे सांगितल्याने दुकानदाराने शेतकऱ्यांना विकले आणि शेतकऱ्यांनी हे औषध कांद्यावर फवारले. त्यामुळेच मोठे नुकसान झाले असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यात शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

नाशिक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांमध्ये बोगस तणनाशक फवारणीमुळे शेतकऱ्यांच्या कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका हा येवला तालुक्याला बसला असून, येवला तालुक्यातील मुखेड येथे १६ हेक्टरवरील कांदा पीक चुकीच्या औषध फवारणीमुळे उद्ध्वस्त झाले होते.

दरम्यान, तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड यांनी संबंधित शेतकऱ्यांना भेटून पाहणी केली आहे. तसेच त्या कंपनीच्या औषध विक्रीवर सध्या बंद केली आहे. मुखेड शिवारातील उद्ध्वस्त कांदा पिकाचे समितीच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती कृषी अधिकारी शुभम बेरड यांनी सांगितले.



### दिंडोरीतही कांदा पिकाचे नुकसान

**दिंडोरी : प्रतिनिधी**
एक कंपनीच्या तणनाशक फवारणीमुळे जिल्ह्यातील ७ तालुक्यांतील सुमारे २०५ एकर क्षेत्रावरील कांदा पिकाचे नुकसान झाल्याने सदर कंपनीवर कारवाई होत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी खा. भास्कर भगरे यांनी संसदेत केली आहे. संसद अधिवेशन कामकाजात सहभाग घेताना शून्य प्रहरात खा. भगरे यांनी कांदा पिकाचे नुकसानीचा मुद्दा मांडला. कळवण, देवळा, दिंडोरी, चांदवड, येवला, नांदगाव आदी आठ तालुक्यांत कांदा पिकाचे एक सदोष तणनाशक फवारणीने कांदा पीक जळून गेले होते. खा. भगरे यांनी बांधावर जात पाहणी केली होती. कृषी विभागास पंचनामा करण्याच्या सूचना केल्या होत्या. तसेच याबाबत संसदेत बोलण्याची संधी मिळताच त्यांनी सदर नुकसान प्रश्न प्रभावीपणे मांडला. सदर कंपनीवर कारवाई करत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली तसेच कांदा निर्यातमूल्य हटवण्याचीही मागणी करत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे.



देवगाव येथील विविध विकासकामांचे उद्घाटन करताना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ. समवेत उपस्थित मान्यवर.
(छाया : समीर पठाण)

## मतदारसंघातील विकासाची कामे करण्यास प्रथम प्राधान्य : भुजबळ

**लासलगाव : वार्ताहर**
**येवला मतदारसंघात विकासासाठी आपण आलो आहोत. त्यामुळे गेल्या पाच टर्मपासून जनतेने आपल्याला निवडून दिलं आहे. त्यामुळे मतदारसंघातील विकासाची कामे करण्यास आपले प्रथम प्राधान्य असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले.**

देवगाव येथे मूलभूत सुविधा योजनेतील खंडेराव मंदिर सभागृह व स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मारुती मंदिराजवळ शेड बांधणे या कामाचे उद्घाटन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, ॲड. नितीन ठाकरे, बाळासाहेब क्षीरसागर, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, डॉ. श्रीकांत आवारे, भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी, मच्छिंद्र थोरात, शिवाजी सुपनर, गोरख शिंदे, रत्नाकर शिरसाठ, वाल्मीक बोचरे, रवींद्र बोचरे, रामनाथ बोचरे, जयेश लोहारकर, धनंजय जोशी, मनोहर बोचरे, पांडुरंग राऊत, राजेंद्र कांबळे, रेवण लोहारकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, शासनासोबतच नागरिकांनी विशेष लक्ष दिले तर उत्तम दर्जाची विकासकामे होऊ शकतात. मतदारसंघात हजार कोटीहून अधिक रकमेची कामे सुरू आहे.



## ओझरच्या सप्तशृंगी मित्रमंडळातर्फे १७० विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे वाटप

**ओझर : वार्ताहर**
**आपण समाजाचे काही देणे लागतो, या उदात्त भावनेने व शैक्षणिक, सामाजिक दायित्व म्हणून एचएएल कामगार मित्रमंडळातर्फे सप्तशृंगगड (नांदुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरीब व गरजू अशा १७० विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे (बॅग) वाटप करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ राऊत होते. व्यासपीठावर मंडळाचे वरिष्ठ सभासद भारत आहेर, कामगार संघटनेचे दीपक बच्छाव, कसमादे सोसायटीचे खजिनदार श्रीराम भामरे, भूषण रौंदळ, मंडळाचे अध्यक्ष प्रशांत भामरे, सरचिटणीस प्रवीण बागूल, खजिनदार गणेश कोर, कार्याध्यक्ष सुभाष शेवाळे, पदाधिकारी कैलास सोनवणे, श्रीकांत विसपुते, गौतम मोरे, अरुण देवरे उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले. सुभाष शेवाळे यांनी प्रास्ताविकात मंडळाच्या उपक्रमाबाबत माहिती दिली. शाळेतील १७० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय बॅगचे वाटप करण्यात आले.

## फेस्कॉम नाशिक जिल्ह्यातील तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर

**लासलगाव : वार्ताहर**
**फेस्कॉन नाशिक जिल्ह्यातील तालुकाध्यक्षांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष अशोकराव होळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली आहे. फेस्कॉम नाशिकची बैठक हुतात्मा स्मारक येथे नुकतीच संपन्न झाली. यावेळी जिल्हाभरातील विविध पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.**

नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील तालुकाध्यक्ष निवड याप्रमाणे, नाशिक शहर - विठ्ठलराव सावंत, नाशिक ग्रामीण- उत्तमराव कडलग, चांदवड तालुका- शंकरराव निखाडे, येवला तालुका- जी. एम. परदेशी, निफाड तालुका- रमाकांत जाधव, सटाणा तालुका- सुरेश बागड, दिंडोरी तालुका - बाबूराव आपसुंदे, सिन्नर तालुका - भाऊसाहेब सोनवणे, पेठ तालुका - दिनकर गवळी, कळवण देवळा तालुका - कृष्णा बच्छाव.





## ॲग्रीस्टॅक नोंदणीच्या गतीसाठी काटकर यांची तालुका भेट

**निफाड : विशेष प्रतिनिधी**
**केंद्र सरकारची अतिशय महत्त्वाची व महत्त्वाकांक्षी ॲग्रीस्टॅक योजनेची निफाड तालुक्यात जोरदार नोंदणी सुरू आहे. यानिमित्ताने मौजे वऱ्हेदारणा येथे कृषी विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी आपले सरकार ग्राहक सेवा केंद्र येथे ॲग्रीस्टॅक, फार्मर आयडी तयार करून घेण्याबाबत सुरू असलेल्या कामकाजाबाबत भेट दिली.**

ॲग्रीस्टॅक - फार्मर आयडी काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत तसेच फार्मर आयडी तयार केल्यास पी. एम. किसान योजना, शेतकरी कर्ज वितरण सुलभता, पीकविमा योजना, पीक हमीभाव खरेदीसाठी मदत, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण, महाडीबीटीवरील कृषी विभागाच्या सर्व योजना, केंद्र व राज्य शासनाच्या कृषीबाबतच्या सर्व योजनांसाठी त्याचा फायदा होणार असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले.




## पुस्तकं तुम्हाला नवी दिशा, नवा दृष्टिकोन देतात : जोंधळे

**येवला : प्रतिनिधी**
**तंत्रज्ञानाच्या या जगात पुस्तकं वाचण्याला अजूनही महत्त्व आहे. ती तुम्हाला नवी दिशा, नवा दृष्टिकोन देतात. तंत्रज्ञान हाताळा पण माणुसकीची कास धरायला विसरू नका. केवळ नोकरीच्या मागे न लागता ज्ञानाच्या विविध अंगांचा अभ्यास करा. पुस्तकं तुमच्या आयुष्याला नवी समृद्धी देतील, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या तथा पुस्तकांच्या आई भीमाबाई जोंधळे यांनी बोलताना केले.**

एकलहरे येथील मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन जंबोरी २०२५ मोठ्या उत्साहात झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन पुस्तकांच्या आई भीमाबाई जोंधळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. गजानन खराटे यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली व विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे, तर सर्वांगीण विकासासाठी उत्तम व्यासपीठ मिळवून देण्याची ग्वाही दिली. डॉ. गजानन खराटे यांनी मनोगत केले. हास्य, भावनिक आणि सामाजिक संदेश देणाऱ्या स्किट्सनी उपस्थितांची मने जिंकली. समन्वयक डॉ. डी. डी. पाळंदे, विश्वास वाडेकर, नीरज डोळे व त्यांच्या कार्यसंघाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपप्राचार्य डॉ. वर्षा पाटील, विविध विभागप्रमुख डॉ. जयंत चोपडे, डॉ. देवीदास दिघे, अमोल सनेर, श्रीधर खुळे, नीलेश घुगे आदींसह विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

## शिवजन्मोत्सव पूर्वतयारी बैठकीत ५ ठराव मंजूर

**येवला : प्रतिनिधी**
**क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रेरणेने येवला शहरात स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेल्या यंदाच्या वर्ष ९० वे वर्ष असलेल्या ऐतिहासिक शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी उत्सव समितीची बैठक येथील पाटोळे गल्लीत झाली.**



सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे प्रमुख सुभाष पहिलवान पाटोळे होते. प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला येमकोचे माजी चेअरमन बालूशेठ परदेशी, सुभाष पहिलवान पाटोळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. सभेला सुरुवात करण्यात आली. सर्व शिवप्रेमींनी आपला पांढरा अथवा भगवा पोशाख परिधान करून, डोक्यावर भगवी टोपी किंवा उपरणे घेऊन ऐतिहासिक मिरवणुकीत सामील व्हावे. यंदा प्रथमच येवल्यात शिवसृष्टी निर्माण झाल्याने पाटोळे गल्लीतून निघणाऱ्या पारंपरिक मिरवणुकीचा मार्ग बदलण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. शिवछत्रपतींची मिरवणूक पाटोळे गल्लीतून निघून पाटीलवाडा, काळामारुती, महाराणा प्रताप पुतळा, आझाद चौक, देवीखुंट, टिळक मैदान, सराफ बाजार, मेनरोड, खांबेकर खुंट, इंद्रनील कॉर्नरवरून शिवसृष्टी येथे समारोप करण्याचा निर्णय घेण्यात आला. ऐतिहासिक शिवजयंती उत्सवाचे संस्थापक धर्मवीर गोविंदराव पाटोळे यांचे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासमवेत असलेले ऐतिहासिक तैलचित्र शिवसृष्टी येथे असावे, अशी सूचना शरद राऊळ यांनी मांडली.

# शेतकऱ्यांनी बाजार समिती खरेदी-विक्री केंद्रांवरच द्राक्षमणी आणावे

**लासलगाव : वार्ताहर**
**निफाड तालुक्यात द्राक्ष काढणी हंगाम सुरू झाला असून, द्राक्षांच्या पॅकिंगनंतर उरणाऱ्या द्राक्षमण्यांना योग्य बाजारभाव मिळण्यासाठी शेतकरी बांधवांनी त्यांचे द्राक्षमणी शेतावर विक्री न करता बाजार समितीच्या अधिकृत खरेदी-विक्री केंद्रांवरच विक्रीस आणावे, असे आवाहन लासलगाव बाजार समितीचे सदस्य भीमराज काळे यांनी खानगाव नजीक व उगाव येथील द्राक्षमणी लिलाव शुभारंभाच्या वेळी केले.**



प्रारंभी भीमराज काळे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते द्राक्षमणी क्रेट्सचे विधिवत पूजन करण्यात आले. खानगाव नजीक येथे मुहूर्तावर आकाश भोसले यांचा द्राक्षमणी रु. २१/- प्रतिकिलो या दराने विक्री झाला. सायंकाळपर्यंत २२८ द्राक्षमणी क्रेट्स्‌ची आवक होऊन बाजारभाव कमीत कमी रु. ०४/-, जास्तीत जास्त रु. २५/- ,सरासरी रु. १९/- प्रति किलो याप्रमाणे होते.

तसेच उगाव येथे मुहूर्तावर लहु कडाळे यांचा द्राक्षमणी रु. ६१/- प्रति किलो या दराने विक्री झाला. सायंकाळपर्यंत १६० द्राक्षमणी क्रेट्सची आवक होऊन बाजारभाव कमीत कमी रु. ७/-, जास्तीत जास्त रु. ६१/-, सरासरी रु. २१/- प्रति किलो याप्रमाणे होते.

लिलाव शुभारंभप्रसंगी बाजार समितीचे सदस्य सचिव नरेंद्र वाढवणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून खानगाव नजीक व उगाव खरेदी-विक्री केंद्राची माहिती दिली. त्यानंतर काळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, खानगाव नजीक व उगाव परिसरातील द्राक्ष उत्पादकांच्या मागणीनुसार बाजार समितीने दि. २ फेब्रुवारी २००९ पासून खानगाव नजीक व दि. २६ जानेवारी २००४ पासून उगाव येथे द्राक्ष हंगामात द्राक्षमणी लिलावास सुरुवात केली आहे. गेल्या २० ते २१ वर्षांत या केंद्रास शेतकरी, अडते, व्यापारी व कामगारांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला असून, बाजार समितीच्या सदर उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या पैशास सुरक्षिततेची हमी मिळाली आहे. बाजार समितीने सदरचे खरेदी-विक्री केंद्र सुरू करण्यापूर्वी द्राक्षमणी खरेदीदार थेट शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन शिवार खरेदीद्वारे द्राक्षमण्यांची खरेदी करीत असे. स्पर्धा नसल्यामुळे बाजारभावात लूट तसेच पैशांची हमी नसल्यामुळे शेतकरी बांधवांना आर्थिक फटका बसत असे. त्यामुळे बाजार समितीने शेतकरी हित विचारात घेऊन दरवर्षी द्राक्ष हंगामात उगाव, खानगाव नजीक, नैताळे व मानोरी खुर्द येथे द्राक्षमणी लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. खानगाव नजीक व उगाव येथे दरवर्षी द्राक्षमण्यांच्या खरेदी-विक्रीतून दोन ते अडीच कोटी रुपयांची उलाढाल होते. खानगाव नजीक केंद्रावर सन २००९ ते २०२४ पर्यंत ६ लाख क्रेट्स द्राक्षमण्यांची आवक होऊन सुमारे १६.५० कोटी रुपयांची उलाढाल या ठिकाणी झाली आहे. तर उगाव केंद्रावर सन २००४ ते २०२४ पर्यंत १७ लाख क्रेट्स द्राक्षमण्यांची आवक होऊन सुमारे ४२ कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. द्राक्षमणी खरेदीसाठी अनेक व्यापारी उपस्थित असल्याने उघड व स्पर्धात्मक लिलावाद्वारे द्राक्षमण्यांना जास्तीत जास्त बाजारभाव मिळतात. त्यामुळे द्राक्ष उत्पादक बांधावर द्राक्षमणी विक्री न करता सदर खरेदी-विक्री केंद्रावर द्राक्षमणी विक्रीस प्राधान्य देतात. यावेळी बाजार समितीचे सदस्य प्रवीण कदम, माजी सदस्य पोपटराव रायते यांनी मनोगत व्यक्त करून बाजार समितीच्या सदर उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे, खडकमाळेगाव सोसायटीचे व्हा. चेअरमन नितीन रायते, उगाव ग्रामपंचायतीचे सदस्य केदू पानगव्हाणे, ह.भ.प. श्याम महाराज गांगुर्डे, रामभाऊ आवारे आदी उपस्थित होते.